विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

वर्ष चौथे । अंक नववा । सप्टेंबर २०२५




## सर्वोच्च कोण? संसद की संविधान

– प्रा. डॉ. राजेंद्र शेजुळ



## तोंडओळख लैंगिक अल्पसंख्याक समाजाची

– मयूर पटारे



## जेव्हा मदत करणाऱ्यालाच छळलं जातं : पोलिसी अत्याचार, जातीय अपमान आणि न्यायाचा शोध

– ॲड. परिक्रमा खोत

## शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या बलिदानदिनी राज्यभर निर्धार व अभिवादन सभा




डॉ. बाबा आढाव, माधव बावगे, संजय बनसोडे,
ॲड. परिक्रमा खोत व साथी (पुणे)



प्रा. शामराव पाटील (अण्णा), संजय बनसोडे,
कॉ. धनाजी गुरव व साथी (इस्लामपूर, सांगली)



जी. एस. सौदळे, प्रा. विलास रोडे, रानबा गायकवाड
व साथी (परळी, बीड)



गजेंद्र सुरकार, प्रकाश कांबळे, भरत व साथी (वर्धा)



विठ्ठलराव कोठारे, सारीका डेहनकर, हरिदास कोटरंगे
व साथी (गडचिरोली)




डॉ. टी. आर गोराणे, प्रा. अशा लांडगे,
डॉ. सुदेश घोडेराव व साथी (नाशिक)



अनिल दरेकर, रुकसाना मुल्ला, मंगल बावगे व साथी (लातूर)




विष्णूदास लोणारे, युवराज खोब्रागडे व साथी (भंडारा)

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
संपादक मंडळ

• संपादक
डॉ. नितीन शिंदे

• कार्यकारी संपादक
उत्तम जोगदंड

• सहसंपादक
डॉ. श्यामसुंदर मिरजकर

• व्यवस्थापकीय संपादक
अजय भालकर

• सदस्य
डॉ. बाळू दुगडूमवार
प्रल्हाद मिस्त्री
राजेंद्र फेगडे
हंसराज महाले

• सल्लागार
किशोर बेडकिहाळ

• प्रकाशक
संजय बनसोडे

• कार्यालयीन पत्ता
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव
पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
ता. वाळवा, जि. सांगली ४१५४०९
मो. ९३५९०८०८२०
email : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

• अंक वितरण
आरबाज पटेल (७७७६०६१८३३)

• मुखपृष्ठ
सचिन भोसले/कोल्हापूर

• स्वागतमूल्य : ₹ २०/-

• पृष्ठ संख्या : ४०

वार्षिक वर्गणी
४०० रू. (व्यक्तीसाठी) ५०० रू. (संस्थेसाठी)
वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा :
विवेक जागर संस्था
ICICI बँक, शिंदखेडा
खाते नंबर : 646301002757
IFSC Code : ICIC0002133
MICR Details : 424229501
Scan & Pay

विज्ञान निर्भयता नीती

आम्ही वारस विवेकाचे

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

ISSN : 2584-0398

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**R.N.I.No. MAHMAR/2022/83669**
**वर्ष चौथे । अंक नववा । सप्टेंबर २०२५**

## अनुक्रमणिका

**संपादकीय**
● शिक्षणाने किंवा वैज्ञानिक प्रगतीने अंधश्रद्धा दूर होत नाहीत ४
**कार्याध्यक्ष संवाद**
● वाढत्या आव्हानांना सामोरे जात डॉ. दाभोलकरांना अभिवादन करु या!/संजय बनसोडे ५
**प्रासंगिक**
● सामाजिक मुक्तीचे आजचे संदर्भ/ प्रा. डॉ. संजय सावळे ६
● सर्वोच्च कोण : संसद की संविधान/ राजेंद्र शेजुळ १०
● विवेकी समाजनिर्मितीसाठी बुद्धिजीवी वर्गाची भूमिका/ संतोष चिकाटे १३
● असे शिक्षक सर्वांना लाभावेत/ उत्तरेश्वर बिराजदार १४
● जेव्हा मदत करणाऱ्यालाच छळलं जातं : पोलिसी अत्याचार, जातीय अपमान आणि न्यायाचा शोध/ अॅड. परिक्रमा खोत १६
**अभिवादन**
● हैदरभाई नुरानी : महा. अंनिसवर निस्सीम प्रेम करणारे प्रसन्न व्यक्तिमत्त्व/ प्रा. परेश शाह १९
● डॉ. शंतनू अभ्यंकर : प्रखर विवेकवादी आणि विज्ञानवादी व्यक्तिमत्त्व / सलीम मोमीन २१
**संघटन**
● हे तांदूळ निवडून काढा/ विनायक सावळे २३
**युवा विश्व**
● तोंडओळख लैंगिक अल्पसंख्याक समाजाची/ मयूर पटारे २५
**विज्ञान विश्व**
● डॉ. वसंत खानोलकर : भारतातील पॅथॉलॉजीचे जनक / डॉ. नितीन हांडे २८
**पुस्तक परिचय**
● पुस्तक परीक्षण : धर्माच्या तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ चिकित्सेचा संग्रह/ जगदीश काबरे ३१
**कविता**
● कानगोष्टी! / अरुण घोडेराव ३४
**वृत्त वेध**
● अतिलोभातून वकिलाची वीस लाखांची फसवणूक / उत्तम जोगदंड ३५
**खबरबात**
● महा. अंनिसची खबरबात / हंसराज महाले ३७

'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

## शिक्षणाने किंवा वैज्ञानिक प्रगतीने अंधश्रद्धा दूर होत नाहीत

२१ सप्टेंबर, १९९५ रोजी आपल्या देशात गणेशमूर्ती दूध पीत असल्याचा कथित 'चमत्कार', फेसबुक किंवा व्हॉटसअॅप वगैरे सोशल मीडिया अस्तित्वात नसताना सुद्धा, केवळ काही तासात देशभरातच नव्हे, तर भारतीय लोक असलेल्या अन्य देशांमध्ये देखील 'व्हायरल' झाला होता. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या घरातील गणेशमूर्तीने दूध प्राशन केल्याचे मुख्यमंत्री स्वतःच सांगत होते. परदेशातील गणेशमूर्ती देखील दूध पीत असल्याच्या बातम्या येत होत्या. सामान्य देशवासियांनी तर विविध गणेशमूर्तींना एवढे दूध पाजले की, कित्येक मंदिरांच्याबाहेर दुधाचे पाट वाहात होते. अंधश्रद्धेचा महापूरच लोटला होता. त्यास आवर घातला तो महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी. केशिका क्रियेमुळे (Capillary Action) हा प्रकार घडत असल्याचे सांगून कोणत्याही धर्माच्या, कोणत्याही देवाची मूर्ती अशाप्रकारे दूध पिऊ शकते, एवढेच काय साध्या दगडाच्या गोट्याला जरी दूध पाजले तरी तो गोटा देखील दूध पितो हे त्यांनी सप्रयोग दाखवून दिले. त्यास प्रसार माध्यमांनी साथ दिली आणि नंतर हा 'महापूर' ओसरला. हे सारे आठवण्याचे कारण सप्टेंबरच्या २१ तारखेला या घटनेला तीस वर्षे होत आहेत आणि हा दिवस 'चमत्कार सत्यशोधन दिन' म्हणून महा. अंनिसतर्फे पाळला जातो.

हा गणेश दुग्ध-प्राशनाचा कथित चमत्कार होऊन गेल्यानंतर आजपर्यंत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. १९९० दशकाच्या पूर्वार्धात आपल्या देशात सुमारे ४८ टक्के साक्षर होते ते वाढून २०२३ सालापर्यंत ७७ टक्के झाले (Mactrotrends वेबसाईट). ऑगस्ट १९९५ मध्ये देशात आलेले जे इंटरनेट सर्वसामान्य लोकांना केवळ ऐकून माहीत होते, तेच इंटरनेट आता आपल्या देशातील ८० कोटी लोक वापरतात आणि २०००च्या दशकात आलेल्या सोशल मीडियाचा सध्या ४९ कोटी लोक वापर करतात (Meltwater वेबसाईट) म्हणजे शिक्षण वाढले, विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे सारे जग मोबाइलच्या रूपात तळहातावर आले. संपर्क वाढला. परंतु या सहज उपलब्ध झालेल्या माध्यमाचा उपयोग आपली जनता ज्ञान वाढवण्यासाठी नव्हे तर बुवा, बाबांचे चमत्कार, देवी-देवतांचे फोटो, गुड मॉर्निंग, गुड नाइट संदेश यासाठी आणि हे सारे विज्ञान आणि तंत्रज्ञान आपल्याकडे हजारो वर्षांपूर्वीच अस्तित्वात होते बादरायण संबंध जोडून पटवून देण्यासाठी करते आहे. डॉ. दाभोलकर म्हणत, माणसाने विज्ञानाची सृष्टी घेतली, दृष्टी नाही. आजही स्थिती तशीच आहे. नवनवीन 'चमत्कारी' बुवा, बाबा, अम्मा उदयास येत आहेत. सोशल मीडियावर आणि प्रत्यक्ष त्यांना लक्षावधी अनुयायी लाभत आहेत. त्यांच्या दरबारात चेंगरा-चेंगरी होऊन भक्त मरत आहेत. त्यांच्या चमत्कारांचा महा. अंनिससह अनेक संघटना भांडाफोड करीत आहेत. बुवांना लाखो रुपयांच्या रकमेचे आव्हान देत आहेत. परंतु वैज्ञानिक दृष्टीच्या अभावामुळे बुवा-बाबांचा अंमल वाढत आहे. नवी मुंबईसारख्या शहरात एक उच्चशिक्षित वकिलास एका भोंदूबुवाने २० लाखांचा गंडा कसा घातला तो प्रातिनिधिक उदाहरणाचा वृत्तान्त या अंकातच आहे. वृत्तपत्र किंवा टी.व्ही. वाहिन्यांवर दृष्टिक्षेप टाकल्यास दर दिवसाआड एखादी तरी अशी घटना घडल्याची बातमी असते. या बातम्या फक्त नोंद झालेल्या गुन्ह्यांच्या आहेत. बुवा आपले काही बरे-वाईट करेल, आपली नाचक्की होईल या भीतीने तसेच पुरावे नसल्याने नोंदल्या न गेलेल्या घटना तर अनेक असतात.

या व्यतिरिक्त, छद्मविज्ञानावर आधारित फसवणुकीचे प्रकार तर असंख्य आहेत. आपली संघटना आणि अन्य विवेकवादी संघटनांची ताकत कमी पडते असे वाटत असले, तरी समाजाच्या भल्यासाठी हा लढा अखंड चालू ठेवलाच पाहिजे. या चमत्कार सत्यशोधन दिनी आपण सारे यासाठी संकल्प करू या. विवेकाचा आवाज बुलंद करू या!

**उत्तम जोगदंड**

अतिथी संपादक

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



# वाढत्या आव्हानांना सामोरे जात डॉ. दाभोलकरांना अभिवादन करु या!

**संजय बनसोडे ।** इस्लामपूर (सांगली)
मो. ९५५०८९९७१३

९ ऑगस्ट, १९८९ रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी केली. या विवेकी चळवळीची ३६ वर्षांची वाटचाल निश्चितच प्रेरणादायी आहे. हा स्थापना दिवस कार्यकर्त्यांनी संपूर्ण राज्यभर मोठ्या उत्साहात साजरा केलेला आहे. या निमित्ताने संघटनेचा ३६ वर्षांचा प्रवास, संघर्ष सर्व नागरिकांना कळावा यासाठी शाखा व जिल्हा स्तरावर स्नेह मेळावे, प्रबोधनाच्या कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. संघटनेच्या विस्ताराचा भविष्यवेध घेतला गेला.

महा. अंनिसच्या कामाची निकड सातत्याने वाढते आहे. आपल्या दैनंदिन जगण्यामध्ये आधुनिक विज्ञानाचा वापर आला, मात्र विचार आणि आचारांमध्ये मात्र वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव असल्याने अजूनही अंधश्रद्धेचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडताना दिसतात, ही चिंतेची बाब आहे. त्यासाठी नुकत्याच घडलेल्या काही घटना सांगतो.

**घटना क्रमांक १ :** सत्तरी ओलांडलेले एक सेवानिवृत्त शिक्षक माझा पत्ता शोधत माझ्याकडे आले. माझी तक्रार घ्या, माझ्यावर भानामतीचे प्रयोग सुरू आहेत, मला खूप त्रास होत आहे, असे ते सांगत होते. माझ्या शेजाऱ्याने भानामतीचा संच आणला आहे. त्या संचातून तो माझ्या दिशेने टोकदार बाण सोडतो, ते भिंतीतून आरपार येतात, मला ते टोचतात, वेदना होतात. पण जखम दिसत नाही ते आजोबा सांगत होते. काही वेळा या भानामतीमुळे मला काही अज्ञात शक्ती येऊन चिमटे काढतात. ही भानामती एक दिवस माझे हृदय बंद पाडेल, अशी भीती ते व्यक्त करीत होते. त्यांच्या बंगल्यात ते एकटेच राहतात. पत्नीचे निधन झाले आहे. मुलगा, मुलगी दुसरीकडे राहतात. माझ्या परीने समजावून सांगण्याचा खूप प्रयत्न केला पण ते त्यांच्या म्हणण्यावर ठाम होते. अशा चुकीच्या संकल्पना मनामध्ये किती खोलवर घर करून आहेत. त्यामुळे अशा अंधश्रद्धांना बळी पडण्याचे प्रमाण वाढत आहे. मी त्यांच्या मुलास या आजोबांना मानसोपचार तज्ज्ञांकडे घेऊन जाण्यास सांगितले आहे.

**घटना क्रमांक २ :** वर्धा जिल्ह्यातील गोविंदपूर गावात एका शेतकरी कुटुंबाची काही भोंदू बाबांनी लाखो रुपयांची फसवणूक केली. या शेतकरी दांपत्याच्या लग्नाला पाच वर्षे झाली तरी मूल होत नाही म्हणून नंदीबैल घेऊन आलेले दोघे आणि बुवाबाजी करणारा त्यांचा साथीदार यांनी या शेतकऱ्याला गंडा घातला. त्याच्या घरात गुप्तधन असल्याने त्यांना मूल होत नाही, असा अजब निष्कर्ष काढून त्या बाबत पूजा घालण्यासाठी २१ लाख रुपये घेतले. त्या सोबत त्या महिलेचे दागिनेही लंपास केले. ही पूजा केल्यावर करोडो रुपयांचे गुप्तधन मिळेल आणि मूल ही होईल या आमिषाला हे शेतकरी कुटुंब बळी पडले. सदरचा गुन्हा पोलिसात दाखल झाला आहे. वैद्यकशास्त्रात एवढी प्रगती झालेली असताना, नवसाने मूल होणे, पूजापाठ करून मूल होणे, अशा भ्रामक गोष्टींवर आजही लोक विश्वास ठेवतात हे अयोग्य आहे. वरील प्रसंग प्रातिनिधिक स्वरूपाचे आहेत. अशा असंख्य घटना आपल्या अवतीभोवती सतत घडताना दिसतात. अशा अंधश्रद्धांचे निर्मूलन करण्याचे काम समितीचे कार्यकर्ते प्रामाणिकपणे करतात. महा. अंनिस मध्ये मध्यमवर्गीय नोकरदारांची संख्या लक्षणीय आहे. रविवार किंवा सुट्टीचा दिवस हा संघटनेच्या कामाला कारणी लावण्याचा निर्धार संघटनेचे असंख्य कार्यकर्ते करीत आहेत. शाखा भेटी करणे, प्रशिक्षणे घेणे ही कामे सुट्टीच्या दिवशी संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते करीत आहेत. कार्यकर्त्यांच्या कामाप्रति असणारी धडपड कौतुकास्पद आहे.

संघटनेच्या विज्ञानबोध वाहिनी विभागामार्फत फिरत्या नभांगणाचा उपक्रम कार्यान्वित झाला याचा नितांत आनंद होत आहे. खगोल विज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अत्यंत उपयुक्त असा हा वैज्ञानिक उपक्रम आहे. लातूर जिल्ह्यात या उपक्रमास उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. विवेकवाहिनीचा उपक्रम पुन्हा जोमाने सुरू झाला आहे. संघटनेतील विविध विभाग उत्साहाने कार्यमग्न.

पुण्यातील कोथरूड पोलिसांच्या अन्यायी वर्तनाचा व भूमिकेचा संघटनेने जाहीर निषेध करून न्यायासाठी आंदोलन करणाऱ्या तरुणींच्या पाठीशी आहोत हा संदेशही दिला आहे. नुकतीच अत्यंत अस्वस्थ करणारी बातमी कळली आहे की या अन्यायग्रस्त तरुणींना न्याय द्यायच्या ऐवजी उलट त्या तरुणींवरच पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

२० ऑगस्ट, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या बाराव्या बलिदान दिनानिमित्त राज्यभर निर्धार सभा, निर्भय मॉर्निंग वॉक, अभिवादन सभा, प्रबोधनाची व्याख्याने आयोजित केली आहेत. मी स्वतः आणि आपले अध्यक्ष माधव बावगे या दिवशी महर्षि विठ्ठल रामजी शिंदे पुलावर गेलो आणि शेकडो कार्यकर्त्यांसह त्यांना अभिवादन केले. २० ऑगस्ट या दिवशी राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टीकोन दिन संपूर्ण देशभर साजरा केला जात आहे. विवेकाची पताका खांद्यावर घेऊन महा.अंनिसचे कार्यकर्ते विवेकाचा आवाज बुलंद करीत आहेत.



# सामाजिक मुक्तीचे आजचे संदर्भ

**प्रा. डॉ. संजय सावळे** । नाशिक
मो. ९४२३२०८९२२

सामाजिक क्षेत्रात विकास, सबलीकरण, सक्षमीकरण, सामाजिक कल्याण अशा संकल्पना आलेल्या असल्या तरी या संकल्पनांनी अलीकडच्या काळात, १९७०-८०च्या दशकात प्रभावी असलेल्या सामाजिक मुक्तीचे चर्चाविश्व पुसट बनवले आहे. सामाजिक मुक्तीचे चर्चाविश्व आजही तितकेच महत्त्वाचे आहे जितके ते पुनर्जागरण (Renaissance) काळात होते. आता आजच्या संदर्भात ते मांडले गेले पाहिजे आणि त्याचा पाठपुरावा केला पाहिजे.

सामाजिक मुक्ती (Social Emancipation) संकल्पनेच्या अनेक छटा अनेक शतकांपासून अस्तित्वात आहेत. धर्माच्या संदर्भातील मुक्ती हा तिच्या उगमाचा मार्ग असावा. जन्मजन्मांच्या फेऱ्यांपासून मुक्तीच्या (मोक्ष - हिंदू, जैन), (निर्वाण-बौद्ध), (Salvation-ख्रिश्चन) धार्मिक छटा, ऐहिक जगातील कर्म, पुनर्जन्म, पाप - पुण्य या संकल्पना बंधन-चौकटीतून मुक्ती दर्शविणाऱ्या आहेत. यानंतर पुनर्जागरण (रेनेसाँ) काळात सामाजिक मुक्तीची संकल्पना मानवतावादाच्या व्यापक चळवळीशी जोडली गेली की, ज्यामध्ये व्यक्तीच्या क्षमता आणि बदल घडवण्याच्या त्याच्या साधनांवर (एजन्सीवर), माध्यमांवर भर देण्यात आला होता. मानव जगाच्या केंद्रस्थानी आहे. त्याने शिक्षण, शास्त्र, कला, साहित्य आणि विज्ञानातील मानवी कामगिरीद्वारे याच जीवनातील मुक्ती मिळविली पाहिजे, असे म्हटले गेले. प्रबोधन/ज्ञानोदय (Enlightenment) काळात मुक्तीची कल्पना व्यापक तात्त्विक चळवळीशी जोडली गेली. यामध्ये मुक्ती म्हणजे व्यक्तीवर परंपरेने लादलेल्या आणि विनाविवेक स्वीकारलेल्या अज्ञानाच्या किंवा वर्तनाच्या बंधनातून, कर्मकांड अधीनतेपासून ज्ञान आणि तर्कशक्तीचा वापर करून मुक्त होणे अभिप्रेत होते. येथे सर्वत्र मुक्ती कल्पना या व्यक्तिगत बदलांशी संबंधित होत्या.

जातिव्यवस्था, गुलामगिरी, वेठबिगारी, वर्ग अशा अनेक बंधनचौकटी केवळ व्यक्ती नव्हे तर समाजरचनांवर आधारित होत्या. अशा काही बंधनचौकटी अजूनही आहेत. त्यांची चर्चा आधुनिक काळात प्रामुख्याने झाली. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय यांसारख्या आदर्श मूल्यांवर आधारित परिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया अथवा कृती म्हणून सामाजिक मुक्तीचे स्वरूप पुढे आले.

भांडवलशाही समाजव्यवस्थेत कामगार वर्गाचे शोषण, दैन्य असे बंधनचौकटीचे नवे, अधिक गंभीर स्वरूप कार्ल मार्क्स यांनी दाखवले. मार्क्स यांनी १८४४ च्या त्यांच्या 'ऑन द ज्यूइश क्वेश्चन' या निबंधात मुक्ततेवर चर्चा केली. अर्थात, त्यावेळी मुक्तीचे प्रारूप प्रामुख्याने राजकीय स्वरूपाचे होते. सामाजिक मुक्तीचा विचार मार्क्स यांनी नंतरच्या काळात आणखी व्यापक अर्थाने मांडला.

'फ्रँकफर्ट स्कूल' हे मार्क्सवादाने प्रभावित संशोधक-अभ्यासकांचे जर्मनी आणि अमेरिकेतील अभ्यास केंद्र. फ्रँकफर्ट स्कूलच्या चिकित्सात्मक सामाजिक सिद्धांताच्या प्रकल्पात मुक्तता नेहमीच केंद्रस्थानी राहिली आहे. फ्रँकफर्ट स्कूलचा एक विचारवंत मॅक्स हॉर्खायमरच्या प्रसिद्ध विधानात, चिकित्सात्मक सिद्धांताचे ध्येय स्पष्ट झाले आहे. ते म्हणतात, 'केवळ मुक्ती म्हणजे काय किंवा कोणत्या परिस्थितीत मुक्ती शक्य आहे हे समजून घेणे एवढेच आपले सैद्धांतिक उद्दिष्ट नाही, तर 'गुलामगिरीतून माणसाची मुक्ती' कशी साध्य होईल हे महत्त्वाकांक्षी, व्यावहारिक उद्दिष्ट चिकित्सात्मक सामाजिक सिद्धांताने ठेवलेले आहे.' (हॉर्खायमर, १९७२:२४६)

सामाजिक बंधनचौकटी किंवा नवी गुलामी कशी निर्माण होते याबाबत फ्रँकफर्ट स्कूलच्या चिकित्सा सिद्धांताने स्पष्टीकरण केले आहे. त्यापुढे जाऊन त्याच्या गुंतागुंतीचे विश्लेषणही केलेले आहे. सामाजिक संबंधांतील वर्चस्व आणि दडपशाही यांच्यामुळे गुलामीच्या बंधनचौकटी आकाराला येतात. त्यांची रचनात्मक मांडणी समाजात नियम, कायदे, रितीरिवाज यांच्या स्वरूपात बनवली आणि टिकवली जाते. यामुळे मानवाची मुक्ती प्राप्त करण्याची इच्छा आणि कृती प्रभावित होतात, कमी होतात. परिणामी असे सामाजिक प्रश्न, अशा

समस्या निर्माण होतात की, ज्या समाजातील बिघाड दर्शवतात.

**सामाजिक मुक्तीची व्याख्या**

'प्रत्येक मुक्ती म्हणजे मानवी जगाची आणि स्वतः माणसाची इतर माणसांशी असलेल्या मानवी संबंधांची पुनर्स्थापना अधोरेखित करते. मानवी मुक्ती तेव्हाच पूर्ण होईल जेव्हा माणूस स्वतःमध्ये असा अमूर्त नागरिक घडवेल की जो त्याच्या दैनंदिन जीवनात, त्याच्या कामात आणि त्याच्या नातेसंबंधांमध्ये, स्वतःच्या शक्तींना सामाजिक, राजकीय शक्ती म्हणून ओळखेल आणि संघटित होईल.' (मार्क्स/एंगेल्स : १९५६). मार्क्स, एंगेल्स यांची ही व्याख्या मानव आणि समाज यांच्या सुदृढ नात्यावर, मानवी जीवनाच्या स्वातंत्र्यावर आणि अर्थपूर्णतेवर भर देते.

मुक्तीची वरील संकल्पना एका विशिष्ट प्रकारच्या सामाजिक परिवर्तनाचा संदर्भ स्पष्ट करते. मुक्तीचा विषय व्यक्तिगत किंवा सामाजिक, गट पातळीवरचा असू शकतो; परंतु मुक्तीचा उद्देश नेहमीच संबंधित व्यक्ती किंवा गट ज्या स्थितीत किंवा नातेसंबंधात गुंतलेला असतो, त्यामधील परिवर्तनाशी जोडलेला असतो. अधिक स्पष्टपणे सांगायचे तर, मुक्तीच्या संकल्पनात्मक रचनेत वर्चस्वाचे सामाजिक संबंध आणि त्यांच्याशी निगडित कृतीचा मार्ग, अशा दोन्हींमधील बदल समाविष्ट आहेत. या प्रक्रियेत बंधनचौकट निर्माण करणारे संबंध नष्ट होतात आणि एक नवीन, बंधनचौकट मोडणारी पर्यायी संबंधरचना आकाराला येते. ही स्वातंत्र्याची स्थिती म्हणजेच मुक्ती होय. (इब्सेन माल्टे फ्रोस्ली : २०२३)

केंब्रिज डिक्शनरीमध्ये 'मुक्ती' म्हणजे केवळ 'सामाजिक किंवा राजकीयदृष्ट्या मर्यादित नसून त्यापेक्षा व्यापक गोष्ट आहे असे परिभाषित केलेले आहे. अशा प्रकारे महिलांच्या मुक्तीत धार्मिक, कायदेशीर, आर्थिक आणि लैंगिक छळापासून मुक्तता, उच्च शिक्षणाची उपलब्धता आणि मर्यादित लिंगभाव आधारित भूमिकांपासून सुटका अशा अनेक बाबींचा समावेश होतो.

**सामाजिक मुक्ती कोणाची? कोणापासून?**

आजच्या काळात बंधनचौकटी कोणत्या आणि त्यातील अडकलेले गुलामसदृश कोण हा कळीचा प्रश्न आहे. स्वातंत्र्य मिळाले, गुलामी संपली; आता कुठल्या मुक्तीची चर्चा करीत आहात असा आक्षेप येऊ शकतो. गुलामीची नवी प्रारूपे अस्तित्वात नाहीत असे ठामपणे आपण कसे म्हणू शकतो? मानवी जगणे, शाश्वती, सुरक्षा, अधिकारांपासून आणि प्रतिष्ठा यापासून खूप दूर असलेले समाजघटकही आपल्याला नव्या गुलामीची प्रारूपे दर्शवतात. व्यक्ती कितीही गुणवान असली, क्षमतांनी युक्त असली, तरीही गुलामीच्या या प्रारूपांमध्ये ज्या बंधनचौकटी आहेत त्यातून ती बाहेर पडू शकत नाही, अशा या व्यवस्थाबद्ध बंधनचौकटी आहेत. व्यवस्थाबद्ध बंधनचौकटीत कोणते समाजघटक अडकलेले आपल्याला दिसून येतात? पितृसत्तेत अडकलेले स्त्री-पुरुष, सांस्कृतिक वर्चस्व झेलणारे, हंगामी-अस्थिर नोकरी आणि उपजीविकांच्या प्रश्नाने बेजार झालेले, स्थलांतर आणि बेकारीच्या प्रश्नांनी पीडित, अफाट कष्ट आणि गुंतवणूक करूनही त्याचा वाजवी मोबदला न मिळणारे शेतकरी व श्रमिक स्त्री-पुरुष, वाढत्या जातीय व आर्थिक विषमतेच्या झळांनी पीडित, पर्यावरणाच्या प्रश्नात होरपळलेले आदिवासी व भटके-विमुक्त, अल्पसंख्याक, दलित, ग्रामीण यांसारखे अनेक घटक व्यवस्थाबद्ध बंधनचौकटीत अडकलेले दिसून येतात. म्हणूनच हे सर्व पीडित घटक आजही सामाजिक मुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत. या प्रत्येक पीडित, वंचित घटकाचा मुक्तिविरोधक घटक (Anti-thesis) त्यांच्या समोरच्या विरोधी तथा शोषक समूहात (Counterpart) दडलेला आहे. या शोषक घटकाला सामाजिक संरचनेची, त्यातील सामाजिक संस्थांची साथ आहे. उदा. 'मासूम, (पुणे ग्रामीण)' या महिला प्रश्नांवर अर्धशतकापासून काम करणाऱ्या संस्थेच्या डॉ. मनीषा गुप्ते म्हणतात, 'पितृसत्ता आणि जातव्यवस्थेचे दैनंदिन पातळीवर पुनरुज्जीवन होत असते, त्यांचे बळकटीकरण होत असते.' (मनीषा गुप्ते : २०२३:२३-२७). पुरुष, भांडवलदार, शहरी लोक, बिगर आदिवासी, वरच्या जातींचे अशा सर्वांना सरसकट विरोधी घटक (Anti-thesis) म्हणता येणार नाही. उदा. पितृसत्तेचे पुनरुज्जीवन स्त्रियांकडूनही होत असते. आदिवासी मंत्री आदिवासींच्या हिताविरोधी निर्णय घेताना दिसतो. अशा वेळी त्या त्या व्यक्ती या वैयक्तिकरीत्या दोषी नसून व्यापक वर्चस्वव्यवस्था कार्यान्वित करणारे, तिला पाठबळ देणारे दोषी असतात आणि ही व्यापक वर्चस्वव्यवस्था व्यक्ती, संस्था, नियम, कायदे, जातपंचायती, धर्म मांडणारे व त्याआधारे शोषण करणारे, शाळा, शिक्षणसंस्था, कुटुंबसंस्था यातून विषमता, दुही व

द्वेष पेरणारे, धार्मिक ध्रुवीकरण करून विद्वेष पसरवणारे, त्यांच्या परंपरांचा आग्रह धरणारे, अशा अनेक दृश्य-अदृश्य सर्व बाबी कळतनकळत नवी गुलामी घडविणाऱ्या व पुनरुज्जीवित करणाऱ्या असतात. त्यातून वर्चस्व लादणारे आणि वर्चस्व झेलणारे, शोषक आणि शोषित, संकटे निर्माण करणारे आणि त्याचे बळी ठरणारे असे परस्परविरोधी भेदगट तयार होतात. वर्चस्व लादणारे, शोषक, संकटे निर्माण करणारे व्यक्ती म्हणून क्वचितच समोर येतात. त्यांच्या हितसंबंधांची यंत्रणा कशी तयार होते, कशी काम करते, कशी सतत बदलत राहते याचा अभ्यास करण्यातूनच कुणाची, कुणापासून मुक्ती हवी हे शोधता येईल.

**सामाजिक मुक्ती कशी?**

सामाजिक मुक्ती प्राप्त करण्याची प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची, अवघड असू शकते. शंकर गुहा नियोगी हे झारखंडमधील एक कृतिशील अभ्यासक होते. त्यांनी 'संघर्ष आणि निर्माण' अशी परिवर्तन प्रक्रियेतील दोन कृतिमार्गांची चर्चा पुढे नेली. सामाजिक मुक्ती प्राप्त करण्यासाठी 'संघर्ष आणि निर्माण' या दोन मार्गांचा वापर केला गेला आहे. पुढेही करता येईल.

**नागरी समाजाचा संघर्ष आणि निर्माण**

सामाजिक संघटना, स्वयंसेवी संघटना, बिगरशासकीय संघटना, सामाजिक कृती गट, सामाजिक चळवळी असे सरकार आणि बाजारपेठेपासून अलिप्त पण परिवर्तन घडवणारे घटक नागरी समाज (Civil Society) म्हणून ओळखले जातात. 'संघर्ष आणि निर्माण' या दोन्ही प्रक्रियांमध्ये ते महत्त्वाची भूमिका बजावतात.

सामाजिक वर्चस्व आणि बंधनचौकटी जगभरात जात, लिंगभाव, वर्ग, वर्ण, प्रांत, भाषा, विकास, अस्मिता, सत्ता अशा अनेक आधारांवर विविध स्वरूपात अस्तित्वात आहेत. गुलामी, वर्चस्व लादणारे आणि वर्चस्व झेलणारे परस्परविरोधी भेदगट अनुभव, अभ्यास आणि विचारप्रणालीच्या आधारे मांडून महात्मा फुले यांनी उभी केलेली सत्यशोधक चळवळ हे मुक्तीसाठीच्या संघर्षाचे एक महत्त्वाचे उदाहरण म्हणता येईल. महात्मा फुल्यांनी हा संघर्ष स्त्री, शूद्र, अतिशूद्र यांच्या मुक्तीचा संघर्ष म्हणून मांडला. मुक्तीची उद्दिष्ट्ये व्यापक असतील तर कृतीचा विस्तार विविधांगी आणि व्यापक असणे आवश्यक असते, याचे भान ठेवून मुक्तीसाठी क्रांतिकारी आंदोलन महात्मा फुले आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून निर्माण झाले. जातीय, सांस्कृतिक आणि आर्थिक शोषण, जमीन, शिक्षण, शेतकरी-कामकरी, महिला यांचे मुद्दे घेऊन आणि सावकार, व्यापारी, ब्राह्मण पुजारी आणि सरकारी अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या शोषणाच्या मुद्द्यांवर एकत्रितपणे संघर्षकृती तयार करण्यात आली. पर्यायी, मुक्तिदायी अशा 'सत्यसमाज आणि बळीराज्याची' मांडणी करून त्याच्या उपलब्धीसाठी ब्राह्मणशाही, पितृसत्ता, वसाहतवाद यांच्याविरूद्ध संघर्ष आणि बहुजनांचे शिक्षण, पर्यायी संस्कृती आणि सत्यधर्माची स्थापना याद्वारे निर्माणाचे कार्य या लढ्यात समाविष्ट होते. हेच आंबेडकरी चळवळीत आणि गांधी व इतरांच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य चळवळीतही वेगळ्या स्वरूपात पाहायला मिळाले. डॉ. आंबेडकर यांच्या चळवळी जातिव्यवस्था बदलाने सुरू होतात; शिक्षण, संघटन, संघर्षाने पर्याय देतात. पण येवल्याच्या सभेतील 'हिंदू म्हणून मरणार नाही' या घोषणेनंतर 'मुक्ती कोन पथे' (मुक्ती कोणत्या मार्गाने) या परिसंवादात ते धर्मांतराचा पर्याय देतात.

आदिवासींची आंदोलने, बिरसा मुंडा यांचे बंड, गोदुताई परुळेकर यांच्या नेतृत्वाखालील वारल्यांची चळवळ, शेतकरी आंदोलने, दलित चळवळ, दलित पॅन्थर, जयप्रकाश नारायण यांचे संपूर्ण क्रांती-बिहार आंदोलन, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, अलीकडचे निर्भया आंदोलन आणि अशी आणखी काही उदाहरणे 'संघर्ष आणि निर्माण' या दोन्ही प्रक्रियांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारी आहेत असे म्हणता येईल.

आंतरराष्ट्रीय पातळीवर अशा अनेक मुक्तिसंघर्षांची साखळी रस्त्यावर दिसली, दिसत आहे. त्यामध्ये आफ्रिकन-अमेरिकन यांचा गुलामीविरोधातील लढा, गुलामगिरीतून मुक्तीचा एल्गार १८६३, 'ब्लॅक लाईव्हज मॅटर', लेक वालेसा यांच्या नेतृत्वाखालील पोलंडमधील दृढैक्य चळवळ (Solidarity Movement) की, जी १९८० च्या दशकात उदयास आलेली सोव्हिएत साम्यवादी वर्चस्वविरोधी चळवळ होती, अमेरिकन नागरी हक्क चळवळ, महिला मताधिकार चळवळ, वर्णभेदविरोधी चळवळ, LGBTQIA+ हक्क चळवळ, पर्यावरणाच्या चळवळी, विविध निर्वसाहतीकरण आणि खाउजा धोरणाला विरोध करणाऱ्या चळवळी, पर्यायी आंदोलने व संघर्ष आणि अशीच इतर अनेक आंदोलने, लढे आणि चळवळींचा यात समावेश होईल.

'संघर्ष आणि निर्माण' आधारित कृतींना प्रश्नांचा

अभ्यास आणि पर्यायांचे संशोधन आवश्यक असते. बंधनचौकटीतील समुदायांना आपल्यावरच्या बंधनचौकटीची जाणीव किंवा ओळखच नाही असे अनेक समुदाय अजूनही अस्तित्वात आहेत. प्रश्नांचा अभ्यास करणे हाच त्यांचा पहिला टप्पा असेल. पर्यायी अवकाशाचा शोध आणि कृती हे मुक्तीचे पुढचे टप्पे असतील. अशा कृतीमध्ये राज्याची धोरणे, योजना, प्रचलित व आक्षेपार्ह विकास, विषमता, भेद-तिरस्काराची यांचा समावेश असेल.

वर्चस्वचौकट शक्तिशाली, ताठर अशी राहिल्यामुळे मुक्ती अवघड बनते. इतर संस्थांची, नियमांची, सामाजिक भांडवलाची साथ आणि अर्थव्यवहाराची अनुकूलता अशा बाबी या वर्चस्वचौकटीला आणखी मजबूत बनवतात. त्याच्या जोडीला विचारप्रणाली, धर्म, आदर्श, ज्ञान, तंत्रज्ञान अशा आधारावरील मान्यता यांची वर्चस्वचौकटीला आणखी ताकद मिळते. लोकांनी हे वर्चस्व अविरोध स्वीकारावे असे वातावरण तयार केले जाते. वर्चस्व नियमित व्हावे, सहज स्वीकारले जावे आणि मानसिक पातळीवर गुलामी स्वीकारली जावी अशी व्यवस्था निर्माण केली जाते. यालाच इटालियन विचारवंत अन्तानिओ ग्रामसी 'हेजीमनी' (वर्चस्ववाद/धुरिणत्व) असे म्हणतात. या सर्व यंत्रणा व घटकांविरुद्धच्या कृतींनी, संघर्षाने, बदलाने आणि निर्माणाने मुक्तीची प्रक्रिया सुरू होते.

संशोधक, कार्यकर्ते, परिवर्तनकृतीतील लोक यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील अशा अभ्यासाची व कृतीची आखणी, अंमलबजावणी केली पाहिजे. त्यासाठीचे आजच्या बंधनचौकटीबाबत जनमत घडवणे, संघटन बांधणे, कृती चळवळी, बदल घडवणारे छोटे प्रयोग करणे असे अनेक कृतिकार्यक्रम समोर येतात. बंधनचौकटीतील लोकांचे जीवन, प्रश्न, त्यांचा सहभाग मिळवण्याचे व त्यांना ताकद देण्याचे कौशल्य, विरोधकांवर बदलासाठी दबाव बनवण्याचे कौशल्य, फेक नॅरेटिव्ह खोडून काढण्याची आणि सत्य मांडण्याची साधने व कौशल्ये तसेच सामूहिक कृती असे सगळेच मुद्दे महत्त्वाचे आहेत.

वर्चस्वचौकट बळाच्या जोरावर राबवणारे घटक समानता, स्वातंत्र्य आणि मानवता यांना अनेक हेतूंनी व बहाण्यांनी नाकारत असतात. त्याच मुद्द्यांच्या मूल्य आधारांनी, घटनात्मक आदर्शांनी मुक्तीचे पर्याय पुढे येतील. विविध प्रश्नांवर मुक्तीच्या दिशेने काम करणारे घटक जेव्हा आंतरछेदक संवाद, संघटनकृती आणि समवेदना निर्माण करतील तेव्हा हे काम आणखी प्रभावी होईल.

स्वत: स्त्रीवादी असणाऱ्या दीपा रंगनाथन म्हणतात, 'एका विशिष्ट अनुभवासोबत, एका विशिष्ट संघर्षासोबत, एका विशिष्ट चळवळीसोबत कार्यकर्ती म्हणून मला वाटणारी आस्था-एकता मला महत्त्वाची वाटतेच. पण पुढे कळले की, मी स्त्रीवादी म्हणून माझ्या कोशात होते. उदाहरणार्थ, पर्यावरणाच्या प्रश्नांचे माझ्याशी काय नाते असे वाटायचे. परंतु माझ्या कामातून आणि एका अनुभवातून मला हे समजले की पर्यावरणाचे प्रश्न दूरचे प्रश्न नाहीत. मी ज्यांना 'माझे प्रश्न, माझी चळवळ' म्हणून दावा करते त्यांच्याशी ते अविभाज्यपणे जोडलेले आहेत. पर्यावरणीय कारणाने स्त्रीवादी असणाऱ्या बर्टाच्या हत्येने मला हादरवून टाकले, तसेच लॅटिन अमेरिकेतील माझ्या स्त्रीवादी आणि पर्यावरणवादी मित्रांनाही हादरवून टाकले. मला माहीत आहे की, तिच्या न्यायासाठीचा संघर्ष तेव्हाच पूर्ण होईल की, जेव्हा स्त्रीवादी लोक त्यात सामील होतील, सक्रिय होतील. विविध चळवळींचे परस्परांशी नाते, सुसंवाद, सहकार्य ठेवणे महत्त्वाचे आहे. ऐक्यभाव अथवा दृढैक्यता (Solidarity) ही 'माझ्या' विरुद्ध 'तुमच्या' सक्रियतेच्या विभागणीला नाकारते. समवेदना वाढवते. त्यांचे कौतुक करते, त्याला अभिवादन करते. मुक्तीच्या लढ्यात हे महत्त्वाचे आहे.'

**(लेखक निवृत्त प्राध्यापक आणि सामाजिक विषयांचे अभ्यासक आहेत.)**

●

**महा. अंनिसच्या वेबसाइटला जरूर भेट द्या.**
**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे ऑगस्ट २०२५ पर्यंतचे अंक या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.**
**वेबसाईटची लिंक**
**https://www.mans.org.in**



# सर्वोच्च कोण : संसद की संविधान?

**डॉ. राजेंद्र शेजुळ ।** छ. संभाजीनगर
मो. ९४०४६१४६७१

मागील काही दिवसांपासून संसद आणि सर्वोच्च न्यायालय या दोन घटनात्मक संस्थांच्या दर्जाबाबत वाद निर्माण करण्यात येऊन संसद सर्वश्रेष्ठ असल्याचा दावा करण्यात येत आहे. मोदी सरकारच्या पहिल्या कार्यकाळात न्यायालयीन सक्रियतेवरून सुरू झालेला हा वाद अलीकडच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने वक्फ दुरुस्ती कायद्यातील काही तरतुदींना दिलेली स्थगिती व कायदेमंडळाने पारित केलेल्या कायद्यांना राज्यपाल आणि राष्ट्रपतींनी निश्चित कालावधीत संमती देण्यासाठी घालून दिलेली कालमर्यादा, यावरून अधिक चिघळला असून घटनात्मक पदावर असलेल्या व्यक्तींसह अनेकांनी सर्वोच्च न्यायालयापेक्षा संसद श्रेष्ठ असल्याचा दावा सुरू केला आहे. असे होण्याची ही पहिलीच वेळ नाही. इंदिरा गांधींच्या कार्यकाळातसुद्धा न्यायव्यवस्थेस मर्यादित करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. न्यायव्यवस्था 'समर्पित' असावयास हवी अशा प्रकारची भूमिका त्यावेळी सरकारच्या बाजूने घेण्यात आली होती. म्हणजे नायव्यवस्थेने सरकारच्या विरोधात नव्हे तर सरकारला पूरक होईल अशा पद्धतीने काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. इंदिरा गांधींच्या कार्यकाळात संविधानात अनेक दुरुस्त्या करण्यात आल्यावर सर्वोच्च न्यायालयाने ताठर भूमिका घेऊन संसदेला संविधानात आमूलाग्र बदल करण्याचा अधिकार नसून तो केवळ संविधानसभेला आहे, असे मत व्यक्त केल्याने पेचप्रसंग निर्माण झाला होता. त्यातून मार्ग काढण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानेच १९७३ सालच्या केशवानंद भारती खटल्यात मध्यममार्गी भूमिका घेऊन संसदेला संविधानाच्या कोणत्याही भागात दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे. मात्र संसद संविधानाची 'मूळ चौकट' मोडू शकत नाही, असे स्पष्ट करून वातावरण निवळवण्याचा प्रयत्न केला होता. संसद व सर्वोच्च न्यायालय यांच्यात दर्जावरून सुरू असलेल्या सुप्तसंघर्षाच्या पार्श्वभूमीवर सरन्यायाधीश भूषण गवईंनी मुंबईतील एका कार्यक्रमात या संघर्षाबाबत अप्रत्यक्ष भाष्य करताना कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ हे तिन्ही घटक 'समान' असल्याचे सांगून संविधानात्मक स्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजे ही तिन्ही शासनांगे संवैधानिकदृष्ट्या समान दर्जाची असून त्यांनी एकमेकांवर कुरघोडी न करता परस्परांचा सन्मान करणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर संसद व सर्वोच्च न्यायालय यांची संविधानात्मक स्थिती नेमकी काय आहे, हे जाणून घेण्यासाठी काही मुद्द्यांचा परामर्श घेणे आवश्यक आहे.

**संसद सर्वोच्च किंवा सार्वभौम आहे का?**

संसद ही 'सर्वोच्च किंवा सार्वभौम' असल्याचे गृहीतक हे ब्रिटिश संसदेच्या आधारे मांडले जात असल्याची शक्यता आहे. ब्रिटनमध्ये लिखित संविधान नसल्याने तेथे संसदेला कोणत्याही विषयावर व कोणत्याही स्वरूपाचा कायदा करता येतो. असे असले तरी तेथे 'जागरूक लोकमत' तसेच काही प्रथा आणि संकेत याद्वारे संसद मर्यादित होत असते. भारतीय संसद ही जरी ब्रिटनच्या संसदेची प्रतिकृती असली तरी ती ब्रिटनच्या संसदेप्रमाणे सर्वोच्च किंवा सार्वभौम नाही. कारण भारतात लिखित संविधान असून शासनाची तिन्ही अंगे संविधानाद्वारे निर्मित व नियंत्रित आहेत. त्यांना सत्ता व अधिकार संविधानाद्वारे प्राप्त होत असल्याने कोणतेही शासनांग संविधान मर्यादेचे उल्लंघन करू शकत नाही. येथे कोणी असा मुद्दा उपस्थित करू शकेल की, मग अनुच्छेद ३६८ मधील अधिकाराचे काय? कारण अनुच्छेद ३६८ मधील अधिकाराचा उपयोग करताना संसदेचे स्थान व दर्जा हा संविधानसभेसारखा होत असतो. संविधानातील ३६८ व्या अनुच्छेदातील अधिकाराचा उपयोग करताना संसदेचं स्थान हे तात्पुरते जरी संविधानसभेसारखे होत असले तरी संसद मनमानीपणे संविधान दुरुस्ती करू शकत नाही. कारण अनुछेद ३६८ मधील अधिकारांचा उपयोग करून संविधानातील कोणत्याही भागात दुरुस्ती करताना 'संविधानसभेला काय अभिप्रेत होते' हे लक्षात घेऊन व संविधानाच्या मूळ आशयाला धक्का न लावता संसदेला संविधान दुरुस्ती करावी लागते. म्हणजे संविधानाच्या मूळ चौकटीला धक्का लागणार नाही याची

खबरदारी घेऊन संसद संविधान दुरुस्ती करू शकते. कारण भविष्यकाळात निर्माण होणार असलेली संसद ही संविधान 'निर्माण' करणाऱ्या संविधानसभेपेक्षा श्रेष्ठ असणार नाही, हे खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले होते. ४ नोव्हेंबर, १९४८ रोजी संविधान मसुद्याचे विश्लेषण करताना ते म्हणाले होते की, संविधान निर्माण करताना संविधान सभेचा पक्षीय दृष्टीकोन नाही. एक उत्कृष्ट व कार्यकारी संविधान निर्माण करण्यापलीकडे तिचा अन्य कोणताही हेतू नाही. संविधानातील अनुच्छेदांचा विचार करताना विशिष्ट मापदंडांचा उपयोग करण्याची तिची दृष्टी नव्हती. भविष्यातील संसदेने जर संविधानसभेचं रूप धारण केले तर तिचे सदस्य पक्षीय दृष्टीकोन स्वीकारतील आणि पक्षीय कार्यक्रम अमलात आणण्याच्या उद्देशाने जे अनुच्छेद अडथळे ठरतात त्यात ते दुरुस्त्या करतील. संसदेपुढे स्थार्थी हेतू असू शकतो. संविधान सभेसमोर असा कोणताही हेतू नाही. संविधानसभा व भावी संसद यातील हा फरक आहे. भविष्यातील संसद कोणत्या पद्धतीने वागू शकेल याचा अंदाज घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संसदेच्या संविधान दुरुस्ती अधिकारावर एक प्रकारे मर्यादा घातल्याचे या स्पष्टीकरणाद्वारे अधोरेखित होते. संसद ही संविधानसभेला बांधील असून संविधानसभेद्वारा निर्मित संविधानाच्या अधीन आहे हा अर्थसुद्धा त्यातून ध्वनित होतो. १९७३ च्या केशवानंद भारती खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालातून ही बाब स्पष्टपणे अधोरेखित झाली आहे. कारण संविधानाची एक मूलभूत चौकट आहे आणि ती संसदेला संविधान दुरुस्ती करताना मोडता येणार नाही; हा सिद्धान्त या खटल्यातील निर्णयाद्वारे घालून देण्यात आला. या संदर्भात अलीकडेच घडलेली एक महत्त्वाची घटना म्हणजे संविधानाच्या प्रस्तावनेतील 'समाजवाद व धर्मनिरपेक्षता' हे मूल्यात्मक शब्द काढून टाकण्यात यावेत, अशी मागणी करणाऱ्या २०२४ सालच्या एका खटल्यात हे शब्द काढून टाकण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. मागणी करणाऱ्यांचा हेतू शुद्ध नाही हे कदाचित न्यायालयाच्या लक्षात आले असावे. कारण हे दोन्ही शब्द संविधानातील तत्त्वज्ञानाचा गाभा असून त्या गाभ्यास धक्का लावता येणार नाही, हेच न्यायालयाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. म्हणजेच संविधानाची श्रेष्ठता यावर न्यायालयाने पुन्हा एकदा मोहोर लावली आहे.

**सर्वोच्च न्यायालय : संघराज्याचा अम्पायर**

सर्वोच न्यायालयाच्या अभ्यासातून असे दिसून येते की, संविधानसभेने फार गंभीरपणे व आश्वासकरीत्या सर्वोच्च न्यायालयाविषयी तरतुदी केलेल्या आहेत. संविधानाचा भाष्यकार व संरक्षक तसेच 'मूलभूत अधिकारांचा विस्तार' या दृष्टीकोनातून संविधानसभेने सर्वोच्च न्यायालयाकडे पाहिले होते. (नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्याची जबाबदारी संविधानाद्वारे सर्वोच्च न्यायालयावर सोपविण्यात आलेली आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयास मूलभूत अधिकारांचा विस्तार असे समजले जाते.) देशात सामाजिक क्रांती घडवून आणून समतेवर आधारित समाज स्थापन करण्यासाठीचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून संविधानकारांनी सर्वोच्च न्यायालयाकडे पाहिले होते. म्हणजेच देशात सामाजिक व आर्थिक स्तरावर आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने वातावरण निर्माण करणे अपेक्षित आहे. नव्हे ती त्याची जबाबदारीच आहे आणि त्यासाठीच संविधान निर्मात्यांनी स्वतंत्र व स्वायत्त अशा सर्वोच्च न्यायालयाची निर्मिती केली आहे. संविधान निर्मात्यांच्या अपेक्षेप्रमाणे देशात सामाजिक व आर्थिक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी संवैधानिक व नागरी संस्थांना बळ पुरविण्याची जबाबदारी म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाची आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. सर्वोच्च न्यायालय हे भारतीय संघराज्याचेही संरक्षक आहे. देशात संघराज्य पद्धती टिकून राहून ती सुरळीतपणे चालण्यासाठी देखरेखीचे कार्य करण्याची जबाबदारी ही सर्वोच्च न्यायालयाचीच आहे. म्हणूनच संघराज्यात निर्माण होणारा कोणताही संवैधानिक पेचप्रसंग हा सर्वोच्च न्यायालयाद्वारेच सोडविला जातो. त्यासाठीच अनुच्छेद १३१ द्वारे त्यास आवश्यक ते अधिकार देण्यात आले आहेत. अनुच्छेद १४७ द्वारे संविधानाशी संबंधित सारभूत प्रश्न व तरतुदींचा अर्थ लावण्याचा व त्यावर भाष्य करण्याचा अधिकारही सर्वोच्च न्यायालयास बहाल करण्यात आलेला आहे. तसेच अनुच्छेद १३ (२) मधील न्यायालयीन पुनर्विलोकन अधिकाराचा उपयोग करून सर्वोच्च न्यायालय हे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाच्या संविधानबाह्य कृतींना निरस्त करू शकते. थोडक्यात, देशातील शासनकारभार हा संविधानानुसार होत आहे की नाही, यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी ही सर्वोच्च

न्यायालयाची आहे. ते संघराज्याचा अम्पायर आहे. या सर्व कारणांमुळे कदाचित सर्वोच्च न्यायालयाची बाजू काहीशी प्रबळ असल्याचे जाणवू शकते. मात्र हे सर्व अधिकार संविधानाच्या अधीन राहूनच वापरावयाचे असतात. हे विसरता येणार नाही. देशात ना संसद, ना सर्वोच्च न्यायालय, ना राष्ट्रपती तर संविधान हेच श्रेष्ठ असून लोकशाहीच्या तिन्ही स्तंभांनी म्हणजे कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ व न्यायमंडळाने आपापल्या मर्यादेत राहून काम करणे अपेक्षित आहे. कारण ही तिन्ही शासनांगे संविधानाद्वारे निर्माण झालेली असून दर्जाबाबत समांतर आहेत. त्यांना प्राप्त अधिकार हे त्यांनी संविधानाने घालून दिलेल्या मर्यादेत वापरून आपली भूमिका पार पाडावयाची असते. असे करताना इतर सत्ताघटकाच्या अधिकार क्षेत्रात हस्तक्षेप होणार नाही, याची खबरदारी घ्यावयाची असते. या तिन्ही सत्ताघटकांच्या सुचारूपणे काम करण्यावर भारतीय लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे. म्हणूनच संविधान निर्मात्यांनी त्यांच्यात योग्य समन्वय राखण्यासाठी सत्ता संतुलन सिद्धान्ताचा उपयोग केलेला आहे. म्हणजे ही तिन्ही शासनांगे परस्परांना नियंत्रित करीत असतात. उदाहरणार्थ, कायदे निर्माण करणे हे संसदेचे मुख्य कार्य आहे. मात्र कार्यकारी मंडळाच्या सहाय्याशिवाय संसद काहीही करू शकत नाही. संसदेचं अधिवेशन बोलाविणे, विधेयकाचा मसुदा तयार करणे हे कार्य कार्यकारी मंडळ करीत असते. इतकेच नव्हे तर प्रधानमंत्री संसद बरखास्त करण्याचा सल्ला राष्ट्रपतीस देऊ शकतात. राष्ट्रपतींच्या मान्यतेशिवाय संसदेने पारित केलेले विधेयक कायद्यात रूपांतरित होऊ शकत नाही. याउलट संसदेने कायदा केल्याशिवाय कार्यकारी मंडळ आपली कार्ये पार पाडू शकत नाही. संसदेचा विश्वास असेपर्यंतच कार्यकारी मंडळ सत्तेवर राहू शकते. तर संसद व कार्यकारी मंडळाच्या कार्याचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहे. संविधानाचा अधिक्षेप करणारे कायदे व निर्णय सर्वोच्च न्यायालय रद्दबातल करू शकते. तर याउलट न्यायाधिशांची नेमणूक ही कार्यकारी मंडळाद्वारे केली जात असते. (अलीकडे कॉलेजिअम म्हणजे न्यायवृंद पद्धतीमुळे त्यात बराच बदल झालेला आहे.) संविधानाचा भंग केल्याच्या कारणास्तव संसद महाभियोगाद्वारे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशास पदभ्रष्ट करू शकते.

या चर्चेचा मथितार्थ इतकाच की कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या तिन्ही शाखा संविधानाची निर्मिती असून संविधानाच्या अधीन आहेत. त्यामुळे संसद ही सर्वोच्च न्यायालयापेक्षा श्रेष्ठ आहे. कारण ती लोकांचे प्रतिनिधित्व करते, हा दावा संवैधानिकदृष्ट्या कुचकामी ठरतो.

**(लेखक विवेकानंद कला, एस. डी. वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयमध्ये राज्यशास्त्र विभाग प्रमुख आहेत.)**

●

## मनःपुर्वक आभार



सतीश खानोलकर, बँक ऑफ इंडिया कर्मचारी संघटनेचे धडाडीचे सेवानिवृत्त पदाधिकारी, आपले समविचारी हे 'अंनिप' कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड यांचे मित्र आहेत. गेल्या महिन्यात डोंबिवली येथे एका कार्यक्रमात दोघांची भेट झाली असता महा. अंनिसवर चर्चा झाली. आपल्या कार्याविषयी ते जाणून होतेच. या कार्यास आपला हातभार लागावा असे त्यांना प्रकर्षाने वाटत होते आणि या संघटनेस हातभार लावण्यासाठी देणगी द्यावी असे वाटत होते. त्यांनी आपल्या बँक खात्याची माहिती जोगदंड यांच्याकडून मिळवली आणि रू. २०,०००/- देणगी संघटनेस दिली. त्यांच्या कर्मचारी संघटनेने या पूर्वी आपल्या फिरते तारांगण प्रकल्पाच्या वेळीही मदत केली होती. सतीश खानोलकर यांच्यासारख्या विवेकी हितचिंतकांच्या मदतीमुळे कार्यकर्त्यांना प्रोत्साहन मिळत राहते. महा. अंनिसच्या वतीने सतीश खानोलकर यांचे मनापासून आभार !

# विवेकी समाजनिर्मितीत बुद्धिजीवी वर्गाची भूमिका



**संतोष चिकाटे ।** गडचिरोली
मो. ९४०४९९२३८२

समष्टी ही केवळ माणसांची एकत्रित वस्ती नसून, तो विचार, विवेक, मूल्ये, संस्कृती, परंपरा आणि आचारधर्म यांची एक गुंफण करीत विकसित होणारा मानवी समूह असतो. ही गुंफण किती समताधिष्ठित, विवेकाधारित आणि सर्वसमावेशक आहे, यावर त्या समाजाच्या प्रगल्भतेचे, विकासाचे मोजमाप करता येते. भारतासारख्या बहुविधतेने नटलेल्या समाजात सर्व घटकांना समान वागणूक मिळावी, यासाठी केवळ कायदे आणि नियम पुरेसे नाहीत. त्यासाठी समाजाच्या मूलगामी जाणिवा आणि प्रवृत्ती या परिवर्तनाच्या प्रक्रियेतून जाव्या लागतात. याच प्रक्रियेसाठी मार्गदर्शन करणे हे बुद्धिजीवी वर्गाचे मुख्य कार्य आहे, तर परिवर्तन घडवून आणण्यासाठी समाजाचे नेतृत्व करणे हे सामाजिक कार्यकर्त्याचे काम असते. बुद्धिजीवी वर्ग म्हणजे केवळ पुस्तकी पंडित नव्हे, तर समाजातील समकालीन प्रश्नांवर संवेदनशीलतेने विचार करणारे, सत्यशोधक व संशोधक वृत्तीने समस्यांमध्ये उतरून मार्ग शोधणारे लोक. यात प्राध्यापक, साहित्यिक, लेखक, संशोधक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, वकील, तत्त्वज्ञ हे सर्व येतात. वैचारिक चळवळीत सामाजिक कार्यकर्त्यांच्याबरोबरच या सर्वांचा सहभाग महत्त्वाचा असतो. वैचारिक चळवळी समाजात रुजल्या तरच विवेकवादी मूल्यांना बळ मिळते.

उदाहरणार्थ, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ कायदेतज्ज्ञ नव्हते, तर एक अत्युच्च दर्जाचे बुद्धिजीवी होते. त्यांनी केवळ सामाजिक विषमतेवर टीका केली नाही, तर त्या विषमतेच्या समूळ उच्चाटनासाठी 'जातिव्यवस्थेचे उच्चाटन' (Annihilation of Caste) यासारख्या ग्रंथांच्या आधारे काही मूलगामी सिद्धांत मांडले आणि त्या सिद्धांतांच्या आधारे सामाजिक परिवर्तनासाठी काही वैचारिक चळवळी चालवून सामाजिक संघर्ष केला. पुढे जाऊन स्वतंत्र भारतासाठी अशा सिद्धांतांची आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेची जी संहिता त्यांनी लिहिली ती म्हणजेच भारतीय संविधानाची रचना होय. त्यांनी स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांच्या आधारे नवभारत घडविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या जीवनातून आपल्याला एका आदर्श बुद्धिजीवीचे दर्शन घडते, जो वैयक्तिक उन्नतीबरोबरच नव्या सामाजिक क्रांतीचा प्रवर्तक (Pioneer) बनतो. त्यांच्याआधी महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण हे परिवर्तनाचे साधन असल्याचा मूलमंत्र देत, शोषित-वंचित घटकांसाठी शाळा सुरू केल्या. त्यावेळी समाजात स्त्रीशिक्षणाला विरोध होता. पण त्यांच्या विवेकवादी दृष्टीकोनामुळेच आज शिक्षण सार्वत्रिक झाले. त्यांनी केवळ शिक्षणच दिले नाही, तर विचारांची नवी दिशा दिली. महात्मा फुले यांनी एक बुद्धिजीवी म्हणून सामाजिक परिवर्तनासाठी विविध ग्रंथांमधून नवे सिद्धांतच केवळ मांडले नाहीत, तर सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रत्यक्ष समाजात जाऊन त्या सिद्धांतानुसार परिवर्तनासाठी 'सत्यशोधक समाजा'सारखी चळवळ देखील उभी केली.

आजही महाराष्ट्रात डॉ. नरेंद्र दाभोलकरप्रणित महा.अंनिस आणि अशा काही परिवर्तनवादी संस्था व संघटना तसेच काही बुद्धिजीवी व्यक्ती अंधश्रद्धा, जातीयता, सांप्रदायिकता आणि सामाजिक अन्याय याविरुद्ध आवाज उठवत प्रबोधन करीत आहेत. त्यांच्या लेखनातून आणि कृतीतून सतत विवेकवादी दृष्टीकोन मांडला जातो. पण यासाठी त्यांना समाजाच्या एका वर्गाकडून विरोधही सहन करावा लागतो. यावरून लक्षात येते की, विवेकवादी विचार मांडणे हे केवळ सोपे काम नाही, तर धाडसाचे आहे. समताधिष्ठित समाज म्हणजे असा समाज जिथे कोणीही वंचित, उपेक्षित, मागास राहणार नाही. पण आजही जाती, धर्म, लिंग, वर्ग यांच्या आधारे भेदभाव चालू आहेत. शिक्षण, आरोग्य, नोकरी, न्याय या मूलभूत गरजांमध्येही विषमता आहे. अशा वेळी बुद्धिजीवी वर्गाने केवळ टीकाकार होऊन चालणार नाही, तर त्यांनी मार्गदर्शक होणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांमध्ये विवेकवादी व वैज्ञानिक दृष्टीकोन

**(पृष्ठक्रमांक २२ वर)**



# असे शिक्षक सर्वांना लाभावेत...!

**उत्तरेश्वर बिराजदार** । लातूर
मो. ९४२३०७५५०४

साधारण १९७७-७९च्या काळातील आठवी ते दहावीच्या वर्गातील गोष्ट असावी. लातूरच्या नामांकित देशिकेंद्र विद्यालयातील प्रसंग. शाळा दोन सत्रात भरायची. मुले शाळेत येतात. आपापले दप्तर, जेवणाचे डबे वर्गात ठेवतात. सामूहिक प्रार्थनेला मैदानावर जातात. नंतर पुन्हा वर्गात येतात. वर्ग मधल्या सुट्टीपर्यंत चालतो. मधल्या सुट्टीत मुले जेवणाचे डबे उघडतात आणि काय चमत्कार! दररोज कोणाचा ना कोणाचा कधीकधी एकदोघांचा डबा अर्धानिम्मा संपवलेला असतो. मुलांना आईने भरलेल्या डब्यात काय दिलेले आहे व किती आहे याचा अंदाज नसायचा. असे बरेच दिवस अधूनमधून चालायचे; चर्चा व्हायची. पुन्हा विषय बंद.

एके दिवशी राजे (पूर्ण नाव आठवत नाही) नावाच्या वर्गमित्राचा डबा असाच संपलेला. त्याच्या डब्यात केवळ साधं वरण व भातच होता. तो प्रार्थनेवरून वर्गात परत आल्यावर डब्याच्या झाकणाला लागलेली भाताची शिते त्याच्या लक्षात आली. त्याने डबा उघडून पाहिला, त्यातील वरणभात कोणीतरी अर्ध्याच्यावर संपवलेला होता. राजे रडायला लागला, चर्चा शिक्षकांपर्यंत गेली पण फारशी गांभीर्याने घेतली गेली नाही. पण काहींनी या प्रकाराला 'पिवळ्या भाताचे चेटूक' असे नाव दिले. त्यामुळे वर्गातील वातावरण भीतीयुक्त झाले.

आम्ही काही मित्र थोडा वेगळा विचार करू लागलो आणि प्रश्नाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करू लागलो. तेव्हा लक्षात आले की, सामूहिक प्रार्थनेला सर्व मित्र मैदानावर दिसायचे. पण महादेव माथे प्रार्थनेला बऱ्याचदा दिसायचा नाही. तसा तो उनाडही होता. त्यामुळे आम्ही खोलात जाऊन शोध घेण्याचा प्रयत्न करू लागलो. एकदा आम्हीही दोन-चार जण प्रार्थनेला न जाता खिडकीच्या मागे लपून बसलो. वर्गात पाहतो तर काय महादेव जेवणाचे डबे शोधत होता. आमची पक्की खात्री झाली की, हे कृत्य महादेवच करायचा. आम्ही सर्व मित्रांनी क्लास टिचरना सांगितले. सरांनी त्याला बेदम चोप दिला. महादेवला कशी अद्दल घडवली या आविर्भावात आम्ही होतो. पण नंतर कळलेले त्याचे खरे कारण खूप वेदनादायी होते. ते आठवून आजही गलबलून येते. महादेवची आई वारली होती व तो लातूरला मामाकडे राहत होता. परंतु महादेवची मामी त्याला पोटभर जेवायला द्यायची नाही. महादेवच्या पोटातील भुकेचा डोंब त्याला कसा स्वस्थ बसू देणार? म्हणून सगळे प्रार्थनेला गेल्यानंतर महादेव कोणाच्या ना कोणाच्या डब्यावर आपली निम्मी-अर्धी भूक भागवायचा. महादेव दहावीनंतर कुठे गेला, काय करतोय याची आजमितीला काहीही कल्पना नाही. त्याची मनोमन माफी कधीच मागितली आहे. परंतु आज भेटला तर त्याला कडकडून मिठी मारून माफी मागेन.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षकदिन म्हणून पाळला जातो. त्यानिमित्ताने मला माझ्या शालेय जीवनातील वरील प्रसंग आठवतो. महादेवची शोकांतिका लक्षात न घेता त्याला शिक्षा करणारे जरी शिक्षक होते तरी आपण त्याला कारणीभूत झालो याची अपराधीपणाची बोच वाटते. मुले आईवडिलांचे ऐकणार नाहीत, परंतु शिक्षकांनी सांगितलेले मात्र ऐकतात. शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी रोल मॉडेलच असतात. त्यामुळे शाळेतील काही शिक्षकांच्या भल्याबुऱ्या आठवणी विद्यार्थी आयुष्यभर विसरत नाहीत. शिक्षकांच्या बोलण्याचालण्याचे, स्वभावाचे, वागण्याचे विद्यार्थी कळतनकळत अनुकरण करीत असतात, निरीक्षण आणि परीक्षणही करीत असतात. अशाप्रकारे शिक्षक हे देशाच्या भावी पिढ्या घडविणारे शिल्पकारच असतात.

वरीलप्रमाणे पाळत ठेवून पिवळ्या भाताचे चेटूक कसे शोधायचे ते आम्हाला कसे सुचले? ते सुद्धा एका शिक्षकांच्या संस्कारातूनच. त्यावेळी आम्हाला शिकवणारी सर्व शिक्षक मंडळी चांगलीच होती. त्यातही विज्ञानाचे शिक्षक आर. के. कत्राळे सरांची विज्ञान शिकविण्याची हातोटी विलक्षण होती. सरांचे पूर्ण नाव राजाराम खंडेराव कत्राळे. सरांचा स्वभाव अतिशय शांत, संयमी. प्रत्येक घटनेच्या मागे काहीतरी कारण असते व कोणतीही गोष्ट आपोआप घडत नसते, ही कत्राळे सरांची शिकवण.

त्यामुळे डबा रिकामा होणाऱ्या घटनेमागे काहीतरी कारण असावे, या निश्चयाने आम्ही पाळत ठेवली आणि महादेवला डबा खाताना पकडले. पिवळ्या भाताच्या चेटूकाचा भांडाफोड केला. खरी वैज्ञानिक दृष्टीकोनाची रुजवण येथूनच झाली.

कत्राळे सर शिकवताना सांगायचे की, अडाणी माणसे दरवर्षी कुटुंबाची रूढी, परंपरा, प्रथा म्हणून देवापुढे बकरे, कोंबडे कापून बळी देतात. त्याचा काय फायदा होतो? त्यामुळे उलट कर्जबाजारी होऊन अनेक कुटुंबे कायम गरिबीत आयुष्य घालवतात. मात्र तुम्ही शिकून मोठे झालात तर अशा गोष्टी करायच्या नाहीत आणि याचा विरोध करायचा. हे सांगताना ते संत गाडगेबाबांचे उदाहरण द्यायचे.

शास्त्रज्ञ, संत आणि समाजसुधारक हे विचाराने प्रगत असतात. त्यांच्या विचारांचे स्मरण करून ते अंगीकारा, असे सांगताना सर म्हणायचे, शाळा हे आपलं ज्ञानमंदिर, कोर्ट-कचेरी आणि जिथे आपण आपली कैफियत मांडतो ते पोलीस स्टेशन ही आपली न्यायमंदिरे आहेत. गॅलिलिओ गॅलिली यासारखे शास्त्रज्ञ, स्वातंत्र्यासाठी लढणारे महात्मा गांधी, संत ज्ञानेश्वर, तुकाराम, गाडगेबाबा या संतांसह सर्व समाजसुधारक हीच आपली दैवते आहेत असे कत्राळे सर सांगायचे.

विज्ञान हा विषय विद्यार्थ्याला त्यातील मूलभूत संकल्पनांसह समग्रपणे कळला पाहिजे, असा त्यांचा दंडक असे. त्यात कोणताही विद्यार्थी नापास होऊ नये यावर त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे विज्ञानात कोणी नापास झालेले फारसे आठवत नाही. तत्कालीन परिस्थितीत शालेय वयात हे कळायचं नाही. पण कत्राळे सर त्यांच्या शिक्षकी पेशाशी किती एकनिष्ठ होते हे आज लक्षात येते. सरांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे शिकविण्याशिवाय इतर कोणत्याही गोष्टी कधीच केल्या नाहीत. त्यांनी अंगीकारलेल्या अध्यापनाच्या पेशात विद्यार्थी हाच केंद्रबिंदू होता.

कत्राळे सर पुढे मुख्याध्यापक झाले. मी त्यांचा विद्यार्थी स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊन शासकीय सेवेत आलो. नोकरी करीत असतानाच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सामाजिक कार्य करू लागलो. समितीअंतर्गत वैज्ञानिक जाणिवा प्रकल्पाच्या जिल्हा कार्यवाहाची जबाबदारी बरीच वर्षे माझ्याकडे होती. लातूर जिल्ह्यात वैज्ञानिक जाणिवा प्रकल्पांतर्गत प्राथमिक शिक्षकांसाठी प्रत्येक तालुक्यात दरवर्षी एक शिबिर व जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षकांसाठी एक शिबिर असा महा. अंनिसचा उपक्रम जवळपास दहा वर्षे चालू होता.

प्रसंग असा झाला की, या प्रकल्पांतर्गत पत्रव्यवहार करताना शिक्षकांना उपस्थित राहण्याचे आवाहन पत्र देताना पुन्हा सरांना भेटण्याचा योग आला. पत्रकावर शिक्षणाधिकारी यांच्यासह जिल्हा कार्याध्यक्ष माधव बावगे सर व वैज्ञानिक जाणिवा प्रकल्पाचा कार्यवाह म्हणून माझी स्वाक्षरी असायची. हे विनंतीपत्र कत्राळे सरांना देताना मला खूप संकोच वाटत होता. माझ्या सहीने हे पत्र तुम्हाला देताना मला खूप अवघडल्यासारखे होतेय असे सरांना सांगितले. त्यावर अत्यंत विनम्रपणे सर मला म्हणाले, 'माझा विद्यार्थी हे काम करतो आहे यापेक्षा माझा दुसरा कुठला मोठा आनंद असणार? जे संस्कार मी माझ्या वर्गात विद्यार्थ्यांना दिले त्याच संस्कारांची शिदोरी घेऊन माझे विद्यार्थी समाजासाठी काम करतात ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.' डॉ. दाभोलकर यांचे लेख आवर्जून वाचत असल्याचेही सरांनी सांगितले. डॉ. दाभोलकर व डॉ. बाबा आढाव यांचे कार्य त्यांना खूप आवडते, त्यांच्याच कार्यात मी सहभागी असल्याबद्दल त्यांना खूप आनंद वाटतो, हे सांगायला सर विसरले नाहीत.

कोणत्याही बाबतीत नेहमी वास्तव काय, सत्य काय याचा अभ्यास करून आपण नेहमी सत्याच्याच बाजूने उभे राहिले पाहिजे, हा मोलाचा संदेश सरांनी दिला. कोणताच 'इझम' (वाद) न बाळगता विवेक हाच आपला इझम असावा अशी सरांची शिकवण. या देशाच्या मालकीची कवडीसुद्धा आपल्या स्वार्थासाठी वापरायची नाही; मात्र आपण लोकांच्या भल्यासाठी काहीतरी करीत राहिले पाहिजे, अशी त्यांची विचारसरणी आहे.

सरांचे वय आज ८५ वर्षांचे आहे. आजही त्यांची प्रकृती चांगली आहे. त्यांची मुले चांगल्या नोकरीत आहेत. पत्नीच्या आजारपणात सर त्यांची काळजी घेतात. आमच्या पिढीतील विद्यार्थ्यांवर विवेकी विचारांचा संस्कार केल्यामुळे सरांची अनेकांना आठवण येते. मी अधूनमधून त्यांच्या भेटीसाठी जात असतो, चर्चा करीत असतो. निरोप घेताना लवून नमस्कार करतो आणि मनोमन विचार करतो, असे शिक्षक सर्वांना लाभावेत...!

**(लेखक महाराष्ट्र अंनिसचे राज्य सरचिटणीस आहेत.)**

●



# जेव्हा मदत करणाऱ्यालाच छळलं जातं : पोलिसी अत्याचार, जातीय अपमान आणि न्यायाचा शोध

**ॲड. परिक्रमा खोत** । पुणे
मो. ७७७४०७२२००

**प्रस्तावना**

भारतातील लोकशाही ही न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या चार मूल्यांवर उभी आहे असे आपण म्हणतो. परंतु वास्तव पाहिले तर अनेकवेळा ही मूल्ये केवळ संविधानाच्या पानांवरच मर्यादित राहिलेली दिसतात. विशेषतः महिला, दलित व अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना न्यायाच्या दारापर्यंत पोहोचणे ही अजूनही कठीण वाटचाल ठरते. लोकशाहीची खरी कसोटी ही केवळ निवडणुका किंवा संसद नाही; तर सामान्य नागरिक जेव्हा अन्यायाविरुद्ध दाद मागायला प्रशासनापर्यंत जातात, तेव्हा त्यांना न्याय मिळतो की नाही यातून ठरते. जर तिथेच भीती, अपमान आणि दडपशाही केली गेली तर लोकशाहीवरचा विश्वास डळमळतो.

अलीकडेच पुण्यात घडलेले 'कोथरूड प्रकरण' हे या वास्तवाचे ज्वलंत उदाहरण आहे. एक तरुणी, दुसऱ्या एका पीडित महिलेच्या मदतीसाठी पुढे सरसावते; परंतु त्या स्त्रीचा जीव वाचावा ह्या हेतूने त्या तरुणीने केलेली मदत हाच तिचा 'गुन्हा' ठरविला जातो आणि तिला स्वतःलाच अमानुष छळ, जीविताच्या धमक्या, जातिवाचक शिवीगाळ, अपमान व लैंगिक त्रासाला सामोरे जावे लागते. ही घटना केवळ एका व्यक्तीपुरताच अनुभव नाही, तर व्यवस्था कशी व्यक्तीची प्रतिष्ठा, हक्क व स्वातंत्र्य हिरावून घेते याचे ज्वलंत उदाहरण आहे.

**मदतीपासून छळापर्यंत : घटनाक्रमाचा मागोवा**

पुण्यातील कोथरूड परिसरात राहणारी, समाजकार्याची पदवी (MSW) घेतलेली एक तरुणी. तिच्या कार्याचा गाभाच आहे - अत्याचारग्रस्तांना साथ देणे आणि त्यांना न्याय मिळवून सर्वतोपरी मदत करीत समाजात जागृती निर्माण करणे. या संवेदनशीलतेतूनच तिने एका विवाहित पीडित महिलेची मदत करण्याचा निर्णय घेतला. त्या महिलेला सासरी होणाऱ्या सततच्या शारीरिक व मानसिक छळामुळे आश्रय हवा होता. फक्त एका दिवसाच्या सुरक्षित निवारा देण्याच्या हेतूने तिने त्या पीडित महिलेला मदतीचा हात दिला. परंतु मदतीचा हा हातच त्या तरुणीसाठी संकटाचे कारण ठरला.

सुरुवात झाली अनाहूत धाडसाने. एका दुपारी, काही पोलीस अधिकारी आणि त्यांचे ओळखीचे - सगळेच वर्दीविना - तिच्या घराच्या दारात धडकले. ना कोणते ओळखपत्र दाखवले, ना कोणते वॉरंट. तिच्या घरात शिरतानाचा त्यांचा रोख स्पष्ट होता - 'तुम्हाला प्रश्न विचारायचा अधिकार नाही'. घरात उपस्थित त्या तरुणीला आणि तिच्या मैत्रिणींवर लगेचच शिव्यांचा भडिमार करण्यात आला. त्यांची नावे, गावे आणि मुख्य म्हणजे जात विचारत त्यांना वारंवार अपमानास्पद भाषेत 'ह्या महारामांगाच्या बायकांची उकिरड्यावर राहण्याची औकात आहे, माजलेल्या बायका, भटकभवान्या, रांडा' म्हणत हिणवण्यात आले. त्यांच्या शैक्षणिक-व्यावसायिक पार्श्वभूमीकडे, व्यक्तिमत्त्वाकडे पूर्ण दुर्लक्ष करून त्यांना केवळ त्यांच्या जात व लिंगाच्या आधारावर अपमानित करण्यात आले. हे केवळ अपमानावरच थांबले नाही तर धमक्या सुद्धा दिल्या गेल्या. तुम्हाला कुठे गायब करून टाकू कोणाला माहीत पण पडणार नाही, तुम्हाला उचलून नेऊ, अशा शब्दांनी त्यांना गप्प बसवायचा प्रयत्न झाला. एकीकडे शिवीगाळ, तर दुसरीकडे हातवारे आणि सूचक अश्लील हावभाव करून त्यांना भयभीत करण्यात आले. मग त्यांची कपाटे, अंतर्वस्त्रे व इतर कपडे, कामाची बॅग, खाजगी माहिती लिहिलेल्या डायऱ्या, शासकीय कागदपत्रे इत्यादी खाजगी वस्तूंचा शोध घेतला आणि निघतांना धमकी देण्यात आली - 'कोणाला काही सांगितले तर तुमच्या घरादाराचे काय होईल याद राखा'.

थोड्या वेळाने परत आधी सारखेच घरात घुसत त्या तरुणींना त्या अट्टल गुन्हेगार किंवा पाहिजे असलेल्या आरोपीसारखे अपमानास्पदरीत्या त्यांच्या राहत्या घरातून जबरदस्तीने वाहनात बसवण्यात आले. तुम्ही काही मोठ्या गुन्ह्यात अडकल्या आहात अशा आरोपांची धमकी दिली गेली, परंतु नेमका गुन्हा कोणता हे मात्र

सांगण्यात आले नाही. पोलीस ठाण्यात पोहोचल्यावर परिस्थिती आणखी गंभीर झाली. तेथे त्यांना मुद्दाम (पुरावा राहू नये यासाठी) सीसीटीव्ही (CCTV) नसलेल्या एका आडबाजूच्या वेगळ्या खोलीत नेऊन तपासाच्या नावाखाली अक्षरश: छळ केला गेला. काही पोलीस अधिकाऱ्यांनी अंगावर धावून येऊन अंगचटीला येणे, सूचक हसणे, डोळ्यांनी चाळे करणे, शरीरावरून नजर फिरवणे अशा प्रकारे लैंगिक छळाचा पातळी ओलांडणारा अनुभव दिला. त्यांच्या तोंडून सतत अपमानास्पद शब्द निघत होते -LGBTच्या पोरी, रांडा, आज ह्या, उद्या त्या पोराखाली झोपणाऱ्या आणि मज्जा करणाऱ्या पोरी. अशा वक्तव्यांमध्ये केवळ व्यक्तिगत अपमान नव्हता, तर जातीय, लैंगिक आणि सामाजिक पातळीवरील तिरस्कार ओतप्रोत होता. फक्त बोलण्यापुरताच नाही तर शारीरिक छळही करण्यात आला. एका तरुणीला मारण्यात आले, दुसरीला जबरदस्तीने ढकलण्यात आले. त्यांच्या शरीरावर वर्दीच्या जोरावर हात टाकण्यात आला. हे सर्व करताना स्वतःला वर्दीपेक्षा मोठे समजणाऱ्या त्या काही गर्विष्ठ लोकाचा सूर होता - 'आम्ही जे करू तोच कायदा'. अर्थातच हा सर्व अत्याचार कायदा हातात घेऊन चालला होता. या घटनाक्रमात सर्वात धक्कादायक म्हणजे त्यांनी एका अत्याचारग्रस्त महिलेच्या बाजूने उभे राहणे हा त्यांचा 'गुन्हा' ठरविण्यात आला.

### पोलिसांची भूमिका : रक्षकाची नव्हे, भक्षकाची

पोलीस हा कायदा व सुव्यवस्थेचा रक्षक मानला जातो. परंतु जेव्हा वर्दीधारी काही लोक त्या पदाकडे 'माझे कोणीच काही वाकडे करू शकत नाही' ह्या गुर्मीत अधिकारांचा दुरुपयोग करून सामान्य नागरिकांचा छळ करू लागतात, तेव्हा जनतेचा राज्यव्यवस्थेवरील विश्वास डळमळतो. कोथरूड प्रकरणात काही पोलिसांकडून दाखवलेली वर्तणूक ही कायद्याचे पालन करण्याचे कर्तव्य असलेल्यांनीच कायद्याचे उल्लंघन केले, याचे ठळक उदाहरण आहे. महिला असण्यामुळे झालेला लैंगिक अपमान, दलित समाजातील असल्यामुळे झालेला जातीय अपमान आणि मदतीला पुढे सरसावल्यामुळे झालेला सामाजिक अपमान, अशा तिन्ही पातळ्यांवर या तरुणींना छळ सोसावा लागला. म्हणजेच त्यांच्यावर झालेला अन्याय हा बहुस्तरीय आहे.

### जात, लिंग आणि सत्ता : त्रिसूत्री अन्याय

पुरुषप्रधान समाजात स्त्रियांना त्यांच्या लिंगामुळे आधीच कमी लेखले जाते. दलित स्त्रियांना तर जात व लिंग या दुहेरी आधारांवर अत्याचाराचा सामना करावा लागतो. कोथरूड प्रकरणात या दुहेरी अत्याचाराची, दडपशाहीची तीव्रता स्पष्ट जाणवते. पोलिस ठाण्यात 'मांगाच्या बायका, रांडा, LGBTच्या पोरी' अशी शिवीगाळ, अपमानास्पद विकट हसणे, त्यांच्या फोनमधील फोटो बघत, खाजगी मेसेजेस वाचत त्यांच्या वैयक्तिक आयुष्याची अपमानास्पद खिल्ली उडवणे, अशाप्रकारची वक्तव्ये केवळ या तरुणींपुरते वैयक्तिक नव्हते. या सर्व गोष्टी सूचित करतात की, दलित महिलांना अजूनही 'नागरिक' म्हणून संपूर्ण स्वातंत्र्य व मुलभूत अधिकार मिळालेले नाहीत. अश्लील व जातीय टिप्पणी हे भारतीय समाजातील खोलवर रुजलेल्या पूर्वग्रहांचे उदाहरण आहे आणि बायका अजूनही जातीय व लैंगिक छळाच्या सोप्या टार्गेट ठरतात.

अंधश्रद्धा म्हणजे केवळ जादूटोणा किंवा भुताटकी मानणे नव्हे. जात-लिंगावर आधारित हीनत्व मानणे, महिलांना कनिष्ठ समजणे ही देखील अंधश्रद्धाच आहे. विवेकाचा व नैतिकतेचा अभावच अशा दडपशाहीला जन्म देतो.

### न्यायाची लढाई : दार ठोठावूनही दरवाजे बंदच

अशा अवस्थेतदेखील या तरुणींनी संविधानावर अढळ विश्वास ठेवत अनेक वेळा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवायचा प्रयत्न केला. परंतु तक्रार नोंदवण्यास टाळाटाळ झाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटायला गेले तरी तासनतास बसवून ठेवले गेले. अगदी सकाळी साडेदहापासून रात्री साडेतीन पर्यंत बसवून ठेवत आरोपी विरोधात गुन्हा नोंद करण्याऐवजी उलट 'प्रथमदर्शनी तथ्य आढळत नाही' असे सांगून प्रकरण बंद करण्याचा प्रयत्न झाला. हा अनुभव सामान्य नागरिकासाठी भीतीदायक आहे. जेव्हा पीडितेला न्याय मिळविण्यासाठी कायदेशीर व्यवस्था दार उघडण्याऐवजी कुलूप लावते, तेव्हा न्यायप्रणालीवरचा विश्वास खिळखिळा होतो.

### व्यापक सामाजिक परिणाम

एका शिक्षित, जागरूक तरुणीला जर असा छळ सहन करावा लागत असेल, तर समाजातील सामान्य व अशिक्षित महिलांचे काय? पोलीस ठाण्यात पाऊल

टाकताना अजूनही महिला घाबरतात, दलित कुटुंबांना आपल्या तक्रारी गांभीर्याने घेतल्या जातील का याची खात्री नसते. अशा घटनांमुळे महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतो. कोणावर विश्वास ठेवायचा? हा प्रश्न महिलांसमोर उभा राहतो. अशा घटनांचा परिणाम केवळ व्यक्तीवर होत नाही, तर समाजातील स्त्रिया आणि वंचित घटक अधिकच गप्प बसण्याच्या, सहन करण्याच्या दिशेने ढकलले जातात.

**व्यवस्था कोसळते तेव्हा**

या प्रकरणाकडे पाहताना आपण तीन महत्त्वाचे मुद्दे ओळखले पाहिजेत –

**कायद्याचा गैरवापर :** पीडितांना कायद्याचे संरक्षण देण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे तेच लोक कायद्याचा, पदाचा व अधिकारांचा गैरवापर करीत आपले हितसंबंध जपण्यासाठी स्वतः कायदा हातात घेतात आणि गुन्हेगारांविरोधात साधा गुन्हाही नोंदवला जाऊ नये ह्यासाठी प्रयत्न करतात.

**जातीय दडपशाही :** अनुसूचित जातीतील महिलांसोबत अजूनही अमानवी वर्तन केले तर त्या काहीच करणार नाहीत ही खात्री असल्याने त्यांना अन्यायकारक वागणूक दिली जाते.

**न्यायालयीन आदेशाचा म्हणजेच पर्यायाने न्यायालयाचा अवमान :** दखलपात्र गुन्ह्यामध्ये पीडित व्यक्ती एफआयआर (FIR) नोंदवायला आल्यास टाळाटाळ न करता तत्काळ गुन्हा नोंद करण्यात यावा असे मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयांनी आपल्या न्यायनिर्णयामध्ये स्पष्ट केलेले आहे. कारण आपल्यावरील अन्यायाविरोधात न्याय मागण्याचा प्रत्येक नागरिकाला हक्क आहे असे आपल्या देशाचे संविधान सांगते. पण तसे न करता त्या पीडित व्यक्तीची साधी बाजूही ऐकून न घेणे हा केवळ न्यायालयाचा अवमान नसून येथूनच न्याय नाकारण्याची सुरवात होते. अशाच पद्धतीने कायद्याचे राज्य संपून जंगलराजकडे, अराजकतेकडे वाटचाल सुरु होते, हे सुजाण नागरिकांनी लक्षात घेतले पाहिजे.

लोकशाही टिकविण्यासाठी फक्त संविधान पुरेसे नाही, तर ते अमलात आणण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे त्यांची प्रामाणिक इच्छाशक्तीही आवश्यक आहे.

**निष्कर्ष :** न्यायाचा मार्ग आणि आपली जबाबदारी

एका सामाजिक कार्यकर्तीचा झालेला छळ, हा अनुभव केवळ तिच्यापुरता वैयक्तिक नाही; तो आपल्या लोकशाहीच्या आरोग्याची चाचणी आहे. मदतीसाठी पुढे सरसावणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि आता न्यायालयाचे दार ठोठावणे, या सर्व कृती तिच्या जिद्दीचे प्रतीक आहेत. अंधश्रद्धा, जातीय अहंभाव, स्त्रीद्वेष आणि सत्तेचा गैरवापर या चौकटी मोडून काढण्यासाठी विवेकवाद, प्रश्न विचारण्याची हिंमत आणि सामूहिक प्रतिकार आवश्यक आहे.

डॉ. नरेंद्र दाभोलकर म्हणायचे, ‘जिथे अन्याय होतो, तिथे गप्प बसणे हे अंधश्रद्धेपेक्षा भयंकर आहे’. हाच संदेश आज पुन्हा अधोरेखित करावा लागतो. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीने समाजाला शिकवले की प्रश्न विचारणे, विवेक जपणे आणि अन्यायाविरुद्ध उभे राहणे हेच खरे माणूस असण्याचे लक्षण आहे. आपल्याला आपली लोकशाही टिकवायची असेल, तर प्रत्येक पीडितेच्या आक्रंदनाशी आपण जोडले गेलो पाहिजे. आपण या घटनांकडे केवळ ‘एखादी बातमी’ म्हणून न पाहता अशा घटना आपल्या लोकशाहीची, आपल्या न्यायव्यवस्थेची खरी कसोटी आहेत हे समजून घ्यायला हवे. कारण आज ह्यांचा आवाज दाबला गेला, तर लवकरच आपण सगळेच गुमान गुलाम होऊ.

**(लेखिका महा. अंनिसच्या संविधान जागर विभागाच्या राज्य कार्यवाह आहेत.)**

●

**पोर्नोग्राफी – विकृती की कुतूहल?**
**या विषयावर ऑनलाईन मुक्तसंवाद**

**मुंबई :** अंनिसच्या युवा सहभाग विभागातर्फे पोर्नोग्राफी – विकृती की कुतूहल? या विषयावर ऑनलाईन मुक्तसंवादाचे आयोजन करण्यात आले.

या चर्चेत महा. अनिसचे कार्यकर्ते व अग्गबाई अरेच्चा! या पुस्तकाचे लेखक सचिन थिटे यांनी मार्गदर्शन केले. पोर्नोग्राफी म्हणजे काय, त्याचे आकर्षण, शारीरिक-मानसिक परिणाम, चुकीच्या लैंगिक प्रतिमा तसेच लैंगिक हिंसेशी असलेला संभाव्य संबंध या महत्त्वाच्या मुद्द्यांवर संवाद झाला.या उपक्रमाला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



# हैदरभाई नुरानी : महाराष्ट्र अंनिसवर निस्सीम प्रेम करणारे प्रसन्न व्यक्तिमत्त्व

**प्रा. परेश शाह** । शिंदखेडा (धुळे)
मो. ९४२१४६५८६४

आज स्वातंत्र्यदिनाच्या सकाळीच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नंदुरबार जिल्ह्याचे अध्यक्ष आदरणीय हैदरकाकांच्या निधनाची दुःखद बातमी समजली. सर्वार्थाने मोठा माणूस, संघटनेचा आधारवड हरपला.

अगदी बघता क्षणी भुरळ पडावी असे काकांचे व्यक्तिमत्त्व होते. नितळ गोरापान रंग, उंच - सडपातळ देहयष्टी, स्वच्छ पांढरेशुभ्र कपडे आणि चेहऱ्यावर प्रसन्नता! काकाजींनी प्रकृती अशी मेन्टेन ठेवली होती की, त्यांचे वय कोणाला सांगून खरे वाटणार नाही. ८० व्या वर्षी ते ६०-६५ चे वाटायचे.

नंदुरबार जिल्ह्यातीलच नव्हे तर खान्देशातील एक मोठे उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते अशी काकाजींची समाजात ओळख होती. पण जे त्यांच्या सहवासात आले त्यांना हे लक्षात आल्याशिवाय राहणार नाही की, काकांची खरी ओळख एक अतिशय निर्मळ मनाचा सुसंस्कृत माणूस हीच आहे.



लोणखेडा, ता. शहादा येथे त्यांचे वास्तव्य होते. महाराष्ट्र अंनिसचे नंदुरबार जिल्ह्यातील काम शहाद्यापासून सुरू झाले. अगदी प्रारंभापासून म्हणजे नंदुरबार स्वतंत्र जिल्हा होण्याच्या आधीपासून हैदरकाका आपल्या कामाचे पाठीराखे राहिले आहेत. डॉ. नरेंद्र दाभोलकरांबद्दल त्यांना प्रचंड आदर होता आणि त्यांचावर मनापासून प्रेम करायचे.

मला चांगले आठवते, नंदुरबार जिल्ह्यात डाकीण प्रश्नावर काम सुरू केले. त्या कामातील गांभीर्य लक्षात आल्यावर नंदुरबार येथे डिसेंबर २००२ मध्ये डाकीण प्रथाविरोधी प्रबोधन मोहिमेची प्रारंभ- परिषद घेण्याचे ठरविले. 'दामिनी' फेम प्रतीक्षा लोणकर त्यासाठी येणार होत्या. नंदुरबार जिल्ह्यातील संस्था-संघटना व प्रशासनाला सोबत घेऊन ही परिषद होणार होती. खर्चही मोठा होता. हैदरकाकांकडून मदत मागण्याची जबाबदारी माझ्यावर होती. एकतर अशा प्रकारे निधी मागण्याची सवय नव्हती आणि काकाजींशी तेवढी जवळीक नव्हती. मी काकांना भीतभीतच फोन केला. काकांना मोठी हिंमत करून सांगितले की, परिषदेच्या खर्चासाठी आपण दहा हजार रुपये द्यावेत. काकांना काय वाटले असेल? राग तर आला नसेल ना? एवढ्या मोठ्या माणसावर आपण असा हक्क कसा काय दाखवू शकतो? मनात ते चार दिवस सारखी अस्वस्थता. नंदुरबारला काका प्रत्यक्ष भेटतील तेव्हा कसे सामोरे जायचे? असा माझ्यापुढे प्रश्न. प्रत्यक्ष परिषदेच्या आदल्या दिवशी नंदुरबारला पोहोचलो होतो. तेथल्या तयारीत गुंतलो होतो. दुसऱ्या दिवशी सकाळपासून विविध संघटनांचे लोक येत होते. अचानक हैदरकाका मला शोधत तेथे आले. मला बाजूला घेऊन गेले. पैशांचे पुडके हातात देत म्हणाले, ''तुमच्या आदेशानुसार हे दहा हजार रुपये आणले आहेत.'' (ते माझ्याशी नेहमी गुजरातीत बोलायचे.)

काकांच्या दातृत्वाचा असा अनुभव अनेकांनी घेतला आहे. शहाद्यात आपल्या वार्षिक विशेषांकाला सर्वाधिक जाहिराती/देणग्या मिळतात. सुरुवातीला या हितचिंतकांचे संबंध प्रस्थापित करून देण्यात काकांचा महत्त्वाचा वाटा होता.

हैदरकाका अनेक संस्था - संघटनांना मदत करीत. पण महाराष्ट्र अंनिसच्या कामात ते अतिशय मनापासून सहभागी होत. धुळे - नंदुरबार जिल्ह्यांतील सर्व मोठ्या कार्यक्रमांना काकाजींची हजेरी असायची. एक-दोन राज्य अधिवेशनांना देखील काका उपस्थित राहिले होते. हे काम त्यांना मनापासून आवडायचे. प्रत्येक लहान-मोठ्या कार्यक्रमात अत्यंत हौसेने आणि अगत्यपूर्वक स्वतःच्या

बगिच्यातील फुलांचे गुच्छ पाहुण्यांच्या स्वागतासाठी आणत. काही मदत पाहिजे का? आवर्जून विचारत. कार्यकर्ते सांगत, नको काकाजी, झाली आहे व्यवस्था. पुढील वेळी लागले तर सांगतो. त्यांना याचे फार कौतुक वाटायचे. म्हणायचे, ''अरे, माझ्याकडे लोक नेहमी काहीतरी मागण्यासाठी अपेक्षा घेऊनच येतात. तुम्हीच असे आहात की, स्वतःहून देऊ केले तरी गरज नसेल तर काही स्वीकारत नाहीत. उलट मलाच नवनवीन गोष्टी, विचार येथे मिळतात.''

हैदरकाका कर्तेसुधारक होते. पर्यावरणप्रेमी होते. त्यांनी शहादा परिसरात हजारो झाडे लावली. जगवली. ते म्हणायचे, 'हरियाली ट्रस्ट' नावाचाच त्यांचा ट्रस्ट आहे. हरी या अली अशी हरियाली नावाची फोड आहे. पर्यावरणाचे काम हे प्रत्यक्ष परमेश्वराचेच काम आहे.

शहादा शहरात काही वर्षांपूर्वी भीषण पाणीटंचाई होती. पिण्याच्या पाण्यासाठी वणवण, रांगाच रांगा अशी स्थिती होती. अशा उन्हाळ्याच्या काळात हैदरकाकांच्या स्वतःच्या बोअरवेलवरुन स्वतःचे चार-पाच टँकर दिवसभर लोकांची तहान भागवण्यासाठी विनामूल्य सेवा पुरवीत. तुम्ही फक्त एक फोन केला की, काही मिनिटांत तुमच्या परिसरात टँकर हजर. पुन्हा स्पष्ट सूचना अशा होत्या की, कोणाही टँकर चालकाने पैसे मागितले तर लगेच तक्रार करा. त्याचक्षणी त्या ड्रायव्हरची सुट्टी केली जाईल.

व्यसनाबद्दलही काका असेच अतिशय संवेदनशील होते. गुटखा, तंबाखू, दारू असे कोणतेही व्यसन करणारी व्यक्ती आढळली की, काकाजी त्याला प्रेमाने चार गोष्टी समजावत. कधी कधी रागवत. अशा व्यसनापासून परावृत्त केलेल्या लोकांच्या नावाचा त्यांच्याकडे फलकच लावलेला असे. त्यांच्या स्वतःच्या बागेत फिरायला येणाऱ्यात व्यसन करून येणाऱ्यांना मज्जाव असे.

असे हे हैदरभाई नुरानी, सर्वांचे हैदरकाका हे सर्वार्थाने मोठे होते. ९६ वर्षांचे निरोगी आयुष्य ते जगले. असे वयाने वडीलधारे, आर्थिकदृष्ट्या संपन्नतेच्याही वर, विचारांनी समृद्ध आणि मनाने देखील तेवढेच मोठे. त्यांचे सर्व मोठेपण हे त्यांच्या विनयशीलतेत होते. एवढा मोठा माणूस पण जराही बडेजाव नाही की, अहंकार नाही. भेटलेल्या प्रत्येक माणसावर हृदयापासून प्रेम करीत. एकदा त्यांच्याशी परिचय झालेला आणि विचारांची नाळ जुळलेला माणूस कधीही त्यांच्यापासून दूर जात नसे. माझ्याकडे पुतणीच्या लग्नात आवर्जून उपस्थित राहिले होते. प्रत्येक भेटीच्या वेळी, प्रकृती कशी आहे? मजेत ना? असे विचारून भाईंच्या म्हणजे माझ्या वडिलांच्याबद्दल आठवणीने चौकशी करीत.

त्यांच्या नातूच्या लग्नाचा प्रसंग सांगतो. त्यांच्या प्रतिष्ठेला साजेसा भव्यदिव्य स्वागत समारंभ. खान्देशातील सर्व मंत्री, सर्वपक्षीय आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्यांपासून ते ग्रामपंचायतपर्यंत राजकीय मंडळी, नंदुरबार व धुळे जिल्ह्यांतील कलेक्टर, एस.पी., सी.ई.ओ. दर्जाचे सर्व अधिकारी, एवढेच नव्हे तर अशा मोठ्या प्रशासकीय पदावर काम करून मागील काही वर्षांत बदलून अन्यत्र गेलेले, कदाचित काही सचिव, आयुक्त अशा पदांवर पोहोचलेले काही डझन प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर्स, वकील, इंजिनिअर्स, व्यापारी, उद्योजक, बिल्डर्स यासारखी शेकडो मातब्बर मंडळी आलेली. पण माझ्यासारख्या कार्यकर्त्याला (मी काही शहाद्यात राहत नाही, तेथील सर्व स्थानिक कार्यकर्ते तर निमंत्रित होतेच.) आठवणीने शिंदखेड्याला निमंत्रण पत्रिका पाठवली. पण आश्चर्य म्हणजे आठवडाभराने काकांचा फोन आला, ''पत्रिका मिळाली ना? आठवणीने यायचे आहे. पप्पांनाही सोबत आण.'' मी विनायककडे पोहोचलो. शहाद्याच्या सर्व टीमसोबत आम्ही समारंभाला पोहोचलो, तर शेकडो चारचाकी गाड्यांची वर्दळ, तोबा गर्दी पण चोख व्यवस्था. मोठमोठे नेते, अधिकारी मंडळी, प्रतिष्ठित माणसे अवतीभवती. पण एवढ्या गर्दीत हैदरकाकांनी आम्हा सर्वांना जवळ बोलविले. प्रत्येकाला गळाभेट घेत तोंडभरून स्वागत केले. एवढ्या मोठ्या माणसापुढे आपण कोण यःकश्चित प्राणी! पण हैदरकाका असे सर्वांवर अंतःकरणपूर्वक प्रेम करायचे. हाच खरा त्यांचा मोठेपणा होता.

त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्र अंनिसचा एक आधारवड कोसळला आहे. आदरणीय हैदरकाकाजींना भावपूर्ण आदरांजली! नुरानी परिवाराच्या दुःखात सहवेदना व सांत्वना! काकाजींच्या स्मृती सदैव सोबत राहातील, प्रेरणा देत राहतील.

**(लेखक महा. अंनिसच्या निधी व्यवस्थापन विभागाचे राज्य कार्यवाह आहेत.)**

●



# डॉ. शंतनू अभ्यंकर : प्रखर विवेकवादी आणि विज्ञाननिष्ठ व्यक्तिमत्त्व

**सलीम मोमीन** । सांगली
मो. ९८६००५५१७५



वाई येथील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ, लेखक, नाटककार, वक्ते आणि विज्ञानवादी कार्यकर्ते असलेले डॉ. शंतनू अभ्यंकर यांनी आपल्या विविधांगी योगदानाने समाजमनावर गारूड केले. पुण्यातील बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयातून त्यांनी स्त्रीरोग आणि प्रसूतिशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतले. १९९७ पासून वाई येथील त्यांच्या वडिलोपार्जित 'मॉडर्न क्लिनिक'द्वारे वैद्यकीय सेवेत योगदान देत त्यांनी समाजसेवेला नवा आयाम दिला.

- **लेखन क्षेत्रातील योगदान**

डॉ. शंतनू अभ्यंकर हे एक प्रतिभासंपन्न लेखक होते. त्यांनी 'पाळी मिळी गुपचिळी', 'संभोग का सुखाचा?', 'जादुई वास्तव' (रिचर्ड डॉकिन्स यांच्या 'द मॅजिक ऑफ रिॲलिटी'चा भावानुवाद), 'फादर टेरेसा आणि इतर वल्ली', 'आधुनिक वैद्यकीची शोधगाथा' यांसारखी पुस्तके लिहून समाजाच्या विचारविश्वात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या लेखनातून विज्ञाननिष्ठा, तर्कशुद्धता आणि समाजप्रबोधनाचा संदेश स्पष्टपणे प्रकट होतो.



- **सामाजिक जाणीव आणि विज्ञानवादी कार्य**

सामाजिक जाणीव असलेल्या विज्ञानवादी व्यक्ती म्हणून डॉ. अभ्यंकर समाजात एक विशेष स्थान मिळवून गेले. वाई येथील प्राज्ञ पाठशाळा मंडळाचे ते विश्वस्त आणि लोकमान्य टिळक स्मारक संस्थेचे अध्यक्ष होते. महाविद्यालयीन जीवनातच त्यांनी लोक विज्ञान संस्थेच्या कामाला प्रारंभ केला. वाईत अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या चळवळीचे नेतृत्व करत त्यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवण्यासाठी लेखन आणि प्रबोधन केले. त्यांनी अंनिसच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा आणि चुकीच्या परंपरांविरोधात ठामपणे उभे राहून विवेकवादाचा प्रसार केला.

- **बालपणातील विज्ञानवादी वृत्ती**

डॉ.अभ्यंकर यांच्या विचारसरणीला त्यांच्या बालपणातील घटना कारणीभूत ठरल्या. वयाच्या १४व्या वर्षीच त्यांनी वर्तमानपत्रांमधील ज्योतिषाच्या कात्रणांची चिकित्सा करून त्यातील विसंगती आणि फोलपणा सिद्ध केला. यामागे त्यांच्या वडिलांचा विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन होता. डॉ. शरद अभ्यंकर हे स्वतः एक बुद्धिप्रामाण्यवादी आहेत, आजही कार्यरत आहेत. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्यासाठी त्यांनी नेहमी प्रयत्न केले. त्यांची १) मला शास्त्रज्ञ व्हायचं आहे, २) शास्त्रज्ञ आजीची गोष्ट, ही पुस्तके बालमनाला मोहीत करतील आणि आणि विज्ञानाची उत्सुकता निर्माण होईल, हे निश्चित.

- **धर्म आणि चिकित्सा**

धर्म हा एक अदृश्य अज्ञात शक्तींचा शोध घेणाऱ्या व्यवस्थांचा समूह आहे, अशी डॉ. शंतनू यांनी केलेली व्याख्या आजही तितकीच महत्त्वाची ठरते. धर्मांचा फोलपणा उघड करताना त्यांनी नेहमी हसतखेळत संवाद साधण्याची पद्धत वापरली. त्यामुळे त्यांचे लेखन आणि व्याख्याने प्रभावी ठरत. धर्माची चिकित्सा करताना त्यांनी कोणत्याही धर्माचा द्वेष न करता त्यामागील मूळ विचारप्रणालीचे परीक्षण केले.

- **विज्ञान आणि तर्कनिष्ठता**

डॉ. अभ्यंकर केवळ धर्माची चिकित्सा करून थांबले नाहीत, तर विज्ञानातील सिद्धांतांवरही प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या मते, 'विज्ञान हे नवीन प्रयोग आणि संशोधनाद्वारे बदल घडवून आणते.'

ते विज्ञानातील गृहीतकांची सुद्धा तर्कशुद्ध चिकित्सा करण्यावर भर देत. त्यांच्या मते, पुस्तकी ज्ञानावर अवलंबून राहण्याऐवजी तार्किक आणि तात्त्विक दृष्टीकोन अंगीकारणे गरजेचे आहे. या विचारांमधून त्यांची वैचारिक

प्रगल्भता आणि विवेचनशैली ठळकपणे दिसून येते.

**● हवामान बदलावर दृष्टी**

हवामान बदल हा आजच्या युगातील मोठा ज्ञानद्रोह आहे, असे डॉ. अभ्यंकर म्हणत. त्यांनी मांडलेले विचार आधुनिक काळात अधिकाधिक महत्त्वाचे ठरत आहेत. त्यांच्या मते, कोपर्निकस आणि डार्विननंतर हा तिसरा मोठा ज्ञानद्रोह आहे. कोपर्निकस आणि डार्विन यांनी माणसाला त्याच्या खास स्थानावरून हटवले, तसेच हवामानशास्त्रज्ञांनी माणूसच पर्यावरणीय संकटाचं मूळ कारण आहे, हे अधोरेखित केले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, आज जागतिक पातळीवर तातडीने कार्बन उत्सर्जन कमी करण्याची गरज आहे. मात्र, राजकीय आणि सामाजिक पातळीवरील निर्णय अपुरे ठरत आहेत. हवामान बदल आणि त्याचे परिणाम समजून घेण्यासाठी त्यांनी आपल्या लेखनातून विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे.

**● आजारपणातही सकारात्मक दृष्टीकोन**

डॉ. अभ्यंकर यांच्या आजारपणातील अनुभव आणि त्यातून घेतलेले धडे हे प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरतात. फुफ्फुसाचा कॅन्सर झाल्याचे त्यांनी अत्यंत खणखणीतपणे आणि सकारात्मक दृष्टीकोनातून लोकांसमोर मांडले. त्यांच्या एका लेखातील प्रसंग विचार करायला लावतो. एकदा, सोनोग्राफीच्या रांगेत उभे असताना गावातील दादा त्यांना भेटले. त्यांच्या विचारणीनंतर डॉ.अभ्यंकर यांनी खणखणीत आवाजात सांगितले, मला फुफ्फुसाचा कॅन्सर झालाय. हे ऐकून दादांना धक्का बसला. त्यानंतर त्यांनी शिकलेला एक धडा होता, समोरच्याच्या मनाचा विचार न करता केलेले वक्तव्य धक्कादायक आणि धोकादायक ठरू शकते.

**● साहित्य, नाटक आणि कलेचा वारसा**

डॉ. अभ्यंकर हे फक्त विज्ञाननिष्ठ नव्हते, तर साहित्य, नाटक आणि कलेमध्येही त्यांना रस होता. त्यांनी नाटक आणि कविता लिहून समाजमनावर आपली छाप सोडली. विज्ञानाची रुजवण करताना त्यांनी कलेचा वापर केला. जेणेकरून सामान्य लोकांपर्यंत त्यांचा संदेश प्रभावीपणे पोहोचेल.

**● डॉ. शंतनू अभ्यंकर: विवेकवादी विचारधारा**

डॉ. शंतनू अभ्यंकर यांचे जीवन हे केवळ तात्त्विक विचारांवर आधारित नव्हते, तर त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून ते विचार समाजापर्यंत पोहोचविले. विवेकी विचार, सामाजिक सौहार्द, विज्ञाननिष्ठा आणि तर्कसंगतता यांचा संगम म्हणजे डॉ. शंतनू अभ्यंकर. त्यांच्या कार्याने समाजाला नव्या विचारांची दिशा दिली आणि आजही ते प्रेरणास्रोत ठरतात.

**(लेखक विवेकवादी कार्यकर्ते आहेत.)**

●

---

**(पृष्ठक्रमांक १३ वरून)**

रुजविणाऱ्या शिक्षकांची भूमिका येथे महत्त्वाची ठरते. जेव्हा शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर आयुष्य जगण्यासाठी आवश्यक विचार शिकवतात, तेव्हा एक विवेकशील पिढी निर्माण होते. प्रा. राम पुनियानी, अरुंधती रॉय, तिस्ता सेटलवाड यांसारखे अनेक बुद्धिजीवी कार्यकर्ते पाडत आहेत. ही जबाबदारी हिरिरीने पार पाडलेली आहे. सोशल मीडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता, वेगाने बदलणारी माहितीव्यवस्था यामुळे सामान्य जनतेवर होणारा माहितीचा परिणाम अधिक तीव्र झालेला आहे. चुकीच्या माहितीच्या लाटेत विवेक हरवू नये, यासाठी बुद्धिजीवी वर्गाने माहितीचे विश्लेषण, सत्याचे प्रस्थापन आणि विवेकाचा प्रचार करणे अनिवार्य झाले आहे. आज गरज आहे त्या विवेकाधारित सामाजिक चळवळींची, ज्या चळवळी समाजात केवळ भावनात्मक नव्हे, तर तर्कशुद्ध बदल घडवून आणतील. बुद्धिजीवी वर्गाने लोकांच्या भावना ओळखत, त्यांना विवेकाकडे वळवत, सामूहिक सामाजिक जाणिवेला प्रगल्भ बनवले पाहिजे. उपसंहार करताना असे म्हणता येईल की, समतेची स्वप्ने फक्त राजकारणाच्या अखत्यारीत राहू नयेत. त्यांची रुजवणूक ही बुद्धिजीवी वर्गाचे लेखन, मार्गदर्शन, कृती आणि सक्रिय सहभागातूनच शक्य आहे. आज प्रत्येक विचारवंताने, बुद्धिजीवीने आपले ज्ञान हे समाजातील दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी वापरले पाहिजे. कारण विवेक हेच परिवर्तनाचे खरे शस्त्र आहे, आणि हे शस्त्र बुद्धिजीवी वर्गाच्या हातात आहे.

**(लेखक महा.अंनिसच्या आलापल्ली शाखेचे कार्याध्यक्ष आहेत.)**

●



# हे तांदूळ निवडा...

**विनायक सावळे** । शहादा (नंदुरबार)
मो. ९४०३२५९२२६

महात्मा गांधीजींचा एक किस्सा सांगितला जातो. एक चांगला उच्चशिक्षित सुटाबुटातला तरुण आश्रमात त्यांना भेटायला येतो. गांधीजींना म्हणतो, 'मला स्वातंत्र्यलढ्यात सहभागी व्हायचं आहे, मला देशाची सेवा करायची आहे'. गांधीजी स्वतः तांदूळ निवडत होते. त्या तरुणाचं बोलणं शांतपणे ऐकून घेत त्याच्याकडे तांदुळाची परात देत म्हणतात, 'हे तांदूळ निवडून काढा, स्वच्छ करा.' तरुणाला ते काम देऊन गांधीजी स्वतः आपल्या कामाला लागतात.

असलं विचित्र काम पाहून तरुण गांगरतो. पण तांदूळ निवडायला बसतो. मग थोड्या वेळाने अस्वस्थ होतो. मी एवढा उच्चशिक्षित, देशसेवेसाठी आलो असताना, मला तांदूळ निवडायचे काम दिले! या विचाराने निराश होतो. त्याची चलबिचल वाढते. इकडे गांधीजी त्यांच्या कामात व्यग्र असतात. तरुणाचा संयम सुटतो. काहीशा चिडलेल्या स्वरात तो गांधीजींना विचारतो, 'मी उच्चशिक्षित आहे, देशसेवेसाठी आलो असताना तुम्ही मला हे काय काम लावले?'

गांधीजी उत्तर देतात, 'देशसेवेसाठी समर्पण, संयम, शिस्त आणि नम्रता आवश्यक असते. कोणतेही काम करण्याची तयारी ठेवायची असते. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते; ते काम तुम्ही स्वतः किती जबाबदारीने, तळमळीने करता याला खूप महत्त्व आहे.' तरुण ओशाळतो. हे कोणत्या तरुणाच्याबाबतीत घडले ते माहीत नाही. पण महात्मा गांधींनी स्वीकारलेली मूल्ये मात्र हीच होती. तांदूळ निवडण्याचे काम त्या क्षणी स्वातंत्र्य चळवळीचाच तर एक भाग होते. आश्रमातील कामाच्या वाटून घेतलेल्या जबाबदाऱ्यांमध्ये संडास स्वच्छ करण्याची जबाबदारी प्रत्येक आश्रमवासियाकडे आळीपाळीने येत असे. स्वतः गांधी बागकाम, भांडी धुण्यापासून संडास सफाईपर्यंतची सर्व कामे करीत असत. महात्मा गांधी कोणत्या पद्धतीचा समाज निर्माण करू पाहत होते, त्यांची जीवनाकडे पाहण्याची समग्र दृष्टी याची झलक या प्रसंगातून आपल्याला समजते.

एखादी संघटना, संस्था, चळवळ, सामाजिक कार्य उभे करताना कार्यकर्ते त्यातील अगदी लहानातल्या लहान कामात जीव ओतून, तळमळीने काम करीत असतात. हे प्रथमतः संघटना, संस्था उभी करण्याच्याच हेतूने होत नसले तरी त्यातून कार्यकर्त्याची मूळ कार्यप्रवृत्तीच घडत जाते. अनेक कार्यकर्त्यांच्या घडणाऱ्या या कार्यप्रवृत्तीतूनच त्या संघटनेची, संस्थेची, चळवळीची, त्या सामाजिक कार्याची सामूहिक अशी कार्यसंस्कृती निर्माण होत असते.

आपल्या संघटनेत हे अनेकदा मी स्वतः अनुभवलं आहे. नाशिकला राज्य कार्यकारिणी बैठक असताना आपले राज्य प्रधानसचिव डॉ. ठकसेन गोराणे सरांना पहाटे चार वाजता आपल्या मुलांना सोबत घेऊन 'सिटू भवना'तील संडास सफाई करताना मी बघितलं आहे. आपल्या अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे संपादक, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे सरांना पत्रिकेचे प्रचंड जड गठ्ठे स्वतः उचलून ट्रॅव्हलच्या वाहनामध्ये टाकताना पूर्ण महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी बघितलेले आहे. 'सोच युवा छावणी'मध्ये तेव्हाचे राज्य कार्याध्यक्ष आणि आताचे संघटनेचे अध्यक्ष माधव बावगे सरांना स्वतःची खुर्ची डोक्यावर नेताना सगळ्या तरुणांनी बघितलेले आहे. हे छोटे छोटे प्रसंग संघटनेची कार्यसंस्कृती घडवत असतात. सर्व श्रम सारख्याच मोलाचे, असा श्रमप्रतिष्ठेचा अप्रत्यक्ष संदेश त्यातून जात असतो.

अजून एक अनुभव सांगण्यासारखा आहे. गोपाळ नेवे हे नाव किती जणांना माहीत आहे? ते 'साधना मीडिया सेंटर'ला असतात. साधना बालकुमार अंकाची जबाबदारी ते सांभाळतात. ते राष्ट्रसेवा दलाचे सैनिक आहेत. पण त्याहीपेक्षा मोठं काम म्हणजे खानदेशातील अमळनेर येथील 'सानेगुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठान'ची जबाबदारी ते सांभाळतात. साडे तेरा एकर जमिनीवर हे वैचारिक स्मारक होण्यासाठी ते प्रयत्न करीत आहेत. ते प्रतिष्ठानचे विश्वस्तही आहेत. मे महिन्यात एकदा भरदुपारी मी त्यांना फोन केला. काही कामानिमित्त बोलायचं होतं. कुठं आहात? काय करीत आहात, असे विचारल्यावर

समजले, मे महिन्याच्या कडकडीत उन्हात गोपाळभाऊ तेथील झाडांना पाणी घालत होते. 'इथं दुसरे कोणीच नाही. मलाच बघावं लागतं. मी एकटाच भर उन्हात झाडांना पाणी घालतोय', अशी कोणतीही तक्रार नाही किंवा आत्मस्तुतीचं एक वाक्यसुद्धा नाही. या गोष्टीची ना प्रसिद्धी, ना बातमी, ना स्टेटस, ना फेसबुकवर रिल्स, ना इन्स्टावर ..... काही.... काही नाही; कुठे वाच्यताच नाही.

मी स्वतः डॉ. नरेंद्र दाभोलकरांना एका खांद्यावर पुस्तकांची भली मोठी बॅग आणि दुसऱ्या खांद्यावर स्वतःची कपड्यांची बॅग, एवढे ओझे वाहताना पाहिले आहे. स्वतःची बॅग त्यांनी कधीच कुठल्या कार्यकर्त्याला धरू दिली नाही. ही गोष्ट अत्यंत छोटी पण तितकीच महत्त्वाची आहे. काहीही व्यक्त न होता, आपल्या कृतीतून ही माणसे आपल्याला काही सांगू इच्छितात का? त्यातून काही संदेश देत असतात का? आपण सारे हे डोळसपणे बघतोय का? बघत असू तर आपण आपल्याशीच, आपल्या आतमध्ये ते नोंदवतोय का? असा प्रश्न स्वतःला विचारू या. संघटनेत ज्येष्ठांनी आपल्या कृतीतून निर्माण केलेला हा संस्कार खूप महत्त्वाचा आहे.

संघटनेतील सर्व कामांचे वर्गीकरण दोन भागांत करता येईल. मंचावरील दर्शनी कामे आणि न दिसणारी पडद्यामागील कामे (अनेकदा कष्टाची, संपर्काची). मंचावरील कामांसाठी प्रचंड मागणी, उत्साह, इच्छा आणि कधी कधी हावही असते. तुलनेत पडद्यामागील कामांना नेहमी कमीच माणसे उपलब्ध असतात. मंचावरील कामे माणसाला कौतुक, प्रतिष्ठा, टाळ्या, प्रसिद्धी, पुरस्कार, शाबासकी मिळवून देतात. आपल्या क्षमता, कला, गुण, कौशल्य यांना वाव मिळतो. आपला प्रभाव वाढवतात. आपली ओळख निर्माण करतात. हे नैसर्गिकपणे माणसाला गरजेचे असतेच. त्याला हरकतही नसावी. पण पडद्यामागील कामे आपला संयम, आपली क्षमता, आपले आत्मबळ वाढवतात. आपले पाय जमिनीवरच ठेवण्याची ताकद देतात. अनेकदा आपलीच परीक्षा घेतात तेव्हा छोट्यातल्या छोट्या कामातील तीच शिस्त, तीच चिकाटी मोठ्या कामातही प्रतिबिंबित होते. स्वच्छतेची, कष्टाची, मेहनतीची, परसंवादाची कामे अनेकदा स्वसंवाद करायला अवकाश निर्माण करून देतात. आपलं आत्मबळ वाढवतात. हे एक प्रकारचे कृतिशील ध्यानच (मेडिटेशन) असते. यातूनच कार्यकर्तेपणाची घडण होत असते. संघटनेच्या कार्यकर्त्यांची जडणघडण हीच त्या संघटनेची जडणघडण असते. दर्जेदार जडणघडणीचा पाया या पडद्यामागील कामांतूनच तयार होतो. यालाच संघटनेत उमेदवारी करणे असे एक नाव आहे. परंतु या उमेदवारीत नवशिके कार्यकर्तेही असतात आणि संघटना अंगी मुरलेलेसुद्धा असतात, याची जाणीव कार्यकर्त्याला असणे फार आवश्यक आहे. जेव्हा संघटनेतील सर्वोच्च नेते ह्याच कामांमध्ये तोच संयम, शिस्त, सातत्य आणि समर्पण दाखवतात तेव्हा मात्र संघटना एक उत्तम कार्यसंस्कृती निर्माण करीत असते. हीच कार्यसंस्कृती संघटनेला पुढे नेत असते.

**(लेखक महा. अंनिसचे राज्य प्रधान सचिव आहेत.)**

●

**सलिताबेन अशोकलाल शाह यांचे मृत्यूपश्चात देहदान**



महा. अंनिसचे राज्य निधी विभाग कार्यवाह प्रा. परेश शाह यांच्या मातोश्री सलिताबेन अशोकलाल शाह यांचे दि. २० ऑगस्ट, २०२५ रोजी म्हणजे शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनीच निधन झाले. त्यांच्या निधनानंतर कुटुंबीयांनी त्यांचे पार्थिव शरीर हिरे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथे देहदानासाठी सुपूर्द केले.

सलिताबेन या शिंदखेडा तालुका एज्युकेशन ट्रस्टचे माजी अध्यक्ष अशोकभाई शाह यांच्या पत्नी आणि प्रा. परेश शाह आणि प्रा. व्रजेश शाह यांच्या मातोश्री होत्या. संपूर्ण शाह कुटुंब समाजकार्याच्या विविध क्षेत्रांत सक्रिय आहे. शाह कुटुंबीयांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, समाजोपयोगी कार्य करणे हेच त्यांच्या आयुष्याचे ब्रीद होते. मृत्यूनंतरही समाजासाठी काहीतरी देण्याची त्यांची इच्छा होती. आम्ही केवळ ती पूर्ण केली आहे.या उदात्त कार्याचे शहरात सर्वत्र कौतुक होत असून, विविध सामाजिक संस्थांनी शाह कुटुंबाचे अभिनंदन केले आहे. महा. अंनिस परिवाराच्या वतीने भावपूर्ण आदरांजली!



# तोंडओळख लैंगिक अल्पसंख्याक समाजाची

**मयुर पटारे** । पुणे
मो. ९०७०३५५१०५

काही दिवसांपूर्वी पुण्यात एक घटना घडली. स्वतःला साधू म्हणवून घेणाऱ्या एका भोंदूबाबाने त्याच्या आश्रमात येणाऱ्या भाविकांमधील काही पुरुषांना फसवून गुंगीचे औषध देऊन त्यांच्यासोबत समलिंगी संबंध प्रस्थापित केले. तसेच मोबाईलच्या माध्यमातून त्यांच्या मोबाईलचा ॲक्सेस (ताबा) मिळवला. त्याद्वारे त्यांचे आक्षेपार्ह (अश्लील) व्हिडिओ रेकॉर्ड केले. हे उघडकीस आल्यावर पुढे सर्व स्तरांवरून या प्रकरणात त्या भोंदूवर टीका करण्यात आली. ती योग्यही आहे. दुसरी घटना अशी की, गेल्या महिन्यात एका समलिंगी व्यक्तीला डेटिंगच्या माध्यमातून भेटायला बोलावलं आणि तिथे गेल्यानंतर मात्र त्याला समजलं की, आपल्याला फसवलं गेलं आहे. त्याने विरोध केला असता, दोन-तीन व्यक्तींकडून त्याला मारहाण करण्यात आली. एवढ्यावरच न थांबता त्याला निर्वस्त्र करून त्याचे फोटो, व्हिडिओ काढले आणि पैशांची मागणी केली गेली. 'पैसे मिळाले नाही तर ते फोटो, व्हिडिओ तुझ्या घरी पाठवू', अशी धमकीही दिली गेली. अशा प्रसंगांना आज अनेक समलैंगिक तरुणांना सामोरे जावे लागते आहे. गेल्या काही काळात अशा घटना सतत घडताहेत, वाढताहेत. आपल्या आसपास अशा घटना घडत असतात; पण लैंगिक अल्पसंख्याक समुदायाला मुख्य प्रवाहात अजूनही योग्य स्थान नसल्यामुळे एकतर मुख्य प्रवाह त्याकडे दुर्लक्ष करतो किंवा हे समलिंगी, होमो असेच असतात, विकृत असतात, यांना जगण्याचा काही अधिकार नाही, यांना असंच मारलं पाहिजे, असा एक सूर समाजात आहे. पहिल्या घटनेत तो भोंदूबाबाच दोषी आहे, त्याला योग्य ती शिक्षा व्हायलाच हवी. दुसऱ्या घटनेत मात्र केवळ समलिंगी आहे म्हणून निर्दोष व्यक्तीचं शोषण करणं हे योग्य नाही. पुण्यासारख्या शहरात आजकाल अशा प्रकरणी पोलीस समजूतदारपणे सहकार्य करतात म्हणून इथे अशा घटनांवर आळा बसला आहे. परंतु इतर ठिकाणांचे काय? आणि एकूण समाजाचं काय? समाज अशा समुदायांकडे फक्त माणूस म्हणून बघायला तयार होईल का?

संपूर्ण समाज कधी तयार होईल हे माहीत नाही; परंतु 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' नेहमीच अशा समुदायांसोबत खंबीरपणे उभी राहत आली आहे. 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' व्यापक समाजपरिवर्तनाच्या कार्यातील एक भाग म्हणून समाजात समता प्रस्थापित व्हावी यासाठी सतत कार्यरत असते. समाजातील उपेक्षित घटकांना सोबत घेऊन चालण्याचे काम समिती नेहमीच करीत आलेली आहे. 'लैंगिक अल्पसंख्याक समुदाय' त्यापैकी एक. लैंगिक अल्पसंख्याक समुदायासोबत होणारा भेदभाव कमी करण्याच्या प्रयत्नात समिती एकेक पाऊल पुढे टाकत आहे. तर या 'लैंगिक अल्पसंख्याक समुदाया'च्या व्यक्ती म्हणजे कोण आहेत? 'प्राइड मंथ' म्हणजे काय? आणि याची सुरुवात नेमकी कुठून झाली? याबद्दल थोडक्यात जाणून घेऊयात.

**प्राइड मंथ म्हणजे काय?**

प्राइड मंथ LGBTQIA+ समुदाय (म्हणजेच लेस्बियन, गे, बायसेक्शुअल, ट्रान्सजेंडर, क्वीअर, इंटरसेक्स, असेक्शुअल आणि इतर लैंगिक अल्पसंख्याक समुदाय) यांच्या अस्तित्वाचा, त्यांच्या हक्कांसाठी लढण्याचा आणि त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक योगदानाचा उत्सव साजरा करण्यासाठीचा महिना. १९६९च्या स्टोनवॉल बंडाच्या स्मरणार्थ जून महिना प्राइड मंथ म्हणून साजरा केला जातो. या महिन्यात जगभरातील अनेक देशांत अभिमान पदयात्रा काढल्या जातात. तसेच समुदायाच्या अधिकारांच्या संदर्भातील जागरूकता पसरविण्यासाठी आणि त्यांच्या समस्या जगासमोर आणण्यासाठी विविध कार्यक्रम, उपक्रम राबवले जातात.

**लैंगिक अल्पसंख्याक चळवळीचा इतिहास**

१९५०-६९च्या दरम्यान अमेरिकेत समलिंगी विवाह बेकायदेशीर मानले जात. या समुदायातील व्यक्तींनी आपल्या लैंगिकतेबद्दल उघडपणे बोलणं आणि

वावरणंही निषिद्ध होतं. अशावेळी या लोकांना एकमेकांना भेटण्यासाठी 'गे बार' हे एवढं एकच ठिकाण असे. परंतु हे गे बार अनधिकृत समजले जात, त्यामुळे या गे बारवर अनेकदा पोलिसांचे छापे पडत. त्यावेळी समलैंगिक व्यक्तींवर मारहाणीसारखे अनेक अत्याचार होत असत. १९६०च्या दशकाच्या उत्तरार्धापासून समुदायावर होणाऱ्या अशा अन्याय, अत्याचाराचा निषेध करण्यासाठी लैंगिक अल्पसंख्याक समुदायाच्या चळवळीला सुरुवात झाली. त्यापूर्वीही असे थोडेफार प्रयत्न होत असत. परंतु २८ जून १९६९ रोजी पहाटे न्यूयॉर्क शहरातील लोअर मॅनहॅटनच्या ग्रीनविच व्हिलेज परिसरातील 'स्टोनवॉल इन' या गे बारमध्ये झालेल्या पोलिसांच्या छाप्याविरुद्ध समुदायातील लोकांनी मोठ्या प्रमाणावर बंड पुकारले. लैंगिक अल्पसंख्याक समुदायावर केल्या जाणाऱ्या अन्यायाला या घटनेमुळे वाचा फुटली. त्या काळात समलैंगिक बारवर पोलिसांचे छापे पडणे नेहमीचेच होते. त्यानंतरचे अत्याचारही दडपून टाकण्यात व्यवस्था सराईत झाली होती. परंतु स्टोनवॉल इनमधील घटनेनंतर या समुदायातील लोकांनी एकत्र येत बंड पुकारले आणि परिस्थिती पोलिसांच्या नियंत्रणाबाहेर गेली. त्यानंतर अनेक दिवस न्यूयॉर्क शहर पोलीस आणि ग्रीनविच व्हिलेजमधील समलैंगिक रहिवाशी यांच्यामधील तणाव वाढत राहिला.

पुढे काही आठवड्यांतच गावातील या समुदायाचे स्थानिक कार्यकर्ते संघटित झाले. अटक होण्याची भीती न बाळगता ते उघडपणे आपल्या समलैंगिकतेबद्दल बोलू लागले, इतरांनाही मोकळेपणाने बोलण्याचे बळ मिळेल यासाठी प्रयत्न करू लागले. लैंगिक अल्पसंख्याकांवर सरकार पुरस्कृत होणाऱ्या छळाविरुद्ध हा समुदाय यापूर्वीही अनेक वेळा लढला होता. परंतु ते लढे एकतर्फी व असंघटित होते. स्टोनवॉलमधल्या लढ्यात मात्र या समुदायाने एकी आणि हिंमत दाखवली आणि जगभरातील समलैंगिक हक्क चळवळीसाठी एक नवीन सुरुवात करून दिली. पुढे या चळवळीचे लोण जगभरात पसरले. पुढील वर्षी या लढ्याच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त अमेरिकेतील अनेक शहरांमध्ये शांततापूर्ण निदर्शने करण्यात आली. त्याचेच रूपांतर पुढे 'प्राइड परेड'मध्ये झाले. स्टोनवॉलची घटना घडलेल्या ठिकाणी अलीकडे २०१६ मध्ये स्टोनवॉल राष्ट्रीय स्मारकाची स्थापना करण्यात आली. आज स्टोनवॉल लढ्याच्या स्मरणार्थ जगभरात प्राइड कार्यक्रम आयोजित केले जातात.

लैंगिक अल्पसंख्याक समुदायाविषयी जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर जनजागृती होऊनसुद्धा लैंगिक अल्पसंख्याक समुदायाबाबतीत मुख्य प्रवाहात अनेक गैरसमजुती आहेत. त्यामुळे लैंगिक अल्पसंख्याक समुदायाला आजही मोठ्या प्रमाणात भेदभावाला सामोरे जावे लागते. या भेदभावाला कुठलाही शास्त्रीय आधार नाही व ही बाब अमानवीय आहे. त्यामुळे असे भेदभाव नष्ट करण्यासाठी समाजातील मुख्य प्रवाहाने प्रयत्न केले पाहिजेत.

**लैंगिकतेविषयी..**

मुळात लेस्बियन, गे, बायसेक्शुअल, ट्रान्सजेंडर, क्वीअर, इंटरसेक्स किंवा असेक्शुअल असणे म्हणजे काय, हेच अनेकांना माहीत नसते. तर या समुदायाला समजून घेण्यासाठी माणसाची लैंगिकता (Sexuality), शारीरिक लिंग (Sex), लिंगभाव (Gender Identity) आणि लैंगिक कल (Sexual Orientation) या बाबी समजून घेऊ या.

लैंगिकतेच्या व्याख्या करताना अनेकांची गफलत होते. ते व्यक्तीच्या फक्त लिंगभावाला किंवा लैंगिक कलालाच त्या व्यक्तीची लैंगिकता समजतात. ही व्याख्या पूर्णतः चुकीची नाही. परंतु अपुरी आहे. व्यक्तीचे लिंग, लिंगभाव आणि लैंगिक कल या बाबींचा व्यक्तीच्या लैंगिकतेत समावेश होतो. व्यक्तीच्या शारीरिक, भावनिक, बौद्धिक आणि सामाजिक अशा पैलूंचे पौरुषी अथवा स्त्रीत्वाचे प्रकटन म्हणजे त्या व्यक्तीची लैंगिकता होय.

शारीरिक लिंग हे व्यक्तीचे जैविक किंवा शारीरिक वैशिष्ट्य दर्शवते. आपल्याला स्त्री आणि पुरुष ही दोन शारीरिक लिंगे तर माहीत असतात. परंतु शारीरिक लिंगानुसार व्यक्तीचे दोन नाही तर तीन प्रकारांत वर्गीकरण होते. स्त्री (Female), पुरुष (Male) आणि द्विलिंगी (Intersex). द्विलिंगी व्यक्ती म्हणजे अशी व्यक्ती ज्या व्यक्तीतील बाह्य जननेंद्रिये, गुणसूत्रे किंवा प्रजननाचे अवयव यावरून ती व्यक्ती पुरुष किंवा स्त्री हे ठरवता येणं शक्य होत नाही. त्या व्यक्तीत स्त्री व पुरुष या दोहोंचे अंशतः किंवा पूर्णतः विकसित बाह्य जननेंद्रिये, गुणसूत्रे किंवा प्रजननाचे अवयव असतात.

लिंगभाव (Gender Identity) : हा समाजाने निश्चित केलेल्या त्या व्यक्तीच्या शारीरिक लिंगापेक्षा

वेगळा असू शकतो. एखाद्या व्यक्तीची स्वतःच्या लिंगाबाबतची ओळख, अभिव्यक्ती आणि सामाजिक भूमिका याला त्या व्यक्तीचा लिंगभाव म्हणतात. ज्या व्यक्तीची लिंग व लिंगभावाची ओळख तिच्या जन्माच्यावेळी असलेल्या शारीरिक लिंगाशी संलग्न असते त्या व्यक्तीला स्वलिंगी व्यक्ती म्हणतात. त्यात स्वलिंगी पुरुष (Cisgender Men) व स्वलिंगी स्त्री (Cisgender Women) येतात. तर ज्या व्यक्तींच्या शारीरिक लिंग आणि लिंगभावाची ओळख त्यांच्या शारीरिक लिंगाशी संलग्न नसते त्यांना पारलिंगी व्यक्ती म्हणतात. त्यात पारलिंगी पुरुष (Transgender Men) व पारलिंगी स्त्री (Transgender Women) येतात.

**लैंगिक कल :** एखादी व्यक्ती लैंगिक आणि भावनिकदृष्ट्या कुठल्या लिंगाच्या व्यक्तीकडे आकर्षित होते त्याला त्या व्यक्तीचा लैंगिक कल असे म्हणतात. एखादी स्त्री लैंगिक आणि भावनिकदृष्ट्या दुसऱ्या पुरुषाकडे आकर्षित होते किंवा एखादा पुरुष लैंगिक आणि भावनिकदृष्ट्या दुसऱ्या स्त्रीकडे आकर्षित होतो यास त्या व्यक्तीचा लैंगिक कल म्हणतात. ही बाब सामान्य असून ती आपल्या सर्वांनाच परिचयाची आहे. परंतु काही व्यक्तींचा लैंगिक कल एवढ्यापुरताच मर्यादित नसतो. त्यांच्यात अनेक वेगळे लैंगिक कल दिसून येतात. त्यापैकी प्रामुख्याने दिसून येणारे काही लैंगिक कल पुढीलप्रमाणे–

**समलिंगी स्त्री** (Lesbian) : जी स्त्री लैंगिक व भावनिकदृष्ट्या फक्त आणि फक्त दुसऱ्या स्त्रीकडेच आकर्षित होते तिला समलिंगी स्त्री म्हणतात.

**समलिंगी पुरुष** (Gay) : जो पुरुष लैंगिक व भावनिकदृष्ट्या फक्त आणि फक्त दुसऱ्या पुरुषाकडेच आकर्षित होतो, त्याला समलिंगी पुरुष म्हणतात.

**उभयलिंगी व्यक्ती** (Bisexual person) : जी व्यक्ती लैंगिक व भावनिकदृष्ट्या स्त्री आणि पुरुष अशा दोघांकडेही आकर्षित होते, अशा व्यक्तीला उभयलिंगी म्हणतात. ही व्यक्ती पुरुष किंवा स्त्री यांपैकी कुणीही असू शकते.

**अलैंगिक व्यक्ती** (Asexual person) : ज्या व्यक्ती लैंगिक आणि भावनिकदृष्ट्या दुसऱ्या स्त्री किंवा पुरुषांकडे इतरांहून खूपच कमी प्रमाणात आकर्षित होतात, अशा व्यक्तीला असेक्शुअल म्हणतात.

**क्विअर व्यक्ती** (Queer Person): क्विअर हा शब्द तीन वेगवेगळ्या पद्धतीने वापरणारे प्रवाह आहेत. त्यातील पहिला प्रवाह ज्यांना कुठल्याही लिंग, लिंगभाव आणि लैंगिकतेत अडकायचे नसते, ते स्वतःला क्विअर म्हणवून घेतात. दुसऱ्या प्रवाहाच्या मते LGBTQIA नंतरच्या आणखी वेगळ्या लैंगिक ओळखी वाढवण्यापेक्षा वरीलपेक्षा वेगळ्या अशा सगळ्यांसाठी क्विअर ही एकच संज्ञा वापरावी आणि तिसऱ्या प्रवाहाच्या मते, जे लैंगिकतेच्या बाबतीत अजून स्वतःला समजून घेण्याच्या प्रक्रियेत आहेत ते सुद्धा क्विअर समजावेत.

**सर्व पारलिंगी व्यक्ती हिजडा किंवा किन्नर असतात का?**

भारतात सांस्कृतिक व सामाजिक ओळख असलेले असे अनेक पारलिंगी समुदाय दिसून येतात. त्यापैकी महाराष्ट्रात हिजडा, किन्नर हे दोन समुदाय प्रामुख्याने आहेत. या व्यतिरिक्त ज्या पारलिंगी व्यक्तींना अशा कुठल्याच समुदायात सामील न होता स्वतंत्र राहायचे असेल त्यांना स्वतंत्र पारलिंगी व्यक्ती म्हटले जाते.

**लैंगिक अल्पसंख्याक समुदायाच्या समाजाकडून अपेक्षा**

आज आपल्या अगदी सर्वसाधारण मूलभूत अधिकारांसाठी लैंगिक अल्पसंख्याक समुदाय झगडतो आहे. या समुदायाला समाजाकडून लिंग आणि लैंगिकतेच्या आधारे कुठलाही भेदभाव न होता अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण आणि नोकरी यांमध्ये समान संधी मिळावी एवढी साधी अपेक्षा आहे. तसेच कुठल्याही पद्धतीने उपेक्षा न होता या समुदायातील व्यक्तींना प्रेम, आदर, प्रतिष्ठा, स्वीकार आणि सहवेदनेची मुख्य प्रवाहातील समाजाकडून अपेक्षा आहे.

**महा. अंनिस म्हणून आपली भूमिका**

महा. अंनिसचे महिला सहभाग विभाग, युवा विभाग, जोडीदाराची विवेकी निवड (जोविनि) विभाग हे 'लैंगिक अल्पसंख्याक समुदायाला' समजून घेण्यासाठी व त्यांच्या हक्कांबाबत समाजात जागरुकता निर्माण करून त्यांना मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी प्रयत्न करीत आले आहेत. पनवेल शाखेतर्फे सन २०१८ पासून महिला दिनानिमित्त 'झेप' हे खास महिला व युवतींसाठी निवासी शिबिर आयोजित केले जाते. गेल्या ३-४ वर्षांपासून या शिबिरात लैंगिकतेवर आधारित एक विशेष सत्र घेतले जाते. या सत्रात आतापर्यंत लैंगिक अल्पसंख्याक समुदायातील अनेक मान्यवर व्यक्तींना निमंत्रित केले गेले आहे. कोल्हापूरमध्ये २०२३ पासून

(पृष्ठक्रमांक ३४ वर)



# डॉ. वसंत खानोलकर : भारतातील पॅथॉलॉजीचे जनक

**डॉ. नितीन हांडे ।** पुणे
मो. ८९५६४४५३५७

कुष्ठरोग, प्रजननशास्त्र, अनुवंशशास्त्र आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कर्करोग या विषयांमध्ये पायाभूत संशोधन करणारे डॉ.वसंत रामजी खानोलकर हे भारतात झालेल्या आरोग्यविज्ञानाच्या प्रगतीमध्ये महत्त्वाचे योगदान देणारे एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व. 'व्ही. आर.' सर या लघुनामाने प्रसिद्ध असलेल्या डॉ. खानोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रज्ञांच्या काही पिढ्या घडल्या. अनेक नव्या संस्थांची पायाभरणी खानोलकर यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली झाली आहे. कर्करोगाचे प्राथमिक अवस्थेत निदान, कर्करोगाचा प्रादुर्भाव करण्याचा तंबाखूमधील गुणधर्म या बाबींमधील त्यांचे संशोधन मैलाचा दगड ठरले आहे. अशा या थोर व्यक्तिमत्त्वाची ओळख करून घेऊ या.



वसंत खानोलकर यांचा जन्म कोकणातील एका छोट्या खेडेगावात गोमंतक मराठा समाजातील एका सुशिक्षित कुटुंबात १३ एप्रिल १८९५ रोजी झाला. गोमंतक मराठा समाजाला नूतन मराठा समाज असेही म्हणतात. रामजी धोंडो खानोलकर हे त्यांचे वडील. वसंत सात भावांपैकी एक. वसंत ऋतुमध्ये जन्माला आलेल्या वसंतने अनेक रुग्णांच्या जीवनातही वसंत फुलवला. खानोलकर घराण्याची कर्तबगारी अशी ऐतिहासिक की, आजही पाकिस्तानमधील एका रस्त्याला डॉ. रामजी खानोलकर यांचे नाव दिलेले आहे. रामजींनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून त्यांच्या वडिलांप्रमाणेच ब्रिटिश सैन्यात जाण्याचा निर्णय घेतला होता. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी चीनविरूद्ध आठ युरोपीय देश बॉक्सर लढाई लढत होते. (चीनच्या मार्शल आर्टला युरोपियनांनी बॉक्सर नाव ठेवले आणि त्यावरून या युद्धाला बॉक्सर हे नाव पडले.) या युद्धातून विजयी होऊन परतताना ब्रिटिश सैन्यात डॉक्टर असलेले रामजी खानोलकर हे क्वेट्टा या आजच्या पाकिस्तानातील शहराच्या प्रेमात पडले आणि त्यांनी तिथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. तिथे त्यांनी स्वतःचा दवाखाना सुरू केला, तो बघता-बघता नावारूपाला आला.

त्या काळात घोडागाडी-बग्गी, मोटारगाड्या आणि भला मोठा बंगला असा खानोलकरांचा थाट होता. दोन मजली इमारतीत ३० खानोलकर कुटुंबीय राहत होते. मात्र १९३५च्या भूकंपात रामजी आणि त्यांच्या परिवारातील इतर १३ जण मृत्युमुखी पडले. उरलेले खानोलकर पुन्हा कंबर कसून उभे राहिले. त्यांनी घराचा काही भाग पुन्हा दुरुस्त करून घेतला आणि आपला वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. मात्र त्यानंतर राजकीय भूकंप झाला. १९४७ मधील फाळणीमुळे भारतातील वातावरण ढवळून निघाले. अखेरीस जीव वाचवत सर्व खानोलकरांना भारतात परत यावे लागले.

१९२८ मध्ये ब्रिटिश सरकारने रामजी खानोलकर यांना रायबहादूर ही पदवी दिली होती. ते संस्कृतचे गाढे अभ्यासक होते, प्रचंड अभ्यासू व्यक्तिमत्त्व असलेल्या रामजी यांना अनेक भाषा अवगत होत्या, त्यांच्याकडे अनेक दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह होता. त्यामुळे सर्व मुलांना कोणत्याही विषयाचा सखोल अभ्यास करण्याची सवय लागली. वडिलांच्या वैद्यकीचा वारसा घेत विष्णू, वसंत आणि इतर तीन भाऊ वैद्यकीय व्यवसायात उतरले. विक्रमने सैन्यामध्ये जाऊन वडिलांचा वारसा जपला. एवढेच नाही तर देशातील सर्वोच्च लष्करी किताब 'परमवीरचक्र' याची रचना विक्रमच्या पत्नी सावित्री (पूर्वाश्रमीच्या इव्ह मॅडे) यांनी केली आहे. चित्रकार असलेल्या सावित्री खानोलकर यांनीच अशोकचक्र, वीरचक्र, शौर्यचक्र, महावीरचक्र आणि कीर्तिचक्र यांची रचना केलेली आहे. विशेष म्हणजे स्वतंत्र भारतात १९४७ मध्ये पहिले परमवीरचक्र मिळाले ते शहीद सोमनाथ शर्मा हे विक्रम-सावित्रीच्या मुलीचे दीर होते. ही नाती वाचताना आपल्या लक्षात आलेच असेल की, खानोलकर, शर्मा, मॅडे ही नावे अशा आंतरजातीय, आंतरधर्मीय, आंतरवंशीय, आंतरप्रांतीय विवाहांतून केवळ मानवता या एकाच धाग्याने गुंफली गेली आहेत. डॉ. वसंत

खानोलकरांनी देखील जर्मन मुलीशी विवाह करून सुखी संसार केला.

ज्ञानाचा समृद्ध वारसा लाभलेल्या व्ही. आर. यांचे बालपण अतिशय मजेत गेले. लंडन विद्यापीठातून त्यांनी विज्ञान शाखेची पदवी मिळवून १९१८ मध्ये वैद्यकीय पदवी देखील प्राप्त केली. सर्वात कमी वयाचे ग्रॅहम रिसर्च स्कॉलर म्हणून त्यांचे नाव झाले. १९२३ मध्ये व्ही. आर. रोगनिदानशास्त्रात (पॅथॉलॉजी) एम. डी. झाले. इथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत असतानाच मूलभूत विज्ञान आणि वैद्यकीय संशोधनात त्यांनी सखोल अनुभव मिळवला. डॉ. वसंत खानोलकर जेव्हा भारतात परत आले, तेव्हा त्यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आग्रह धरला. आपल्या विद्यार्थ्यांना रोगनिदानशास्त्रातील अत्याधुनिक विज्ञानाचा, तंत्रज्ञानाचा अनुभव मिळावा यासाठी त्यांना परदेशी जाण्याचा वेळप्रसंगी आग्रह केला.

भारतात परत येऊन डॉ. वसंत खानोलकर यांनी ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये नोकरी स्वीकारली. इथे ते पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना रोगनिदानशास्त्राचे अध्यापन करू लागले. शिक्षणासाठी उपयुक्त विविध नमुन्यांचे संग्रहालय त्यांनी सुरू केले. पेशी (Cell) आणि ऊती (Tissue) यांची छायाचित्रे घेणे सुरू करून त्यांनी रोगनिदानशास्त्राच्या पद्धतशीर शिक्षणाचा पाया रचला. अशाप्रकारे छायाचित्रे घेऊन अभ्यास करण्याचे आज एकविसाव्या शतकात आपल्याला विशेष कौतुक वाटणार नाही. परंतु खानोलकर यांच्या काळात अशी त्यांची अभ्यासपद्धती अनेकांना पैशाचा अपव्यय करणारी वाटत होती. मात्र छायाचित्र अभ्यासपद्धतीचा विभाग सुरू करणार असाल तरच आपण नोकरी स्वीकारू असे ठणकावून सांगून खानोलकर यांनी संशोधनाच्या गुणवत्तेत तडजोड करायचे नाकारले. शवविच्छेदनासाठी स्वतंत्र विभागाची निर्मिती करताना विद्यार्थ्यांसाठी व्यायामशाळा देखील बनवून घेतली. संशोधनामध्ये प्राण्यांचा वापर करणे गरजेचे असते, त्यासाठी त्यांनी प्राणीविभाग सुरू केला. मात्र या प्राण्यांना हाताळण्यासाठी विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता असते. त्याकरिता आपल्या एका तंत्रज्ञाला त्यांनी परदेशात अशा प्रशिक्षणासाठी पाठवले. पाश्चात्त्य देशातील वैद्यकीय शिक्षणाच्या तुलनेत भारतीय शिक्षण कमी पडू नये म्हणून त्यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमात अनेक बदल सुचवले. आरोग्यविज्ञान क्षेत्रात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्रायोगिक जीवशास्त्र (एक्सपेरिमेंटल बायोलॉजी), जैवरसायनशास्त्र, जैवभौतिकशास्त्र तसेच संख्याशास्त्र यांसारख्या इतर ज्ञानशाखांची मदत होऊ शकते हे त्यांनी ओळखले होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या विचारांना देखील तशीच दिशा दिली. या कालावधीत खानोलकरांना कर्करोग आणि कुष्ठरोग यांच्या संशोधनात अधिक वेळ देणे गरजेचे वाटू लागले. त्यांनी प्राध्यापकी सोडली आणि टाटा मेमोरियल रुग्णालयात ते प्रमुख रोगनिदानतज्ज्ञ म्हणून १९४१ मध्ये रुजू झाले. इथे काम करताना त्यांनी अनेक चांगले संशोधक देखील घडविले, डॉ. कमल रणदिवे या त्यापैकी एक.

खानोलकर यांची पहिली भेट खूपच अविस्मरणीय असल्याचे कमल रणदिवे सांगतात. प्रयोगशाळेत खानोलकर एका रुग्णाच्या पोस्टमार्टम रिपोर्टचे विश्लेषण करीत होते. बाजूला उभ्या असलेल्या कमलकडे त्यांचे लक्ष नव्हते. ते सहकाऱ्यास सांगत होते, 'कर्करोगाचा प्रत्येक रुग्ण हा आपल्या संशोधनाचा विषय असला पाहिजे, तरच आपण या भयंकर रोगाला नीटपणे समजून घेऊ शकू, संशोधनात प्रगती करू शकू.' डॉ. कमल रणदिवे यांना अप्रत्यक्ष मिळालेला हा गुरुमंत्र होता, ज्याचे पालन त्यांनी आयुष्यभर केले. ओळख आणि विचारपूस झाल्यावर विवाहित कमल रणदिवे यांची लग्नानंतरही संशोधनात आवड असल्याचे पाहून खानोलकर यांना कौतुक वाटले. त्यांनी पहिल्याच दिवशी पाच उंदरांचे डिसेक्शन करून माहिती सांगितली आणि दुसऱ्या दिवसापासून कमल रणदिवे तिथे संशोधनासाठी दाखल झाल्या. खानोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करीत त्यांनी मुंबई विद्यापीठाची डॉक्टरेट मिळवली. या दरम्यान १९४५ मध्ये उंदरांवर संशोधन करतानाच महिलांमधील स्तनाचा कर्करोग आणि आनुवंशिकता यावर त्यांनी केलेले संशोधन खूप महत्त्वाचे मानले जाते. खानोलकर यांनी डॉ. रणदिवे यांना परदेशात जाऊन पोस्टडॉक्टरल संशोधन करण्याचा आग्रह केला. तिकडील तंत्रज्ञान शिकून त्याचा वापर आपल्या देशात करावा असे त्यांनी सुचविले. रॉकफेलर फाउंडेशनची शिष्यवृत्ती घेऊन डॉ. कमल 'टिश्यू कल्चर'चे तंत्रज्ञान शिकण्यासाठी अमेरिकेत जॉन हाफकिन्समधील शिक्षण पूर्ण करून भारतात परतल्या आणि आपल्या देशात ते आधुनिक तंत्रज्ञान वापरू लागल्या.

या काळात खानोलकर यांचे कर्करोगाच्या गाठीवरील संशोधन सुरूच होते. भारतात कर्करोगाचे कोणते प्रमुख प्रकार आहेत यावरील संशोधनासाठी त्यांनी रुग्णालयातील आकडेवारीचा अभ्यास केला. कर्करोगासाठी कारणीभूत ठरणाऱ्या सवयींचा त्यांनी

अभ्यास केला. त्यातूनच तंबाखू सेवनाने कर्करोग होण्याची शक्यता वाढते हे संशोधन पुरेशा पुराव्यांसह पुढे आले. भारतातील बहुसंख्य कष्टकरी समाज तंबाखू चघळतो, या सवयीला कुपोषण, तोंडाची अस्वच्छता आणि रोजच्या आहारामध्ये जीवनसत्त्वांचा अभाव अशा सर्व घटकांची जोड मिळते आणि कर्करोगाची शक्यता वाढते. याशिवाय बदलते पर्यावरण, वाढते औद्योगिकीकरण आणि जवळच्या नात्यांमधील विवाह हे देखील महत्त्वाचे कारण असल्याचे त्यांनी मांडले. 'धोतराचा कर्करोग' संकल्पनेचा शोध त्यांनीच लावला. वर्षानुवर्षे धोतराची गाठ एकाच ठिकाणी बांधल्यामुळे तिथे त्वचेचा कर्करोग होऊ शकतो, असे त्यांच्या निदर्शनास आले. पूर्वी असा समज होता की, कर्करोग होण्याचा धोका युरोप, अमेरिकेसारख्या प्रगत खंडातील नागरिकांना आशिया, आफ्रिका यांसारख्या अप्रगत खंडातील नागरिकांपेक्षा आठपट अधिक असतो. मात्र कर्करोग होण्याची शक्यता सर्वच लोकांना सारखी असते, असा दावा खानोलकर यांनी सांख्यिकीच्या आधारे केला. या संदर्भातील त्यांचे शोधनिबंध अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित झालेले आहेत. खानोलकर यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने १९५२ मध्ये इंडियन कॅन्सर रिसर्च सेंटर (आय. सी. आर. सी.) ही संस्था सुरू केली आणि खानोलकरांना या संस्थेचे प्रमुख नेमले. रॉकफेलर फाउंडेशन, जागतिक आरोग्य संघटना यांसारख्या जगभरातील महत्त्वाच्या संघटनांनी या संस्थेला आर्थिक पाठबळ दिले. खानोलकर संशोधनकार्यात मग्न असूनही त्यांचे अनेक उद्योगपती, राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चांगले संबंध होते.

कर्करोगाव्यतिरिक्त खानोलकरांनी कुष्ठरोगावरही महत्त्वाचे संशोधन केलेले आहे. कुष्ठरोगाचे जंतू मज्जापेशींमध्ये वसतात आणि मज्जापेशींवरच हल्ला करतात हे त्यांनी शोधून काढले. कुष्ठरोगाच्या जंतूंची वाढ प्रयोगशाळेत करण्यामध्ये देखील यश मिळवले. पुनरुत्पादनाचे शरीरशास्त्र यावर देखील खानोलकरांनी संशोधन केलेले आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने कुटुंबनियोजनाचा शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी जी समिती नेमली, त्या समितीचे खानोलकर सात वर्षे अध्यक्ष होते. त्यावेळी भारतात बालमृत्यूचे तसेच अपमृत्यूचे प्रमाण युरोपपेक्षा खूपच अधिक होते. आज नवल वाटेल, पण १९५० साली भारतीयांचे सरासरी आयुर्मान अवघे ३५ वर्षे होते. त्यावेळी देशाचे आयुर्मान कसे वाढवता येईल, यावर त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केलेले आहे. आज २०२५ मध्ये भारतीयांचे आयुर्मान त्याकाळच्या अगदी दुप्पट म्हणजे ७० वर्षे झाले आहे.

अशा या थोर तपस्वी व्यक्तिमत्त्वाचा मृत्यू मुंबईच्या के.ई.एम. रुग्णालयात झाला. २९ ऑक्टोबर १९७८ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. आरोग्यविज्ञानातील एक अध्याय समाप्त झाला. मात्र त्यांचे नाव भारतीय आरोग्यक्षेत्रात चिरकाल राहील. त्यांच्या सन्मानार्थ नॅशनल ॲकॅडमी ऑफ मेडिकल सायन्सने १९८७ मध्ये डॉ. खानोलकर स्मृती व्याख्यान सुरू केले असून दरवर्षी जीवशास्त्रात भरीव कामगिरी करणाऱ्या शास्त्रज्ञास व्याख्यानासाठी सन्मानाने निमंत्रित करून त्यांचा पदक, मानपत्र आणि रोख रक्कम देऊन गौरव करण्यात येतो. भारतात रोगनिदानशास्त्राचा (Pathology) पाया रचणाऱ्या खानोलकरांचा जन्मदिवस आता 'नॅशनल पॅथॉलॉजी डे' म्हणून साजरा करण्यात येतो.

खानोलकर 'इंडियन असोसिएशन ऑफ पॅथॉलॉजिस्ट्स अँड मायक्रोबायोलॉजिस्ट्स' या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. कर्करोग आणि कुष्ठरोग यावर त्यांची तीन पुस्तके प्रकाशित झाली असून, त्यांचे शंभरपेक्षा जास्त संशोधन निबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. खानोलकर सहा भारतीय आणि चार युरोपीय भाषा बोलू आणि वाचू शकत होते. इंटरनॅशनल कॅन्सर रिसर्च कमिशनचे अध्यक्ष, इंडियन कॅन्सर रिसर्च सेंटरचे निदेशक, कर्करोग आणि कुष्ठरोगावरील जागतिक आरोग्य संघटनेच्या समितीचे सदस्य आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू यासारखी महत्त्वाची पदे त्यांनी भूषविली आहेत. १९५५ मध्ये पद्मभूषण या बहुमानाने त्यांना भारत सरकारने सन्मानित केले. डॉ. कमल रणदिवे यांच्यासारख्या शास्त्रज्ञांची पिढी भारतात घडविण्याच्या त्यांच्या कार्याला तसेच परदेशात असलेले अद्ययावत तंत्रज्ञान भारतात देखील उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या ध्यासाला सलाम! खानोलकरांसारख्या अनेक शास्त्रज्ञांनी मेहनतीने रुजविलेल्या विज्ञानाची विश्वगुरू बनण्याच्या नादात पुन्हा अधोगती न होवो एवढीच अपेक्षा. आणि हो, भारतात कर्करोगाची शक्यता कमी करावयाची असेल तर भारतीयांनी मनाची कवाडे उघडी करून आंतरजातीय, आंतरधर्मीय, आंतरवंशीय विवाहांचा मुद्दादेखील लक्षात घेतला पाहिजे.

**(लेखक विवेकवादी कार्यकर्ते आणि विज्ञानलेखक आहेत.)**

●

# धर्मांच्या तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ चिकित्सेचा संग्रह



**जगदीश काबरे** । सांगली
मो. ९९२०१९७६८०

उत्क्रांतीच्या ओघात ज्या ज्या सजीवांनी बदलत्या सृष्टीत, पर्यावरणात आपले अस्तित्व टिकविण्यासाठी स्वतःमध्ये बदल करताना जसजसे प्रयत्न केले त्याप्रमाणे त्यांच्या पुढील पिढ्यांमध्ये बदल होऊन त्या उत्क्रांत होत गेल्या. अशा उत्क्रांतीतूनच नवीन प्रजातींची निर्मिती झाली. काही माकडांच्या प्रजाती अशाचप्रकारे उत्क्रांत होत जी अत्यंत उत्क्रांत मेंदूची प्रजाती निर्माण झाली ती म्हणजे मानव होय. विविध प्रकारच्या घटना, वस्तुस्थिती समजून घेताना, त्यांचा अर्थ लावताना व परस्परसंबंध शोधताना त्याची कल्पनाशक्ती विकसित होत गेली. विविध घटना आणि वस्तुस्थितींचे अर्थ लावताना कल्पनाशक्ती विविध पर्याय निर्माण करते. मात्र कल्पनाशक्ती जे अनेक पर्याय निर्माण करते त्यातील सर्वच पर्याय तर्कशुद्ध असतात असे नाही. अशा मानवाला देवाधर्माची गरज केव्हापासून भासू लागली? या प्रश्नाचा विचार करता आपल्याला असे लक्षात येते की, आदिमानवाच्या आयुष्यात प्राणीसदृश आहार, निद्रा, भय, मैथुन एवढ्याच नैसर्गिक प्रेरणा होत्या. पुढील टप्प्यावर त्याने कल्पकतेने, विचारशक्तीच्या बळावर दगडी हत्यारांचा, अग्नीचा, चाकाचा शोध लावला. त्याला शेतीचा शोध लागला तसा तो भटक्या अवस्थेतून एका जागी स्थिरावला. एका जागी स्थिरावल्यानंतर तो स्वसंरक्षणासाठी टोळ्या करून राहू लागला. त्याच काळात तो निसर्गाच्या अगम्य आणि अज्ञात घटनांबाबत विचार करू लागला. ज्या अर्थी आपल्याला या निसर्गातून अन्नपाणी मिळते आणि आपण जगू शकतो, त्या अर्थी त्यांचा कोणी निर्माता, नियंता असला पाहिजे, असे त्याकाळी त्याला वाटले. त्यातून 'देव' या कल्पनेची निर्मिती झाली. विविध घटनांशी या देवकल्पनेचा संबंध तो जोडत गेला तशी देव ही संकल्पना त्याच्या मनात रुजत गेली. पण त्या काळचे त्याचे देव म्हणजे निसर्गातील जमीन, वारा, पाणी-पाऊस, अग्नी, यांच्या जागी धरती, मरुत, वरुण, सूर्य अशा देवतांच्या केलेल्या कल्पना होत. म्हणजे सुरुवातीला निसर्गातील विविध शक्तींसाठी मानवाने विविध देवतांची कल्पना केली आणि निसर्गाविषयी कृतज्ञता प्रकट करणारा तो निसर्गपूजक बनला.




नंतर टोळ्या मोठ्या होऊ लागल्यानंतर त्या टोळ्यांच्या रक्षणासाठी, समूहासाठी अन्न मिळविण्यासाठी संघटित प्रयत्न होऊ लागले. असे संघटनात्मक कौशल्य असणाऱ्या त्यांच्यातीलच कुणातरी एखाद्या बलवानाला ते राजा म्हणू लागले. काळ बदलत होता आणि इतिहास घडत होता. अशा समाजाला दिशा देणाऱ्या राजाला, त्याच्या पराक्रमामुळे त्याच्यात देवाचा अंश असावा या कल्पनेतून त्यालाच नंतरच्या पिढ्यांनी देव मानायला सुरुवात केली. मग माणूस निसर्गपूजक अवस्थेतून व्यक्तिपूजेकडे वळला.

त्यातून निसर्गातील काही घटनांशी संबंधित देवतांना प्रसन्न करून घेतले, तर मानव समाजाला अनुकूल अशा घटना त्या देवता घडवून आणतात या कल्पनेतून विविध कर्मकांडे तयार करण्यात आली. अशी कर्मकांडे निर्माण करून समाजात ती जोपासणारा एक हितसंबंधी वर्ग समाजात निर्माण झाला. या वर्गाने अशी कर्मकांडे आणि देवादिकांच्या कल्पनांशी समाजाला काही विशिष्ट विचारांनी बांधून ठेवण्यासाठी 'विधी-निषेध' स्वरूपातील ज्या संहिता तयार केल्या

तिथेच धर्माची निर्मिती झाली. काही धाडसी माणसे पृथ्वीवर वेगवेगळ्या ठिकाणी स्थलांतर करू लागली. त्यांनी या नव्या जगात आपला नवीन स्वरूपातील संहितांचा वेगळा धर्म स्थापन केला. अशा प्रकारे या पृथ्वीवर अनेक धर्म निर्माण झाले म्हणून आजही आपल्याला या सर्व धर्मांमध्ये काही मूलतत्त्वे सारखीच दिसतात. भाषा जरी वेगवेगळ्या असल्या तरी काही शब्दही अर्थासहित सारखेच असलेले दिसतात. अशा सर्व धर्मांच्या तत्त्वांविषयी समग्रपणे सामान्य लोकांना कल्पना असतेच, असे नाही. त्यामुळे प्रत्येकाला आपलाच धर्म श्रेष्ठ वाटतो आणि इतरांचा कनिष्ठ. खरे तर प्रत्येकाने आपापल्या धर्माचाही व्यवस्थित अभ्यास केलेला असतोच, असे नाही. लोकांना सर्व धर्मांची मांडणी, त्यांचे स्वरूप व्यवस्थितपणे समजावे, त्यातील बारकावे, उणेपणा, गुण आणि दोष लक्षात यावेत, असा डॉ. शरद अभ्यंकर यांच्या मनात विचार आला. याच उद्देशाने त्यांनी 'भारतातील प्रमुख धर्म – सच्च्या भूमिकेतून घडवलेला धर्मपरिचय' या शीर्षकाचे हे पुस्तक लिहिले आहे. यात धर्मांविषयी माहिती असली तरी ती त्यांनी अत्यंत सहजसोप्या आणि ओघवत्या भाषेत वर्णन केलेली आहे. त्यामुळे हे पुस्तक कुठेही जडजंबाळ वाटत नाही.

भारतातील प्रमुख धर्मांविषयी माहिती देताना त्या त्या धर्माचा उगम आणि उद्गाता कोण या माहितीसह त्या धर्मात शिरलेल्या अंधश्रद्धा आणि धर्ममार्तंडांनी आपले हितसंबंध जोपासण्यासाठी मूळ धर्मात केलेल्या विकृतींनी धर्मच कसा टाकाऊ झालेला आहे, हेही विशद केलेले आहे. हे सांगताना त्यांनी खुसखुशीत भाषेतून हलकेच चिमटेही काढलेले आहेत. चिमट्यामुळे शरीराला वेदना होत असली तरी ती सुसह्य आणि हवीहवीशी वाटते. त्याचप्रमाणे या पुस्तकातील धर्मचिकित्सा तर्कशुद्ध व संयत असल्याने वाचकाला ती हवेहवेसे बौद्धिक समाधान देणारी आहे. प्रसंगी ही चिकित्सा 'तू मूर्ख आहेस' असे सरळ न म्हणता उपरोधाने 'तुम्ही महाविद्वान आहात', असे म्हणण्यासारखी झाली आहे. कारण लोकांना परखड सत्य झोंबते. त्यामुळे शालजोडीतूनच हाणले पाहिजे, हे लेखकाला चांगलेच कळले आहे, असे त्यांच्या लेखनातून जाणवते. अर्थात, हे अत्यंत कठीण काम आहे. पण ते लेखकाने लीलया पेलले आहे. कसे ते आपण पुस्तकातील काही नमुन्यांतून पाहू या –

मी साताराच्या वैद्यक महाविद्यालयात शिकवण्यासाठी जात असे. आमचे एक सहप्राध्यापक ज्यू होते, ते भारत सोडून इस्त्रायलला जाणार होते. त्यांना कॉलेजतर्फे निरोप समारंभ झाला आणि इथले सर्व पाश सोडून आपल्या धर्मभूमीकडे जाणाऱ्या त्या डॉक्टरांचे सर्वांनी गुणगान केले. मला वाटले, हाच एखादा मुस्लीम डॉक्टर पाकिस्तानात जात असता तर त्याला 'खाना यहाँ का और गाना वहाँ का!' अशा शिव्या खाव्या लागल्या असत्या. (पृष्ठ क्र. २२)

आक्रमक हिंदू धर्मीयांची संख्याही आता राजाश्रयामुळे वाढत आहे. घरवापसी, गोमांस बाळगले अशा संशयावरून जीव घेणे, लव्ह जिहाद या नावाखाली प्रेमीजनांचा छळ करणे, 'जय श्रीराम' सक्तीने म्हणायला लावणे, दंगल केली, असे आरोप ठेवून घरे बुलडोझ करणे – हे आवडीने केले जाते. (पृष्ठ क्र. ६९)

काही वर्षांपूर्वी आम्ही जपानमध्ये प्रवास करत होतो. त्यावेळी बुद्ध पौर्णिमा होऊन काही दिवस झाले होते. आम्हाला टोकियो शहरातील मोठी बुद्ध मंदिरे दाखवण्यात आली. आम्ही आमच्या गाईड महिलेला विचारले, 'तुमच्याकडे बुद्ध पौर्णिमेला काय कार्यक्रम झाले?' यावर तिने विचारले, 'कसली बुद्ध पौर्णिमा?' आम्ही 'बुद्धाज बर्थडे, फुल मून डे इन मे' असे सांगितल्यावर ती म्हणाली, 'देवळातल्या पुजाऱ्यांनी काही कार्यक्रम केले असतील. इतरत्र आम्ही काही करत नाही.' आमच्याकडे या दिवशी सुट्टी असते आणि बरेच सार्वजनिक कार्यक्रम होतात, असे सांगितल्यावर ती म्हणाली, 'जपानमध्ये एकही धार्मिक सुट्टी नसते.' यावर मी सांगितले की, आमच्याकडे सात धर्मांच्या अनेक सुट्ट्या असतात. त्यावर तिने 'आता समजले तुमचा देश का मागासलेला आहे', अशा नजरेने आमच्याकडे पाहिले. (पृष्ठ क्र. ११३).

एकंदरीत धर्म म्हटले की, त्याचा प्रचार करण्यासाठी आणि रक्षण करण्यासाठी बराच अधर्म करावा लागतो, हेच खरे. (पृष्ठ क्र. १२५)

...असा हा ख्रिस्ती धर्म – सर्व जगभर पसरलेला, हजारो चांगल्या गोष्टी करणारा, पण शेकडो वाईट गोष्टींचा मोठा इतिहास असणारा. आपल्या सेवाकार्यातून हजारो लोकांचे जीव वाचवणारा पण तितक्याच लोकांचे जीव घेणाराही. एक सुविचार आहे, 'माणसांना त्यांच्या लायकीनुसार सरकार मिळते', तसे आपल्याला म्हणता येईल, 'लोकांना त्यांच्या लायकीनुसार धर्म मिळतो'. (पृष्ठ क्र. १३६)

...कुराणात कोणतीही भर घालणे, बदल करणे वा दुरुस्ती करणे यावर पूर्णपणे बंदी आहे. कारण याचा अर्थ कुराण अपूर्ण वा चुकीचे आहे असा होतो. आपला धर्मग्रंथ अपुरा आहे, हे कोणताही धर्मनिष्ठ माणूस मान्य करत नाही. (पृष्ठ क्र. १४६)

या उदाहरणांवरून आपल्याला लक्षात येते की, डॉ. शरद अभ्यंकर यांनी सर्व धर्म आणि धर्मीयांची चिकित्सा केलेली आहे. या पुस्तकाचे सार सांगताना प्रस्तावनेत प्रा. सुरेश द्वादशीवार लिहितात – 'या पुस्तकात ज्यू आणि हिंदू या अतिशय प्राचीन धर्मांपासून ते शीख व बहाई या अलीकडे जन्माला आलेल्या धर्मांचीही रोचक ओळख त्यांनी वाचकांना करून दिली आहे. ते करताना त्यांनी धर्मांच्या मूळ ग्रंथांची ओळख व त्यातील आचारांची महती तर सांगितलीच आहे; पण त्यांच्या अनुयायांनी प्रत्यक्ष व्यवहारात त्यांची केलेली मोडतोडही स्पष्टपणे मांडली आहे. सर्व धर्मांत काळानुरूप झालेले बदल, त्यातील प्राचीन नीतिमूल्यांची नंतरच्या काळात झालेली परवड आणि धर्मांनी निर्माण केलेल्या समाजव्यवस्थांचे सविस्तर वर्णन करतानाच या सर्व धर्मांनी समाजातील दुबळ्या वर्गांवर, विशेषतः स्त्रियांवर, कायमस्वरूपी लादलेल्या अन्यायाचे शरद अभ्यंकरांनी स्पष्टपणे दर्शन घडवले आहे. अतिशय मोजक्या शब्दांत, पण कमालीच्या सच्च्या भूमिकेतून घडवलेला धर्मपरिचय आणि धर्मचिकित्सा, असे या पुस्तकाचे वर्णन थोडक्यात करता येईल. हे करताना त्यांनी भारतातील बहुसंख्याकांच्या धर्मांइतकीच अल्पसंख्याकांच्या धर्मांचीही परखड चिकित्सा केली आहे, हे या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.'

मलपृष्ठावर असलेल्या पुस्तकावरील अभिप्रायात डॉ. कुमार सप्तर्षी म्हणतात, 'गैरसमजातून धर्मद्वेष वाढीला लागतो. तो अंतिमतः आपल्या भारतीयत्वाच्या भावनेला, एकात्मतेला, बंधुभावाला धक्का देणारा ठरतो. अलीकडे तर धर्माच्या नावाने केले जाणारे राजकारण हा अतिशय गंभीर आणि चिंताजनक मुद्दा ठरू लागला आहे. धर्मद्वेषाद्वारे आपला राजकीय स्वार्थ साधण्याचे प्रयत्न आवर्जून केले जात आहेत. अशा स्थितीत आम्ही सारे प्रथम भारतीय आहोत ही भावना मनामनांत रुजवणे ही काळाची गरज आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधींनीही धर्माच्या पलीकडे जगाला मानवतेची शिकवण दिली आहे.'

एकंदरीत, हे पुस्तक भारतातील प्रमुख धर्मांची नुसती माहिती देत नाही, तर वाचकाला अंतर्मुख होऊन आपापल्या धर्माचा अभ्यास करून त्यात शिरलेल्या अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा नष्ट करण्यासाठी चिकित्सेची प्रेरणा देते. तसेच, इतर धर्मांचाही अभ्यास करण्यास उद्युक्त करते. हे पुस्तक लिहिताना लेखकाने कोणत्याही धर्माचा, धर्मसंस्थापकाचा किंवा तो धर्म मानणाऱ्या लोकांचा अवमान केलेला नाही; तर सभ्य पण स्पष्ट शब्दांत काही गोष्टी सुनावलेल्या आहेत. ज्याला भारतातील विविध धर्मांविषयी जाणून घ्यायचे आहे, अशा प्रत्येक वाचकाने हे पुस्तक वाचायलाच हवे आणि माणुसकीने जगायला शिकायला हवे. तेव्हा लेखक पुस्तकाच्या शेवटी म्हणतात त्याप्रमाणे, 'वाचकांनो, द्या सोडून हा कालबाह्य झालेला वेळ, पैसा आणि श्रम यांचा अपव्यय घडवणारा, माणसा-माणसांत वैर निर्माण करणारा, झापडबंद विचार करायला लावणारा, सिंदबादच्या म्हाताऱ्यासारखा तुमच्या मानगुटीवर बसलेला 'धर्म' नावाचा राक्षस आणि द्या मुक्त विचाराला वाव. विज्ञाननिष्ठा आणि मानवता यावर आधारित जीवनप्रणाली स्वीकारा. सुखी, समाधानी आणि आनंदी व्हा!'

**पुस्तक :** भारतातील प्रमुख धर्म

**लेखक :** डॉ. शरद अभ्यंकर

**प्रकाशक :** मनोविकास प्रकाशन

**एकूण पृष्ठे :** २००

**किंमत :** रु. २७०

**(लेखक विवेकवादी विचारवंत आहेत.)**

●

**※ राज्य कार्यकारिणी बैठकीचे निमंत्रण ※**

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारिणीची बैठक शनिवार, रविवार दि. २७ व २८ सप्टेंबर, २०२५ रोजी **विश्राम भवन, सेंच्युरी रेआन मिल समोर, शहाड, ता. कल्याण. जि.ठाणे.** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीसाठी राज्य कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी, राज्य निमंत्रित, सर्व जिल्ह्याचे जिल्हा कार्याध्यक्ष व प्रधान सचिव यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**विशेष सूचना :** व्यवस्थेच्या दृष्टीने येत असल्याचे आणि कधी पोहोचणार हे संपर्क व्यक्तींना कळवावे.

**संपर्क:** डॉ. सुषमा बसवंत-९८९२३८०४७३, राजेश देवरुखकर-९१६७५६८१८७

कविता



# कानगोष्टी

**अरुण घोडेराव** । नाशिकरोड
मो. ९८२२६८९८८६

दोन-चार कानगोष्टी आज सांगून ठेवतो तुला,
भाकडकथांवरती विश्वास ठेवायचा नसतो मुला ।।धृ।।

कोण कुठला साधू येतो, दाढी जटा वाढवून,
आयुष्यातले सारे प्रश्न, झटक्यात देतो सोडवून
संन्यासी तो झालाच का, असा प्रश्न विचार त्याला,
भाकडकथांवरती विश्वास, ठेवायचा नसतो मुला ।।१।।

दुसऱ्यांची ती अंधश्रद्धा, आपली म्हणे डोळस श्रद्धा,
स्वर्ग-नरक, पाप-पुण्य, खरे असते अमृतसुद्धा?
अनुभव कधी आला आहे, यांचा कधी कोणाला?
भाकडकथांवरती विश्वास, ठेवायचा नसतो मुला ।।२।।

श्रद्धेपायी अंध होऊन, घेतात कुणी नरबळी,
भ्रष्ट गुरुंच्या नादापायी, बुद्धी होते आंधळी;
गुरुने खरे दिले आहे, दान कधी कोणाला?
भाकडकथांवरती विश्वास, ठेवायचा नसतो मुला ।।३।।

सत्संग की संतसंग, प्रत्येक मठात असते वादंग,
मी म्हणेल तीच पूर्व, मी म्हणेल तोच रंग,
खुदपसंद महंताच्या, झळ बसते का खिशाला?
भाकडकथांवरती विश्वास, ठेवायचा नसतो मुला ।।४।।

यांचा धर्म गंध टिळा, यांचा धर्म पाद्यपूजा,
मान यांची उंच मात्र, धर्म यांचा असतो खुजा,
अधर्मालाच ठरवून धर्म, गल्लीबोळात बोलबाला,
भाकडकथांवरती विश्वास, ठेवायचा नसतो मुला ।।५।।

डोळस हो, चालव डोके, माणुसकीला विसरू नको,
विज्ञान, नीती, निर्भयतेकडे, पाठ कधी फिरवू नको,
लोकशाहीत स्वातंत्र्याचा, मार्ग नेहमी असतो खुला,
भाकडकथांवरती विश्वास, ठेवायचा नसतो मुला ।।६।।

**(कवी महा.अंनिसचे नाशिक जिल्हा प्रधान सचिव आहेत.)**

**(पृष्ठक्रमांक २७ वरून)**

'अभिमान कोल्हापूर' या संस्थेशी जोडून संयुक्तपणे लैंगिकतेवर सत्रे आयोजित केली जातात. मुंबईमध्ये २०२३च्या महा. अंनिसच्या 'महिला सन्मान' पुरस्काराचे मानकरी लैंगिक अल्पसंख्याक समुदायासाठी काम करणाऱ्या 'हमसफर ट्रस्ट'चे साथी ठरलेत. तसेच 'समता गरबा'मध्ये पारलिंगी साथींना सहभागी करण्यात आले.

महा. अंनिस एवढ्यावरच थांबत नाही. राज्याच्या युवा विभागातर्फे २०२४ पासून जून 'प्राइड मंथ'च्या निमित्ताने 'लैंगिकतेचे पदर उलगडताना' या उपक्रमांतर्गत लैंगिक अल्पसंख्याक समुदायाला समजून घेऊन त्यांना आपल्यासोबत घेऊन चालण्याचा राज्यपातळीवर प्रयत्न करीत आहे. त्यासाठी युवा विभागाकडून ऑनलाईन सत्र आणि सोशल मीडिया अभियान आयोजित केले गेले आहेत. त्यातीलच पुढचे एक पाऊल म्हणजे ८ जून २०२५ रोजी पुणे येथील 'युवक चॅरिटेबल ट्रस्ट' आयोजित लैंगिक अल्पसंख्याक समुदायाच्या (LGBTQIA+) १३व्या 'अभिमान पदयात्रे'त महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अधिकृतपणे सहभागी झाली होती. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अधिकृतपणे 'लैंगिक अल्पसंख्याक समुदाया'सोबत उभी आहे आणि यापुढेही अशीच खंबीरपणे उभी राहील, याची खात्री आहे.

**(लेखक पत्रकार असून लैंगिक अल्पसंख्याक समुदायासाठी काम करणाऱ्या 'युवक चॅरिटेबल ट्रस्ट'चे संस्थापक विश्वस्त व अंनिसच्या पुणे शहर शाखेचे कार्यकर्ते आहेत.)**

●



# अतिलोभातून वकिलाची वीस लाखांची फसवणूक

**उत्तम जोगदंड ।** कल्याण
मो. ९९२०१२८६२८

भोंदूबाबांच्या जाळ्यात धर्मभोळे, अर्धशिक्षित, अशिक्षित, खेड्यापाड्यातील लोक फसतात आणि त्यांचे या भोंदू बाबांकडून आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषण होते, फसवणूक होते अशा बातम्या आपण वेळोवेळी ऐकतो, वृत्तपत्रात वाचतो, दूरदर्शनवर पाहतो. परंतु या समजास छेद देणारी घटना घडली आहे चक्क नवी मुंबई या महानगरात आणि भोंदूबाबाच्या जाळ्यात फसले आहेत, चक्क कायद्याचे जाणकार एक वकील महाशय. फसवणूक करून भोंदूबाबाने लाटलेल्या रकमेचा आकडा आहे तब्बल २० लाख रुपये. (पोलिसांच्या तत्परतेमुळे १९ लाख रुपये वसूल झाले आहेत.)

सीबीडी, बेलापूर पोलीस स्टेशनमध्ये दि.२३ जुलै २०२५ रोजी जादूटोणाविरोधी कायदा कलम ३ (२), भारतीय न्यायसंहिता कलम १२७ (२), ३(५) आणि ३१८ (४) अंतर्गत दाखल एफआयआर क्र.०३०९ मध्ये या प्रकरणी सविस्तर माहिती मिळते. मीरारोड येथे राहणारे हे वकील (नावाचा उल्लेख करणे टाळले आहे.) महाशय एक वर्षापूर्वी काशी येथून देवदर्शन करून परत येत असताना त्यांना प्रवासात पुष्पेंद्र तिवारी नावाचे साधूबाबा भेटले. त्यांनी वकिलाचे भविष्य बघून सगळे चांगले होणार असल्याचा 'आशीर्वाद' दिला. त्यानंतर त्यांचा व्यवसाय चांगला चालून आर्थिक स्थिती सुधारली. 'बाबांच्या आशीर्वादामुळेच चांगले झाले' अशी वकिलाची समजूत झाली आणि त्यांचा पुष्पेंद्र तिवारी यांच्यावर विश्वास बसला. दीड महिन्यांपूर्वी दुबई येथे सदर वकील आणि त्यांची पत्नी गेले असता विमानतळावर त्यांचे तीन लाख रुपये, सोनसाखळी आणि पत्नीचे मंगळसूत्र चोरीस गेले. त्याबाबत पुष्पेंद्र तिवारी यांना विचारले असता त्यांनी ही चोरी विमानतळ कर्मचाऱ्याने केली असल्याचे सांगितले व वकिलांचा विश्वास अजून वधारला. पुन्हा एकदा वकिलाची भेट या अशा विश्वासू पुष्पेंद्रशी नेरूळ, नवी मुंबई येथे जुलै महिन्यात झाली. तिथे त्यांनी वकिलाची गाठ सचिन भरत शर्मा उर्फ प्रेमसिंग साधू महाराजाशी घालून दिली. या प्रेमसिंग साधूला वकिलानी आपला फोन नंबर, व्हिजिटिंग कार्ड दिले.

नंतर प्रेमसिंग याने वकिलास फोन करून कळवले की, त्याने अनेकांना मंत्रतंत्राने पैसे दुप्पट करून दिले आहेत. पुढे म्हटले की, वकिलाचे पैसेदेखील दुप्पट होऊ शकतील का ते घरी जाऊन दैवीशक्तीने पाहतो. दि.१२ जुलै २०२५ रोजी त्याने पाण्याने भरलेली बाटली दिव्यशक्तीने हवेत उचलून दाखवणारा स्वतःचा व्हिडिओ तसेच सोन्याच्या विटा असलेला एक फोटो वकिलास पाठवला. तसेच आपण मंत्रतंत्राने तसेच आपल्याला



(फोटो सौजन्य: नवराष्ट्र)

मुंजोबा प्रसन्न असून त्याच्या दिव्यशक्तीने जमिनीतील गुप्तधन सोनेदेखील काढतो असे सांगून तर कधी पाचशे रुपयांच्या नोटांच्या बंडलांचा फोटो पाठवून वकिलाचा विश्वास दृढपणे संपादन केला. या दरम्यान, पुष्पेंद्र याने वकिलास सावध केले आणि प्रेमसिंग फसवू शकतो अशी जाणीव करून दिली. परंतु प्रेमसिंगच्या चमत्कारांचा अंमल आणि दुप्पट पैसे मिळविण्याच्या तीव्र लालसेने वकिलाने त्याकडे दुर्लक्ष केले.

त्यानंतर प्रेमसिंग वकिलाच्या मीरारोड येथील घरी गेला. नोटा दुप्पट करण्याच्या विधीसाठी हे घर योग्य नाही, इथे दोष आहे असे सांगून त्याने बेलापूर येथील एका घराचा पत्ता दिला आणि पूजेचे काही सामान आणि

पैसे घेऊन १९ जुलै रोजी बोलावले. ते सामान तसेच २० लाख रुपये घेऊन वकील तिथे उपस्थित झाले. त्या घरात राहणाऱ्या व्यक्तीने प्रेमसिंग बाबाच्या चमत्कारांच्या कथा वकिलास ऐकवल्या. एका व्यक्तीचे १२ हजार कोटी मंत्र-मुंजाच्या शक्तीने ट्रान्सफर करणार असल्याचे सांगितले. त्या दिवशी प्रेमसिंग बाबाने नोटा ताब्यात घेऊन काही विधी सुरू केले आणि 'या नोटांवर लाल डाग असल्याने आज विधी होणार नाही, नोटा घेऊन जा आणि पुन्हा २२ तारखेला या', असे सुचवले. २२ तारखेला पुन्हा वकील आपल्या पत्नी आणि मुलासह त्या घरी पोहोचले. प्रेमसिंगने पूजाविधी करण्यासाठी नोटांची बॅग हॉलमध्ये ठेवायला सांगून वकील, त्यांची पत्नी, मुलगा आणि त्या घरातील अन्य व्यक्ती यांना बेडरूममध्ये बसवून 'ओम लक्ष्मीदेव्यै नमः' असा मंत्रजप करीत एकेक लवंग ठेवायला सांगितले. बेडरूमची आतील कडी लावून घ्यायची सूचना देखील केली आणि काही वेळात पैसे दुप्पट झाले की बोलावतो असे सांगितले. त्याप्रमाणे जप करून एक-दीड तास झाला तरी प्रेमसिंग बाबा का बोलावत नाही म्हणून वकील बाहेर आले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, प्रेमसिंग २० लाखांची बॅग घेऊन पसार झाला आहे.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर वकील सीबीडी पोलीस स्टेशनला गेले आणि तक्रार दाखल केली. पोलिसांनी तत्परतेने गुन्हा दाखल करून, योग्य दिशेने तपास करून दोन दिवसांत प्रेमचंद आणि त्याच्या सहायकास पकडले आणि १९ लाख रुपयांची रोख रक्कम देखील हस्तगत केली. आता या प्रकरणाचा कोर्टात काही काळानंतर निकाल लागेलच. परंतु फुकटात धनप्राप्तीचा लोभ आणि अंधश्रद्धेच्या गर्तेत भारतीय माणूस किती खोलवर अडकलेला आहे आणि त्यास उच्चशिक्षित, कायद्याचे जाणकार वकील, महानगरात राहणारे लोक सुद्धा अपवाद नाहीत हे अशा प्रकरणांतून सिद्ध होते. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर नेहमी सांगत की केवळ शिक्षणाने अंधश्रद्धा दूर होत नाहीत, त्यासाठी वैज्ञानिक दृष्टीचा अंगीकार करावा लागतो. अशी प्रकरणे घडल्यावर महा. अंनिस आणि समविचारी संघटनांना अजून किती मोठा पल्ला गाठायचा आहे हे लक्षात येते.

**(लेखक अंनिपचे कार्यकारी संपादक आहेत.)**

●

## वाचक प्रतिक्रिया

'... या घोषणेला अर्थ आहे!' हा लेख... वाचून मन अक्षरशः हेलावून गेलं. त्यातले शब्द म्हणजे केवळ घटना सांगणारी वाक्ये नाहीत, तर त्या काळजाला भिडणाऱ्या जखमा आणि त्यातून निर्माण झालेला ज्वालामुखी आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या बलिदानाने जे आकाश फाडणारे प्रश्न समाजासमोर ठेवले, त्यांची तीव्रता या लेखातून जशीच्या तशी जाणवते. त्या दिवशी धक्का, दुःख, रडवणूक यांतूनही कार्यकर्त्यांच्या हृदयात पेटलेली ज्योत आजही जिवंत आहे. फुले-शाहू-आंबेडकर, 'आम्ही सारे दाभोलकर' ही घोषणा म्हणजे केवळ आवाज नाही, तर संकल्प, वारसा, आणि कर्तव्याची ठिणगी आहे, जी प्रत्येकाच्या रक्तात पोचलेली आहे. एक माणूस गेला तरी विचार कधीही मरत नाहीत. विचारांवर गोळ्या चालत नाहीत. दहशतवाद्यांच्या बंदुकीसमोरही विवेकवादाची मशाल विझत नाही. उलट ती आणखी तेजस्वी होते. या घोषणेच्या माध्यमातून निर्माण झालेली सामूहिक ओळख, भीतीला न जुमानण्याची हिंमत, बलिदानाला कृतीत रूपांतर करण्याची ताकद हे सारे प्रेरणादायी आहे. एक दाभोलकर गेले, पण हजारो दाभोलकर जन्मले, ही भावना मनाला भिडते. हा लेख म्हणजे आदरांजली नाही, तर जिवंत विचारांची हाक आहे. विवेक, मानवता आणि समानतेच्या लढ्याला पुढे नेण्यासाठी प्रत्येकाने मनाशी केलेली प्रतिज्ञा आहे. अशा लेखनाने मनाला फक्त वेदना नाही मिळत, तर मनात दाहक ज्वाला पेटवून ती कृतीत उतरवण्याची उर्मी मिळते. खरंच, आम्ही सारे दाभोलकर हा केवळ नारा नसून, समाजपरिवर्तनाची अखंड शपथ आहे.

**मोहन भोमे**

छत्रपती संभाजीनगर



# महा. अंनिसची खबरबात

**हंसराज महाले** | तळोदा (नंदुरबार)
मो. ९६७३६०६१६०

### डाकीण प्रथा प्रबोधनासाठी पोलीसांसोबत चर्चा

**नंदुरबार :** सातपुड्यातील डाकीण प्रथेच्या प्रश्नावर जनजागृती करण्यासाठी पोलिस पाटलांनी पुढाकार घ्यावा यासह विविध बाबींवर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीत महा. अंनिसच्या पदाधिकाऱ्यांसह पोलीस प्रशासनाने एकत्रितपणे उपाययोजना ठरवल्या. यामध्ये पोलीस पाटलांचे व पोलीस कर्मचाऱ्यांची विशेष प्रशिक्षणे तसेच पथनाट्याद्वारे गावोगावी जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले. डाकीण प्रथा ही अंधश्रद्धा असून तिच्या निर्मूलनासाठी समाजप्रबोधन आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. बैठकीस राज्य प्रधान सचिव विनायक सावळे, राज्य प्रशिक्षण विभाग कार्यवाह कीर्तीवर्धन तायडे, जिल्हा कार्याध्यक्ष वसंत वळवी, जिल्हा प्रधान सचिव रायसिंग पाडवी, मुकेश कापुरे, मोलगी शाखा कार्याध्यक्ष रामजी पाडवी, शितल वसावेआदी उपस्थित होते.

### कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर

**नागपूर :** लाव्हा (वाडी) शाखेतर्फे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. व्यसन विरोधी प्रबोधन विभागाचे जिल्हा कार्यवाह अशोक पाटील यांनी संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. जिल्हा अध्यक्ष जगजीत सिंग यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन, जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी संघटना बांधणी, तर जिल्हा प्रधान सचिव विनोद उलीपवार यांनी वार्षिक विविध उपक्रम या विषयांवर मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण शिबिराला एकूण २५ कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला.कार्यशाळेचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन कोराडी शाखा अध्यक्ष ताराचंद पखिडे यांनी केले.

### स्काउट गाईड शिक्षकांचे प्रबोधन

**चंद्रपूर :** भारत स्काउट गाईड जिल्हा संस्था, चंद्रपूर तर्फे वरोरा-चिमूर तालुक्यातील स्काउट गाईड शिक्षकांसाठी कर्मवीर विद्यालय, वरोरा येथे उजळणी वर्गाचे आयोजन करण्यात आले. महा. अंनिसच्या वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पाचे राज्य सहकार्यवाह पी. एम. जाधव यांनी जादूटोणा विरोधी कायदा व अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर प्रबोधनपर व्याख्यान दिले.स्काउट गाईडच्या सामुदायिक विकास कार्यक्रमांतर्गत सर्प विज्ञान, पर्यावरणपूरक सण-उत्सव, चमत्कारामागील विज्ञान व जादूटोणा विरोधी कायदा या विषयांवरही त्यांनी सप्रयोग मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला वरोरा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी कांबळे, कर्मवीर विद्यालयाचे मुख्याध्यापक नरेंद्र बोरीकर, स्काउटचे जिल्हा संघटक चंद्रकांत भगत, गाईडच्या जिल्हा संघटक दीपा मडावी व साहाय्यक जिल्हा प्रशिक्षण आयुक्त किशोर उईके प्रमुख उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन चंद्रकांत भगत यांनी केले तर आभार प्रदर्शन दीपा मडावी यांनी केले.

### पोलीस अधिकाऱ्यांच्या भेटी

**मुंबई :** महा. अंनिसच्या वतीने नुकत्याच नवी मुंबई परिसरातील पोलीस ठाण्यांना सदिच्छा भेटी देण्यात आल्या. खारघर पोलीस स्टेशनच्या प्रमुखपदी वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांबळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल समितीच्या कार्यकर्त्यांनी त्यांना भेटून शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यकर्ते जितेंद्र बनसोडे, दिनेश शिंदे आणि गौतम मोरे उपस्थित होते. यावेळी जादूटोणा विरोधी कायद्याची चित्रमय पुस्तिका भेट म्हणून देण्यात आली. जुलै महिन्यात समितीचे कार्यकर्ते अशोक निकम व राजेंद्र पंडित यांनी सीबीडी बेलापूर पोलीस स्टेशनला भेट दिली. सीबीडी येथील एका वकिलाला काशीच्या मांत्रिकाने तब्बल वीस लाख रुपयांचा गंडा घातल्याची घटना घडली होती. त्यासंदर्भातील गुन्ह्याची माहिती घेण्यासाठी ही भेट देण्यात आली. या भेटींद्वारे जादूटोणा विरोधी कायद्याबाबत जागरूकता वाढवणे आणि समाजातील अंधश्रद्धा व फसवणूक प्रकरणांवर पोलीस यंत्रणेशी समन्वय साधण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

### आंतरजातीय विवाह संपन्न

**लातूर :** महा. अंनिस, लातूर जिल्हा व शहर शाखेच्या वतीने दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी ३५६ वा

आंतरजातीय विवाह संपन्न झाला. समाजातील जातिभेद, रूढी-परंपरा व अंधश्रद्धांना फाटा देत युवक-युवतींनी समानतेचा व मानवतेचा मार्ग स्वीकारत विवाहबंधनात बांधून घेण्याचा धाडसी निर्णय घेतला. विवाह सोहळा अत्यंत साध्या पद्धतीने, सामाजिक बांधिलकी जपत आणि संविधानाने दिलेल्या समानतेच्या तत्त्वांचा अंगीकार करत पार पडला. या प्रसंगी महा. अंनिस मिश्र व सत्यशोधकी विवाह विभागाचे राज्य कार्यवाह रणजित आचार्य यांच्यासह अंनिसचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, नातेवाईक तसेच समाजातील मान्यवर उपस्थित होते. विवाह प्रसंगी शपथविधी घेऊन वधू-वरांनी संविधाननिष्ठ राहण्याचे व वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आश्वासन दिले.लातूर जिल्हा व शहर शाखेच्या वतीने वधू-वरांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले

### वयात येताना कार्यक्रम

**बीड :** महा. अंनिस, शाखा बीड, महिला विभागाच्या वतीने पालवन, (जि.बीड) येथे किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी 'वयात येताना' हा उपक्रम आयोजित करण्यात आला. प्राचार्य डॉ. सविता शेटे यांनी या विषयाची मांडणी केली व विद्यार्थिनींशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या पूर्वतयारीत शिल्पा पंडित यांनी मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाचे आयोजन महिला विभागाच्या कार्यवाह रुक्मिणी नागापुरे यांनी केले होते.विजय घेवारे आणि डी. जी. तांदळे उपस्थित होते.

**पालघर :** महा. अंनिस पालघर जिल्हा यांच्या वतीने लैंगिकता प्रबोधन अभियान अंतर्गत सीटीईएस स्कूल, बोईसर-तारापूर रोड (पेट्रोल पंपाजवळ) येथे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमात मराठी विज्ञान परिषदेतर्फे तयार केलेल्या वयात येताना - लड़की सयानी होती है / लड़का सयाना होता है या दोन स्वतंत्र चित्रफिती दाखवण्यात आल्या. मुलांसाठी आणि मुलींसाठी स्वतंत्रपणे प्रत्येकी ३० मिनिटांचे सत्र घेऊन शैक्षणिक प्रबोधन करण्यात आले.

**बडनेरा (अमरावती) :** महा. अंनिसच्या शहर शाखा महिला विभागाच्या वतीने 'वयात येताना' हा कार्यक्रम राजेश्वर युनियन उच्च माध्यमिक विद्यालयात पार पडला. समुपदेशक वर्षा देशमुख यांनी किशोरवयीन विद्यार्थिनींशी संवाद साधत मानसिक, शारीरिक व भावनिक बदलांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात 'वयात येताना' ही शैक्षणिक फिल्मही प्रदर्शित करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेघा रोहित उपाध्ये होत्या. जिल्हा कार्याध्यक्ष प्रफुल्ल कुकडे, जिल्हा कार्यवाह, महिला विभाग विजया करोले,आशिष देशमुख, सत्ययन राघोर्ते, भूमिका पहूरकर, मनाली पहूरकर व मोनाली सदावर्ते यांनीही विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन व संचालन बडनेरा शाखा कार्याध्यक्ष दिलीप लाडे ,यांनी केले तर आभार प्रदर्शन भूमिका पहूरकर यांनी केले. या उपक्रमाला १५० हून अधिक विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**उदगीर :** शाखेकडून लैंगिक प्रबोधन सप्ताहानिमित्त बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालय व अल अमीन उर्दू माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय येथे मुलगा-मुलगी वयात येताना या विषयावर चित्रफीत दाखविण्यात आली. कार्यक्रमात डॉ. भाग्यश्री घाळे यांनी मुलींना प्रजनन संस्था, एड्स आणि शारीरिक रचना याविषयी माहिती दिली. विद्रोही साहित्य सम्मेलन स्वागताध्यक्षा डॉ.अंजुम खादरी यांनी गुड टच - बॅड टच, शारीरिक बदल, स्वच्छता आणि अंधश्रद्धांविषयी मार्गदर्शन केले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य विजयकुमार पाटील, विश्वनाथ मुडपे, बाबुराव माशाळकर, शिरीष रोडगे, बळीराम बुक्तरे यांसह दोन्ही शाळांचे शिक्षक-शिक्षिका यांनी परिश्रम घेतले.

### नंदीबैल वाल्यांकडून २२ लाखांची फसवणूक अंनिसचा पाठपुरावा

**हिंगणघाट (वर्धा) :** तालुक्यातील गोविंदपूर गावात नंदीबैल घेऊन आलेल्या एका तथाकथित महाराजाने चमत्काराच्या आमिषाने गावकऱ्यांची तब्बल २२ लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली. महाराजाने पीडित महिलेला तुला अपत्य होईल तसेच घरात साडेतीन कोटी रुपयांची संपत्ती दडलेली आहे असे सांगून पूजा करण्याच्या नावाखाली नगद २२ लाख रुपये व अंगावरील दागिने घेतले आणि पसार झाला. ही घटना लक्षात आल्यानंतर गजेंद्र सुरकार, त्यांच्या पत्नी रजनी सुरकार डॉ. माधुरी झाडे, सारिका डेहनकर व त्यांचे सहकारी यांनी भेट घेऊन सविस्तर चौकशी केली. त्यानंतर पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवण्यात आली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून जादूटोणा विरोधी कायदा लागू करावा असा आग्रह समितीकडून करण्यात आला.

●

## महा. अंनिसचे विविध उपक्रम



किशोरवयीन मुली/महिलांसाठी वयात येताना मार्गदर्शन करताना डॉ. सविता शेटे व विजय घेवारे



लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन (जामनेर) प्रल्हाद बोऱ्हाडे, रामदास सोनवने, आशिष दाभाडे व साथी



सर्प प्रबोधन सप्ताह अंतर्गत मार्गदर्शन करताना प्रविण महिरे व साथी (नंदुरबार)



शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर अभिवादन कार्यक्रमात सप्रयोग मार्गदर्शन करताना पी.एम.जाधव, नारायण चव्हाण व साथी (चंद्रपूर)



शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन (नंदुरबार) विनायक सावळे, संतोष महाजन, प्रदीप केदारे व साथी



कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर (वाडी, नागपूर) जगजित सिंग, गौरव आळणे, विनोद उलीपवार व साथी



३५६वा आंतरजातीय विवाह संपन्न (लातूर) रणजित आचार्य, दिलीप आरळीकर व साथी



राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टीकोन दिन (छ.संभाजीनगर) शहाजी भोसले, डॉ. अजित खोजरे, प्राचार्य डॉ. पी. एम. शहापूरकर व साथी

ISSN : 2584-0398 Registered News Paper
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष चौथे अंक नववा, ५ सप्टेंबर २०२५ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/-
Andhshradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 4 Issue 9, 5th September 2025 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

विज्ञान निर्भयता नीती

ISSN : 2584-0398

R.N.I.No. MAHMAR/2022/83669

**वर्षभरात वार्षिक विशेषांक आणि १० मासिक अंक मिळवा घरपोच**

**बँक तपशील**

वर्गणी/जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट 'विवेक जागर संस्था' या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन
जाहिरातदार/देणगीदार/वर्गणीदार होऊ शकता

Scan & Pay

**VIVEK JAGAR SANSTHA**
ICICI Bank Branch - Shindkheda
Account No.- 646301002757
IFSC Code - ICIC0002133MICR
Details - 424229501



वार्षिक वर्गणीदार व्हा!
व्यक्तीसाठी रु. ४००/-
संस्थेसाठी रु. ५००/-

- संपर्क – व्यवस्थापकीय संपादक : अजय भालकर (९३५९०८०८२०) अंक वितरक : आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळींवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**कार्यालयीन पत्ता**
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली – ४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ____________________

____________________

____________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.